# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 29 ) 1st November 2004 ( No : 07

**स्थावर व जंगम मालमत्तांची केवळ यादी महत्त्वाची नाही, तर या मालमत्ता संपादनाच्या कामी आलेल्या निधीचे स्त्रोत काय आहेत? हे जाणून घेण्याचा लोकांना अधिकार प्राप्त झाला आहे.**

*(परिच्छेद ५९ पहा)*

''Every candidate at the time of filling his nomination paper for any election to the Council of States, House of the people, Legislative Assembly of a State or the Legislative Council of a State having such a council, shall furnish full and complete information in regard to the matters specified by the Hon'ble Supreme Court and quoted in paras 13 and 14 above, in an affidavit, the format whereof is annexed hereto as Annexure-1 to this order.''

- Election Commission of India - Para 5 (1) of the order dated 27.3.2003

''The information so furnished by each candidate in the aforesaid affidavit shall be disseminated by the respective returning officers by displaying a copy of the affidavit on the notice board of his office and also by making the copies thereof available freely and liberally to all other candidates and the representatives of the print and electronic media.''

- Election Commission of India - Para 5 (5) of the order dated 27.3.2003

*''मतदारांनी प्रत्येक उमेदवाराला प्रतिज्ञापत्राची प्रत मागावी. ते देत नसतील तर माहितीच्या अधिकाराचा वापर करुन आपण ती मागून घ्या. ही मालमत्ता आली कुठून? त्यात वाढ झाली कशी? याचा जाब उमेदवाराला विचारा. तो उमेदवार याचा जाब देत नसेल तर ते प्रतिज्ञापत्र माझ्याकडे पाठवा. मी त्याला कोर्टात खेचेन.''*

**- ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णासाहेब हजारे** *(परिच्छेद ५९ पहा)*

# माझे आर्थिक जीवन

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

**निवडणूक आयोगाचे अधिकार**

निवडणूकांवर देखरेख ठेवणे, मार्गदर्शन करणे व नियंत्रण ठेवणे याबाबतचे व्यापक अधिकार भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगाला दिलेले आहेत. 'निवडणूक' या शब्दाचा अर्थ व्यापक आहे व त्यात अनेक पायऱ्या व टप्पे समाविष्ट आहेत. त्या सर्वांवर देखरेख ठेवण्याचा व्यापक अधिकार निवडणूक आयोगाला आहे. मुक्त व न्याय्य वातावरणात निवडणूका पार पडाव्या यासाठी ३२४ व्या कलमान्वये निवडणूक आयोगाला पुरेसे अधिकार दिलेले आहेत. या अर्थाचा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने २ मे २००२ रोजी एका प्रकरणामध्ये (Appeal 7178 of 2001) दिला.

**उमेदवाराकडून ५ बाबींची माहिती मागण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश**

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने २ मे २००२ रोजी जो उपरोक्त निवाडा दिला त्यामध्ये निवडणूक आयोगाला असे आदेश दिले की ३२४ व्या कलमाने दिलेल्या शक्तीचा वापर करुन निवडणूक आयोगाने उमेदवारी अर्जासोबतच निरनिराळ्या ५ बाबींची माहिती सत्यप्रतिज्ञेवर सादर करण्यास प्रत्येक उमेदवाराला सांगावे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील हा भाग पुढील प्रमाणे :-

"The Election Commission is directed to call for information on affidavit by issuing necessary order in exercise of its power under art. 324 of the Constitution of India from each candidate seeking election to parliament or a state legislature as a necessary part of his nomination paper, furnishing therein, information on the following aspects in relation to his/her candidature :-

(1) Whether the candidate is convicted/acquitted/ discharged of any criminal offence in the past-if any, whether he is punished with imprisonment or fine?

(2) Prior to six months of filling of nomination, whether the candidate is accused in any pending case, of any offence punishable with imprisonment for two years or more, and in which charge is framed or cognizance is taken by the court of law. If so, the details thereof.

(3) The assets (immovable, movable, bank balances etc.) of a candidate and of his/her spouse and that of dependents.

(4) Liabilities, if any, particularly whether there are any over dues of any public financial institution or government dues.

(5) The educational qualifications of the candidate"

निवडणूक आयोगाने कोणत्याही परिस्थितीत दोन महिन्याच्या आत या आदेशाची अंमलबजावणी करावी असेही बंधन सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयान्वये घालून दिले.

**निवडणूक आयोगाने प्रस्ताव पाठविला**

३. मा. सर्वोच्च न्यायालयाचा २ मे २००२ चा आदेश विचारात घेऊन १९६१ च्या निवडणूक संचालनाच्या नियमामध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवारी अर्जाच्या नमुन्यामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे, अशी भूमिका निवडणूक आयोगाने घेतली व हे बदल करण्याची जबाबदारी केंद्र शासनाच्या विधी विभागाची असल्यामुळे अशा बदलाचे तपशीलवार प्रस्ताव १४ मे २००२ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या विधी विभागाकडे पाठविले.

**केंद्र शासनाच्या स्तरावर घडामोडी**

४. उमेदवारी अर्जाच्या नमुन्यामध्ये बदल करण्याचे जे प्रस्ताव निवडणूक आयोगाने १४ मे २००२ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या विधी विभागाकडे पाठविले केंद्र शासनाने त्याबाबत १९ जून २००२ च्या पत्रान्वये निवडणूक आयोगाला असे कळविले की, "या प्रस्तावांचा विचार करण्यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक ८ जुलै २००२ रोजी बोलाविलेली आहे." २ मे २००२ च्या आदेशाची अंमलबजावणी दोन महिन्याच्या आत करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश होते. ही मुदत १ जुलै २००२ ला संपणार. "आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठीची मुदत निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला २ महिन्यांनी वाढवून मागावी." अशी विनंतीसुद्धा केंद्र शासनाने निवडणूक आयोगाला केली होती.

**सर्वोच्च न्यायालयाला मुदत वाढीची विनंती करण्यास निवडणूक आयोगाचा नकार**

५. निवडणूक आयोगाने २१ जून २००२ रोजी केंद्र शासनाला एक पत्र पाठवून असे कळविले की, "केंद्र शासनाला आवश्यक वाटत असेल तर केंद्र शासनाने सर्वोच्च न्यायालयाकडे मुदत वाढीची मागणी करावी." वेगळ्या भाषेत सांगायचे तर अशी विनंती सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यास निवडणूक आयोगाने स्पष्टपणे नकार दिला असे म्हटले तरी चालेल.

**निवडणूक आयोगाने आदेश निर्गमीत केले**

६. सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मुदत १ जुलै २००२ ला संपणार. निवडणूक आयोगाने मुदत वाढीसाठी सर्वोच्च न्यायालयापुढे जाण्यास जवळ जवळ नकारच दिलेला होता. सर्वोच्च न्यायालयाने मुदत वाढवून दिलेली नाही याची खात्री करुन घेऊन निवडणूक आयोगाने स्वतःच याबाबतचे आदेश (No.3/ER/2002/JS-II/Vol.III) दिनांक २८ जून २००२ रोजी निर्गमित केले. त्या आदेशाच्या परिच्छेद १४ (१) मध्ये असे म्हटले होते की, :-

"Every candidate at the time of filing his nomination paper for any election to the Council of States, House of the people, Legislative Assembly of a State or the Legislative Council of a State having such a council, shall furnish full and complete information in regard to all the five matters, specified by the Hon'ble Supreme Court and quoted in para 5 above (reproduced in para 3 herein) in an affidavit, the format whereof is annexed hereto as Annexure-1 to this order"

**राष्ट्रपतींनी अध्यादेश काढला**

७. निवडणूक आयोगाचा आदेश निर्गमित झाल्यानंतर १९५१ च्या लोकप्रतिनिधीत्व कायद्यामध्ये सुधारणा करणारा एक अध्यादेश "लोकप्रतिनिधीत्व कायदा (सुधारणा) अध्यादेश २००२" मा. राष्ट्रपतींनी २४ ऑगस्ट २००२ रोजी निर्गमित केला. पुढे २८ डिसेंबर २००२ ला त्याचे विधीनियमात रुपांतर झाले. या विधीनियमाने ५१ च्या मूळ कायद्यात ३३ बी हे नवीन कलम दाखल केले. ते पुढील प्रमाणे :-

"Section 33B- Notwithstanding anything contained in any judgement, decree or order of any court or any direction, order or any other instruction issued by the Election Commission, no candidate shall be liable to disclose or furnish any such information, in respect of his election, which is not required to be disclosed or furnished under this Act or the rules made thereunder"

**कलम ३३ब सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविले**

८. सन २००२ मध्ये करण्यात आलेल्या लोकप्रतिनिधीत्व कायद्यातील सुधारणेला पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने १३ मार्च २००३ रोजी निर्णय दिला व १९५१ च्या कायद्यात नव्याने दाखल करण्यात आलेले उपरोक्त कलम ३३ ब बेकायदेशीर ठरविले व रद्दबातल केले.

**सन १९६४ ते आजपावेतोच्या काळात संपादित केलेल्या स्थावर मालमत्तांची एकूण संख्या १० असून त्यांची मूळ खरेदी किंमत चार लक्ष सहासष्ट हजार दोनशे तीस (रु. ४,६६,२३०) रुपये आहे. त्यांचे तपशीलवार विवरण परिशिष्ट १ व २ मध्ये दिलेले आहे.**

*(परिच्छेद ४२, ४७ व ४८ पहा)*

### २७ मार्च २००३ चा निवडणूक आयोगाचा आदेश

९. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला असेही आदेश दिले की त्यांनी आपल्या मूळ आदेशात सुधारणा करुन नवीन आदेश निर्गमित करावा. घटनेच्या कलम ३२४ अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन निवडणूक आयोगाने २७ मार्च २००३ रोजी याबाबतचे आदेश निर्गमित केले. त्या आदेशाच्या परिच्छेद ५ (१) मध्ये असे म्हटले आहे की, :-

"Every candidate at the time of filling his nomination paper for any election to the Council of States, House of the people, Legislative Assembly of a State or the Legislative Council of a State having such a council, shall furnish full and complete information in regard to the matters specified by the Hon'ble Supreme Court and quoted in paras 13 and 14 above, in an affidavit, the format whereof is annexed hereto as Annexure-1 to this order."

२७ मार्च २००३ च्या निवडणूक आदेशातील ४ था परिच्छेद पुढील प्रमाणे आहे :-

"The information so furnished by each candidate in the aforesaid affidavit shall be disseminated by the respective returning officers by displaying a copy of the affidavit on the notice board of his office and also by making the copies thereof available freely and liberally to all other candidates and the representatives of the print and electronic media."

### पाच मुद्यांवर उमेदवाराबाबतची तपशीलवार माहिती

१०. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार २७ मार्च २००३ रोजी निवडणूक आयोगाने काढलेला आदेश हा आज याबाबतचा अंतिम कायदा असून त्यानुसार प्रत्येक उमेदवाराने (१) न्यायालयामध्ये उमेदवाराच्या विरोधात दखलपात्र गुन्ह्यांची प्रलंबित प्रकरणे (२) सार्वजनिक वित्तीय संस्थांची उमेदवाराने थकविलेली देणी (३) उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी (४) उमेदवाराची शैक्षणिक पात्रता (५) उमेदवाराच्या व उमेदवाराच्या पत्नीच्या स्थावर / अचल (Immovable) आणि जंगम/चल (Movable) मालमत्तेचे तपशील याबाबतची विवरणे ठरवून दिलेल्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्रामध्ये उमेदवारी अर्जाचा भाग म्हणून जोडली पाहिजे, अशी ही तरतूद आहे. यातील पहिल्या चार बाबीचे तपशील माझे बाबतीत प्रत्येकी चारचार ओळीचे आहेत असे म्हटले तरी चालेल. पाचव्या मुद्यांबाबतचे तपशील मात्र बऱ्याच विस्ताराने देण्याची आवश्यकता आहे.

### माहिती मुक्तपणे लोकांना उपलब्ध असली पाहिजे

११. प्रतिज्ञापत्राद्वारे उपरोक्त ५ मुद्यांबाबतची जी माहिती उमेदवाराने, ठरवून दिलेल्या नमुन्यात उमेदवारी अर्जासोबत सादर केलेली आहे ती सर्व लोकांना, वृत्तपत्रांना, प्रसारमाध्यमांना, मुक्तपणाने उपलब्ध करुन दिली पाहिजे असेही या आदेशातच नमूद आहे. निवडणूक अधिकारी प्रतिज्ञापत्राच्या प्रती लोकांना उपलब्ध करुन देतील असे आदेशात असले, तरी प्रत्यक्ष उमेदवाराने हे प्रतिज्ञापत्र लोकांना कां उपलब्ध करुन देऊ नये? याबाबत या आदेशात कोणतेही मार्गदर्शन नाही. उमेदवारी अर्जाचा भाग म्हणून सादर केलेले हे प्रतिज्ञापत्र आपली एक जबाबदारी म्हणून आपण लोकांना उपलब्ध करुन दिले पाहिजे या हेतूने हे प्रतिज्ञापत्र या अंकात जसेच्या तसे स्वतंत्रपणे प्रसृत केलेले आहे. (परिशिष्ट ९ पहा)

### स्थावर व जंगम मालमत्तांचे तपशील

१२. स्थावर व जंगम मालमत्तांचे तपशील प्रतिज्ञापत्रामध्ये ज्या नमुन्यात भरावयाचे आहेत त्या नमुन्यामध्ये भरून दिलेले आहेत. अशा मालमत्ता किती आहेत व आज त्यांचे विद्यमान मूल्य काय आहे? एवढीच बाब या प्रतिज्ञापत्रामध्ये भरावयाची आहे. ही बाब आवश्यक व महत्त्वाची आहेच पण त्याबरोबरच अशा मालमत्ता संपादन केंव्हा करण्यात आल्या व अशा संपादनासाठी आवश्यक त्या धनशक्तीचे स्त्रोत काय आहेत? किंवा होते? ही दुसरी आणखी महत्त्वाची गोष्ट आहे असे मला वाटते.

### उमेदवाराचे आर्थिक जीवन

१३. विधिमय, विधिमान्य व पारदर्शक अशी "उमेदवाराची उपजीविकेची साधने, त्याच्याजवळ असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता व या मालमत्ता संपादनाचे स्त्रोत" ही त्याच्या आर्थिक जीवनाची महत्वाची अंगे आहेत. या आर्थिक जीवनाची संपूर्ण माहिती घेण्याचा लोकांचा अधिकार आता २००३ पासून कायद्याने मान्य केलेला आहे. कायद्याने जी गोष्ट व्हायला हवी होती ती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने व निवडणूक आयोगाच्या आदेशाने झालेली आहे. त्याला प्रत्येक उमेदवाराने केवळ कायदेशीर औपचारिकता पूर्ण करण्याच्या भावनेने नव्हे, तर सर्वोपरी सामोरे गेले पाहिजे.

### विधानपरिषद सदस्य होण्यापूर्वी व झाल्यानंतर

१४. आर्थिक जीवनाचे हे सारे तपशील नमूद करीत असतांना मी आतापर्यंतच्या कार्यकालाचे एकूण २ मुख्य कालखंड धरलेले आहेत.

(१) विधानपरिषद सदस्य होण्यापूर्वीचा कालखंड - १९८० पर्यंतचा.

(२) विधान परिषद सदस्य झाल्यानंतरचा कालखंड - १९८० ते आजपर्यंत.

या दोनही कालखंडाबाबतची तपशीलवार माहिती पुढील परिच्छेदातून दिलेली आहे.

### प्राथमिक शिक्षणाचा काळ

१५. पहिल्या वर्गात मी दाखल झालो तो एका भाग्यवान शाळेचा भाग्यवान विद्यार्थी म्हणून. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ताबडतोबच प्राथमिक शाळेच्या स्तरावर बुनियादी शिक्षणाची निदान तोंडओळख व्हावी म्हणून प्रायोगिक तत्त्वावर त्यावेळच्या मध्यप्रांत वऱ्हाड सरकारने प्रत्येक तालुक्यात एक "**सरकारी सिनिअर बेसिक शाळा**" काढली होती. अमरावती तालुक्यात यावली, चांदूर तालुक्यात अंजनसिंगी, दर्यापूर तालुक्यात येवदा, अचलपूर तालुक्यात माधान व मोर्शी तालुक्यात, माझे गाव म्हणजे बेलोरा, येथे या शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. मेळघाट तालुक्यात एखाद्या ठिकाणी अशी शाळा होती किंवा नाही व असल्यास ती कोठे होती? हे आज आठवत नाही. जिल्ह्यामध्ये त्यावेळी एवढे सहाच तालुके होते. तालुक्यातील इतर सर्व शाळांचे नियंत्रण जनपद (पुढे जिल्हापरिषद) या स्थानिक स्वराज्य संस्थेकडे होते, तर या सरकारी सिनिअर बेसिक शाळेचे नियंत्रण थेट "डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स" कडे रहात असे. '**स्थानिक स्वराज्य**'चा हस्तक्षेप अजिबात नसे. मुख्याध्यापक थेट 'डी.आय.' किंवा 'ए.डी.आय.' ला जबाबदार रहात असे. शिस्त कडक असे. टकळी, चरखा, सुतकताई, गीताई हे श्रद्धेचे व मन ओतून स्वीकारलेले विषय होते. त्यावेळी बालसभा, हस्तलिखीते, अक्षरवळण, सफाई, खेळ व कवायत यासाठी शिक्षक अभ्यासविषयाइतकाच जीव ओतत असत. वर्धेच्या नॉर्मल स्कूलमधून प्रशिक्षित होऊन बाहेर पडलेला विशेष शिक्षक वर्ग या शाळांना पुरविला जात असे. मुख्याध्यापकाच्या नावासमोर "सातवा वर्ग-थर्ड इअर ट्रेन्ड" अशी पात्रता बोर्डावर लिहिलेली पाहिली म्हणजे आजच्या पी.एच.डी पेक्षा भारी वजन मनावर पडत असे. अशा या "सरकारी सिनिअर बेसिक शाळा बेलोरा" या शाळेचा मी त्यावेळी विद्यार्थी होतो. याचा आम्हा विद्यार्थ्यांना त्या बालवयात खूपच फायदा झाला. पुढे महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर एकसारखेपणा आणण्यात आमच्याकडील ज्या चांगल्या गोष्टी मोडून पडल्या त्यामध्ये या सरकारी सिनिअर बेसिक शाळा सुद्धा मोडीत निघाल्या व त्या जिल्हापरिषदांच्या सुपूर्त करण्यात आल्या. एक अतिशय उत्तम, चांगली व यशस्वी सिद्ध झालेली व्यवस्था मोडून

टाकण्यात आली.

**इंग्रजीशिवाय पाचवी व सहावी**

१६. संपूर्णपणे कोरडवाहूच्या शेतीवर अर्थव्यवस्था अवलंबून असलेले ४ ते ५ हजार लोकसंख्येचे आमचे गाव. चुलते व वडील मिळून आमचे संयुक्त कुटुंब. दोघांमिळून सहा एकर कोरडवाहू जमीन. दोघेही दिवसभर राबत तेव्हा कसातरी कुटुंबाचा चरितार्थ चालत असे. मी चौथा वर्ग चांगल्या रीतीने पास झाल्यावर पाचव्या वर्गाच्या प्रवेशाच्या वेळी एक समस्या निर्माण झाली. त्याकाळी कशी काय ती व्यवस्था होती? हे आज काही मला सांगता येणार नाही, पण ती व्यवस्था होती हे मात्र खरे. ५ व्या वर्गात प्रवेश घेतांना इंग्रजी विषय सोडून बाकी शिक्षण घेणाऱ्याला ४ आणे महिना फी होती व इंग्रजीसह शिक्षण घेणाऱ्याला सव्वादोन रुपये महिना फी असायची. इंग्रजी शिकविण्यासाठी वेगळा 'इंग्लिश टीचर' असे व तो ५ ते ७ या वर्गांना फक्त इंग्रजी हा विषय शिकवत असे. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये नेतृत्त्व चुलत्यांचे होते. त्यांनी स्वतःच्या एकुलत्या एक मुलाला म्हणजे माझ्या मोठ्या चुलत भावाला- दादाला- सुद्धा चार आण्याच्या वर्गातच टाकले होते. आपल्या लहान भावाच्या मोठ्या मुलाला इंग्रजीत टाकू नये हा निर्णयामागे हेतू नव्हता, तर एवढा खर्च आपल्याला झेपणार नाही आणि इंग्रजी शिकून तरी पुढे काय उजेड पाडणार आहेत? ही भावना त्यामागे होती. इंग्रजी विषय नसेल तर सातवीनंतर शिकता येत नाही. एवढेच ना? मग आपल्याला तरी सातवीनंतर कुठे शिकवायचे आहे? अशी पालकांची भावना असे. गावात सातवी पर्यंत शाळा आहे, तेवढे झाल्यावर पुढे बाहेर ठिकाणी मुलांना पाठवून येणाऱ्या संभाव्य खर्चाचा विचार डोळ्यापुढे आल्यामुळे आज सव्वादोन रुपये महिना कशासाठी खर्च करा? हा एक पदरसुद्धा त्या विचारामागे होता.

**इंग्रजीसह पाचवी व सहावी**

१७. शाळेतल्या चटपट्या मुलात माझा बरचा नंबर होता. रिद्धपूरच्या मंदिरावर व दाभेरीच्या तलावावर सोबत्यांच्या सहलीचे नेतृत्त्व करीत होतो, स्काऊटच्या शिक्षकांचा फारच आवडता विद्यार्थी होतो, बालसभेत भाग घेत होतो, चांगली भाषणे देत होतो, हस्तलिखित वार्षिकांकात लिहीत होतो, वर्गात कॅप्टन होतो. पाचवा वर्ग पास झालो, सहावा वर्ग पास झालो व सातव्या वर्गात प्रवेश घेतला तेव्हा माझ्या सर्व शिक्षकांमध्ये सातव्या वर्गानंतर याचे शिक्षण बंद होईल (कारण इंग्रजी असल्याशिवाय आठव्या वर्गात प्रवेशच होत नसे) याबाबतची हळहळ व्यक्त होऊ लागली. स्कूल कमेटीच्या कानावर ही गोष्ट घालण्यात आली. स्कूल कमेटीची बैठक झाली. इंग्रजीची फी माफ करण्याचा कमेटीने निर्णय घेतला व मला सातव्या वर्गातून पुन्हा पाचव्या वर्गात बसविण्यात आले. इंग्रजीसह ५ व्या व ६ व्या वर्गाचा माझा प्रवास पुन्हा सुरू झाला. १९५४ साली सातव्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण झालो. त्यानंतर मी गाव सोडले. पुढे मी

*(परिशिष्ट : १)*

# स्थावर मालमत्तांचे विवरणपत्र

*सुरुवातीला अनुक्रम नंबर व मालमत्ता संपादनाची (खरेदीची) तारीख दिली आहे. त्यानंतर खरेदीकर्त्याचे नाव, मालमत्तेचा तपशील, एकूण क्षेत्रफळ, खरेदीची किम्मत व नोंदणी दस्तऐवजाचे अधिकृत तपशील नमूद केलेले आहेत.*

**(अ) विधानपरिषद सदस्य होण्यापूर्वी संपादित केलेल्या स्थावर मालमत्ता**

(१) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर तीन (३), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७२ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(२) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर दोन (२), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७३ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(३) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : (आज भूमीभागधारक : सौ. सुशीला भाऊराव देशमुख,) मूळ खरेदी भूमीभागधारकांच्या वडिलांनी केलेली व त्यांचे नावे, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर चार (४), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७८ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(४) तारीख ७.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव** : (आज भूमीभागधारक : सौ. सुशीला भाऊराव देशमुख,) मुळ खरेदी भूमीभागधारकांच्या बंधूंनी केलेली व बंधुंच्या नावे, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर पाच (५), **एकूण क्षेत्रफळ** : ३०१० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ७१ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस नोंदला.

(५) तारीख १.२.१९७२, **खरेदीदाराचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर एक (१), **एकूण क्षेत्रफळ** : ५००० चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये आठ हजार (रु. ८०००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक २५२ वर सन १९७२ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १ तारखेस नोंदला.

(६) तारीख १७.५.१९७४, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ११, **एकूण क्षेत्रफळ** : ४ एकर ३० गुंठे **खरेदीची किम्मत** : रुपये विस हजार (रु. २००००) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १४५६ वर सन १९७४ च्या मे महिन्याच्या १७ तारखेस नोंदला.

(७) तारीख २३.४.१९७९, **खरेदीदाराचे नाव** : सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ११, **एकूण क्षेत्रफळ** : दोन एकर एकोणवीस गुंठे, **खरेदीची किम्मत** : रुपये चौदा हजार नऊशे अठ्ठ्यांशी (रु. १४९८८) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १३५७ वर सन १९७९ च्या एप्रिल महिन्याच्या २३ तारखेस नोंदला.

(८) बांधकामाचा काळ १९७२ ते ७४, **मालकाचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर तीन बांधलेले रहाते घर (३), **बांधकामाची किम्मत** : रुपये एकतीस हजार (रु. ३१०००)

**(ब) विधानपरिषद सदस्य झाल्यानंतर संपादित केलेल्या स्थावर मालमत्ता**

(९) तारीख २७.५.१९८५, **खरेदीदाराचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर १२१/३ व ४, त्यातील प्लॉट नंबर एक (१), **एकूण क्षेत्रफळ** : ३३३१ चौरस फुट, **खरेदीची किम्मत** : रुपये नऊ हजार नऊशे नव्वद (रु. ९९९०) **नोंदणी** : दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ३८३५ वर सन १९८५ च्या मे महिन्याच्या २७ तारखेस नोंदला.

**(१०)** बांधकामाचा काळ १९८३ ते १९९०, **मालकाचे नाव** : भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील** : वरळीसागर को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी मर्यादीत या विधानमंडळ सदस्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये वैतरणा, या इमारतीमध्ये सदनिका क्रमांक १००३, ९५० चौरस फुट, **बांधकामाची किम्मत** : रुपये तीन लक्ष सत्तर हजार दोनशे बावन्न (रु. ३,७०,२५२) २५ ऑगस्ट १९८३ पासून तर प्रत्यक्ष सदनिका सुपुर्त होण्याच्या तारखेपर्यंतच्या (१५ ऑक्टोबर १९९०) ७-८ वर्षाच्या काळात २,७०,२५२ रुपयाचा भरणा गृहनिर्माण संस्थेमध्ये करावा लागला. त्याशिवाय १ लक्ष रुपयाचे कर्ज महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स या वित्तिय संस्थेकडून गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून तसा अर्ज करणाऱ्या प्रत्येक सदस्याला उपलब्ध करुन देण्यात आले. अशा रितीने संपादनाचा एकूण खर्च रुपये ३,७०,२५२ एवढा आला.

आमदार झाल्यानंतर या शाळेच्या शताब्दी महोत्सवाला मुख्य पाहूणा म्हणून गेलो तेंव्हा शं.दु.राउत व गो.चि. वानरे या माझ्या शिक्षकांनी शाळेच्या "निर्णय नोंद व अभिप्राय" रजिस्टरामध्ये "भोवराव तुळसीराम देशमुख" या विद्यार्थ्याला इंग्रजीची फी माफ केल्याच्या निर्णयाची नोंद मला दाखविली. माझे करिता ती काही नविन गोष्ट नव्हती पण १०० वर्षाच्या त्या शाळेच्या इतिहासांत भारताचे थोर सुपुत्र व माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनी एलिचपूर येथे ई.ए.सी (Extra Assistant Commissioner) म्हणून कार्यरत असतांना या शाळेला स्वतः भेट देऊन पहाणी केली व स्वदस्तुरात त्या रजिस्टरामध्ये अभिप्राय नोंदविला होता. हे वाचून खूपच मौज वाटली व अशा शाळेचे आपण विद्यार्थी होतो याचा आनंदही वाटला.

### माध्यमिक शिक्षण

१८. गावातून बाहेर पडण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यावेळी आठव्या वर्गाच्या पुढील शिक्षणाची सोय आमच्या गावात नव्हती. हायस्कूल असलेल्या एखाद्या ठिकाणी प्रवेश घेऊन राहणे ही अशक्य गोष्ट होती. माझे एक मामा त्यावेळी वर्धेला जनपदमध्ये कार्यरत होते. आई वर्धेला जावून आली व त्या वशिल्यावर मी वर्धेला मॉडेल हायस्कुलमध्ये आठव्या वर्गात दाखल झालो. ४-५ हजार लोकसंख्येच्या गावातील चटपट्या मुलाचे रुपांतर वर्धेसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी चळवळ्या मुलात झाले. परिणामी वर्धेतील मुक्काम १-२ वर्षातच हलवावा लागला. तिथेसुद्धा माझ्या शिक्षकांचा अपार लोभ मला लाभला. "प्रथम मी शिक्षण पूर्ण करावे, निदान मॅट्रिक पास झाल्याशिवाय इतर चळवळीत पडू नये" असे त्यांना मनापासून वाटत असे. माझे वर्धेत काही खरे नाही अशी भावना झालेले वर्धेचे आमचे मुख्याध्यापक 'टाकोडे (व्यंकटराव) गुरुजी' यांची वर्धेवरुन अमरावतीच्या श्री. शिवाजी मेन ब्रँचवर बदली झाली. ते अमरावतीला रुजू झाल्यानंतरच्या उन्हाळ्यात त्यांनी माझा वर्धेवरुन दाखला मागविला व श्री. शिवाजी हायस्कूल मेनब्रँच मध्ये १० व्या वर्गात माझा प्रवेश करवून घेतला. "श्रद्धानंद बोर्डिंगमध्ये तुझा प्रवेश झाला असून येतांना सोबत ताट, वाटी व सतरंजी घेऊन येण्याची सूचना" देणारे त्यांचे पत्र उन्हाळ्याच्या सुटीत मला गावला मिळाले. पुढची वर्ष दोन वर्षे मी श्रद्धानंदमध्ये काढली. १९५८ च्या एप्रिल महिन्यात श्री. शिवाजी हायस्कूल मधून मी त्यावेळची अकरावी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालो.

### महाविद्यालयीन शिक्षण

१९. मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याच वर्षी (१९५८) मी विदर्भ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. पुढच्या सहा वर्षानंतर राज्यशास्त्र या विषयात एम.ए.करुन १९६४ मध्ये मी विदर्भ महाविद्यालय सोडले. विदर्भ महाविद्यालयातील माझे विद्यार्थी जीवन हे खूपच समृद्ध अशा अनुभवाची शिदोरी सोबत देणारे ठरले. ज्या कारणांमुळे मला वर्धा सोडून अमरावतीला यावे लागले त्याच कारणामुळे मी वर्धेला असतांनाच अमरावती येथे दैनिक 'हिंदुस्थान'शी माझा संबंध आला होता. ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व दैनिक 'हिंदुस्थान'चे संस्थापक - संपादक स्व. श्री. बाळासाहेब मराठे यांचे विपूल मार्गदर्शन पुढील काळात मला लाभले. अमरावतीला आल्याबरोबर दैनिक 'हिंदुस्थान'मध्ये मी कामाला सुरुवात केली. अमरावती येथे विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना 'कंपोझीटर कम प्रिंटर कम प्रुफरीडर कम रिपोर्टर कम सबएडिटर कम (वेळ प्रसंगी) एडीटर' अशा सर्व पदावरून काम करण्यामुळे माझे अनुभव विश्व खूपच विस्तृत होण्यास मदत झाली. माझ्या शिक्षणाला या कामामुळे हातभार लागला. पदव्युत्तर शिक्षण होईपर्यंतच्या प्रवासाचा हा जो धावता आढावा मी घेतला तो त्याकाळातील माझ्या आर्थिक जीवनाचे दर्शन घडविण्यास पुरेसा समर्थ आहे असे मला वाटते.

### एम.ए.राज्यशास्त्र : विद्यापीठात सर्वप्रथम

२०. १९६४ मध्ये राज्यशास्त्र विषयात नागपूर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सर्वप्रथम येवून विदर्भ महाविद्यालयातून मी एम.ए. झालो. मुळात ७-८ वर्षे अमरावतीच्या पत्रकार जगतात मी काम करीत होतो. पत्रकार जगताचा एक भाग होतो. त्यामुळे अशी गुणवत्ता मिळविणाऱ्या इतर विद्यार्थ्यांच्या वाट्याला येईल त्यापेक्षा कितीतरी जास्त वाहव्वा व प्रसिद्धी माझ्या वाट्याला आली. आर्थिक जीवनाच्या ज्या पार्श्वभूमीवर हे यश मला मिळाले होते त्याची कौतुकपूर्ण किनार त्या प्रसिद्धीला होती. किमान द्वितीयश्रेणीमध्ये एम.ए. उत्तीर्ण झालेल्या लोकांचा मोठाच तुटवडा त्या काळात सर्व विषयात असे. विदर्भातील २-३ महाविद्यालयामध्ये अधिव्याख्याता म्हणून जाण्याची संधी असतांना मी अमरावतीलाच राहण्याचा निर्णय घेतला. एल.एल.बी. करुन नंतर प्रॅक्टीस करावी, अशी तात्पुरती योजना त्यामागे होती. चळवळीतील माझ्या ज्येष्ठ सहकाऱ्यांनी नुकत्याच सुरू केलेल्या भारतीय महाविद्यालयाचे ते पहिले किंवा दुसरे वर्ष होते. राज्यशास्त्राचा अधिव्याख्याता या नात्याने तात्पुरती व्यवस्था म्हणून किंवा कायम व्यवस्था म्हणून तेथे मी सहभागी होणे हा माझ्यासाठी व माझ्या सहकाऱ्यांसाठी आनंदाचाच विषय होता.

### राज्यशास्त्र विषयाचा अधिव्याख्याता

२१. श्री. शिवाजी महाविद्यालयातील त्यावेळचे राज्यशास्त्र या विषयाचे एक नामवंत प्राध्यापक इतरत्र प्राचार्य म्हणून नियुक्ती झाल्याने राजीनामा देऊन गेल्याने ती जागा रिक्त झाली होती. वर्ग खचाखच भरलेले होते. एका विषयाचे एवढे वर्ग खाली राहणार त्यामुळे ताबडतोब काही तरी व्यवस्था करण्याची धावपळ सुरु झाली. संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य, गव्हर्निंग बॉडीचे काही सदस्य व काही ज्येष्ठ प्राध्यापक यांची बैठक झाली. "मागे प्रा.धनागरे (पुढे कोल्हापूर विद्यापीठाचे कुलगुरु) नोकरी सोडून गेले तर त्यानंतर दोन चार वर्षे मला दिल्लीला विद्यार्थ्यांची पत्रे येत होती. तेंव्हा या विषयासाठी चांगला शिक्षक पहा" असे विचार खुद्द मा.भाऊसाहेबांनी त्या बैठकीत मांडल्याचे मला नंतर अनेकांनी सांगितले. विद्यापीठात एम.ए. राज्यशास्त्र या परीक्षेत सर्व प्रथम येणे, त्यामुळे वृत्तपत्रातून मिळालेली प्रसिद्धी व गाजलेले विदर्भ महाविद्यालयातील माझे विद्यार्थी जीवन यामुळे माझ्या नावावर ती चर्चा थांबली व ती जबाबदारी प्राचार्य नानासाहेब देशमुख यांच्यावर टाकण्यात आली. १३ जुलै १९६४ रोजी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री. बी.जी.बानुबाकोडे यांनी शिपायाकरवी पुढील चिठ्ठी माझे निवासस्थानी पाठविली "Shri. Shivaji College, Amravati Office Slip : Dear, B.T.Deshmukh you are requested by Principal N.C. Deshmukh (to see him) to day at 3.30 P.M. for some urgent work. I hope you will find time to come. yours sincerely, B.G.Banubakode 13.7.64" नंतरच्या घटनाक्रमाचे सर्व तपशील नमूद करण्याची ही जागा नाही. त्यापुढील ५-१० दिवसात घडलेल्या घटनाक्रमात मी श्री. शिवाजी महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र या विषयाचा अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो.

### भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन

२२. सन १९६४ मध्ये २००-५०० च्या वेतनश्रेणीमध्ये अधिव्याख्याता म्हणून झालेल्या या नेमणुकीमुळे आर्थिकदृष्ट्या बरीच स्थिरता आलेली होती. Constituent Assembly Debates चे बाराही खंड सेवेच्या पहिल्याच वर्षात स्वखर्चाने आपण घेऊ शकलो याचा आनंद होता. नागपूर विद्यापीठाने पदवी परीक्षेपर्यंत मराठी माध्यम सुरू केलेले होते. मराठीतून पुस्तके मात्र पुरेशी उपलब्ध नव्हती. व्याख्यानांची उत्तम तयारी करणे, एक सेकंद वर्गात उशिरा न जाणे, एक मिनिट वर्ग अगोदर न सोडणे, या सूत्रावर आधारित दिनक्रमामध्ये विद्याव्यासंगासाठी भरपूर वेळ मिळत असे. "भारतीय घटना, घटनात्मक विकास व राष्ट्रवादी चळवळ" हा माझा आवडता विषय होता. पदव्युत्तर विद्यार्थी म्हणून या पेपरची माझी चांगली तयारी झाली होती. आता मी शिक्षक म्हणून बी.ए. भाग १ ला तो विषय मेहनतीने शिकवित होतो. या मेहनतीच्या परिणामी "भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन" हे ४००

***(परिशिष्ट : २)***

**संपादित स्थावर मालमत्तांची मूळ किम्मत व विद्यमान मूल्य नमूद असलेले विवरणपत्र**

| Sr. No. | Construction / Purchase Date | Price | Current Market value |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 2. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 3. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 4. | 07.01.1970 | 3,000 | 20,400 |
| 5. | 01.02.1972 | 8,000 | 51,200 |
| 6. | 17.05.1974 | 20,000 | 1,20,000 |
| 7. | 23.04.1979 | 14,988 | 77,938 |
| 8. | 1972 -1974 | 31,000 | 7,00,000 |
| 9. | 27.05.1985 | 9,990 | 36,054 |
| 10. | 1983 -1990 | 3,70,252 | 24,00,000 |
| | **TOTAL** | **4,66,230** | **34,66,792** |

**Notes**

(१) परिशिष्ट एक व दोन मध्ये अनुक्रमांक सारखेच असून प्रत्येक क्रमांकाच्या मालमत्तेची तपशीलवार माहिती परिशिष्ट १ मध्ये दिलेली आहे.

(२) १ते १० क्रमांकाच्या एकूण १० स्थावर मालमत्तांची स्तंभ २ मध्ये दाखविलेली मूळ खरेदी किम्मत किंवा बांधकामाची किम्मत याबाबत लेखाचा परिच्छेद ४२ व ४७ तसेच विद्यमान मूल्य करीता परिच्छेद ४८ व ४९ पहा.

(3) Current market value is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207)

पृष्ठाचे पुस्तक ७-८ महिन्यात सिद्ध झाले व माझ्या सेवेच्या पहिल्याच वर्षानंतर प्रकाशित झाले. नागपूर विद्यापीठाने संदर्भ पुस्तक म्हणून ते पुढे लागू केले. या पुस्तकामुळे शिक्षक म्हणून माझ्या लौकिकात भर पडली. पुरेसा मान व पुढे दरवर्षाला थोडेसे धन प्राप्त करुन देण्यास हे पुस्तक कारणीभूत ठरले.

**विदर्भ हाऊसिंग कॉलनी**

२३. पदव्युत्तर शिक्षण घेतांना सबनिस प्लॉटमध्ये एक खोली घेऊन त्यात आम्ही २/३ विद्यार्थी रहात होतो. पुढे अधिव्याख्याता झाल्यावर १-२ वर्षे त्याच खोलीवर पण एकट्याने रहात आहोत याचा आनंद होता. पुस्तकाचे लिखाण तेथेच झाले. विवाहोत्तर निवासामध्ये बदल अपरिहार्य झाला व मालटेकडीजवळ विदर्भ हाउसिंग कॉलनीच्या ब्लॉक नंबर १४ मध्ये आमचा मुक्काम हलला. आपले स्वतःचे घर बांधणे ही परंपरेने त्यावेळी मोठी कठीण गोष्ट समजली जात होती. नुकत्याच सुरु झालेल्या गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून गृहनिर्माण ही त्यामानाने बरीच सोपी गोष्ट म्हणून समोर होती. खुद्द मी जेथे रहात होतो त्या ब्लॉकचे मालक दरमहिन्याला जेवढी परतफेड विदर्भ हाऊसिंग बोर्डाकडे करीत असत त्यापेक्षा जास्त भाडे मी दरमहा त्यांना देत असे. विदर्भ हाऊसिंग बोर्डाची जाहिरात आली तेंव्हा त्यात सहभागी होण्याएवढी बुद्धी व निधी ज्यांच्याजवळ होता ते घरमालक होणार व या दोनपैकी एकाचा अभाव असणाऱ्याला भाडेकरू होण्याची संधी. अशा संधीचा लाभ घेणाऱ्याला घर खाली करण्याच्या वेळोवेळी येणाऱ्या सूचनांचा आनंदसुद्धा घ्यावा लागतो. अशा स्थितीत विदर्भ महाविद्यालयातील आमच्या एका ज्येष्ठ शिक्षकांनी शेगाव नाक्याजवळ हाऊसिंग सोसायटी काढण्याचा मनोदय व्यक्त केला. मी त्यात दाखल झालो व १९६८ मध्ये ३ हजार रुपयाला एक प्लॉट तेथे खरेदी केला. (परिशिष्ट ३ मधील क्रमांक एक पहा) पुढे त्यांची बदली नागपूरला झाल्यावर ती योजना पूर्णपणे बारगळली.

**चार सहा वर्षाचा काळ सहज निघून गेला**

२४. चार सहा वर्षाचा काळ सहज निघून गेला. एका बाजूला निवासस्थानाच्या संकटाला तोंड देत असतांना दुसऱ्या बाजूला शासनाच्या काही विशिष्ट धोरणामुळे व अनुदान सूत्रातील दोषामुळे, विशेषतः विदर्भ व मराठवाड्यातील महाविद्यालयामध्ये विलंबाने वेतनाच्या समस्या निर्माण झाल्या. १९६९-७० च्या दरम्यान विदर्भातील सर्व महाविद्यालयातून २ महिने, ४ महिने, कुठेकुठे तर ६ महिने व पुढे पुढे तर ११ महिने वेतन विलंबाने व्हायला लागले.

**एच फोर संकरित बियाणे**

२५. कृषी महाविद्यालय हे त्यावेळी आमच्या महाविद्यालयाची एक विद्याशाखा होते. नुकतीच कृषी विद्यापीठाची स्थापना झालेली होती पण महाविद्यालय हे पूर्णपणे वेगळे झालेले नव्हते. तसे जाणवत नव्हते. १९६८-६९-७० च्या दरम्यान एच फोर संकरित बियाण्याचा मोठा प्रसार झालेला होता. हे बियाणे कसे तयार करावयाचे? यासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. उलेमाले प्रगतिशील कास्तकारांच्या महाविद्यालयात बैठका घेत असत. गुजराथ ६७ हा कापसाचा मादीवाण व अमेरिकन नेक्टरलेस हा नरवाण यांचा वापर करुन संकरित एच फोर कापसाचे बियाणे कसे तयार करायचे याचा प्रगतिशिल कास्तकारांसाठी प्रशिक्षण वर्ग होत असे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा सुद्धा सहभाग त्यात रहात असे. कृषी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर त्याचे केवळ प्रात्यक्षिकच नव्हे तर मोठ्या प्रमाणावर उत्पादनही घेतले जात असे. कास्तकारांच्या अशा प्रशिक्षण वर्गामध्ये माझ्या गावाकडील व ओळखीचे अनेक कास्तकार हजर राहत असत, ते रहावेत यासाठी मी प्रयत्न करीत असे. उपलब्ध सारे साहित्य काळजीपूर्वक वाचून काढत असे. एका बाजूला निवासाची भेडसावणारी समस्या व दुसऱ्या बाजूला विलंबाने होणारे वेतन यातून बाहेर निघण्याचा एक मार्ग या एच फोर च्या वर्गात मला दिसून आला. **वेतन विलंबाने होत असल्याबद्दल नुसते रडत बसण्यापेक्षा ती व्यवस्था बदलण्यासाठी संघर्ष केला पाहिजे व तसे होत नाही** तोवर आपणही 'शेतकऱ्याचे बच्चे' आहोत. आपल्याला 'एच फोर' का करता येणार नाही? अशी भावना माझ्या मनात आली.

*(परिशिष्ट : ३)*

# *खरेदी केलेल्या पण नंतर विकलेल्या स्थावर मालमत्तांचे तपशील*

मध्यभागी अनुक्रम नंबर व सुरुवातीला **(अ)** अंतर्गत मालमत्ता संपादनाची (खरेदीची) तारीख दिली आहे. त्यानंतर खरेदीकर्त्याचे नाव, **(ब) आणि (क)** अंतर्गत विक्रीची तारीख व विक्रीदाराचे नाव, त्यानंतर मालमत्तेचा तपशील, एकूण क्षेत्रफळ, खरेदीची अथवा विक्रीची किम्मत व नोंदणी दस्तऐवजाचे अधिकृत तपशील नमूद केलेले आहेत.

**( एक )**

**(अ)** तारीख १९.२.१९६८, **खरेदीदाराचे नाव :** भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील :** मौजे शेगाव, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ३२/३, प्लॉट नंबर पाच (५), **एकूण क्षेत्रफळ :** ४००० चौरस फुट, **खरेदीची किम्मत :** रुपये तीन हजार (रु. ३०००) **नोंदणी :** दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ५३८ वर सन १९६८ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १९ तारखेस नोंदला.

**(ब)** तारीख १६.६.१९७३, **विक्रीदाराचे नाव :** भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील :** मौजे शेगाव, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ३२/३, प्लॉट नंबर पाच (५), **एकूण क्षेत्रफळ :** ४००० चौरस फुट, **विक्रीची किम्मत :** रुपये पाच हजार (रु. ५०००) **नोंदणी :** दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १३६९ वर सन १९७३ च्या जून महिन्याच्या १६ तारखेस नोंदला.

**( दोन )**

**(अ)** तारीख १८.९.१९७८, **खरेदीदाराचे नाव :** भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील :** मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ३६, प्लॉट नंबर तीन (३), **एकूण क्षेत्रफळ :** ५२०० चौरस फुट, **खरेदीची किम्मत :** रुपये पाच हजार नऊशे ऐंशी (रु. ५९८०) **नोंदणी :** दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक २४७० वर सन १९७८ च्या सप्टेंबर महिन्याच्या १८ तारखेस नोंदला.

**(ब)** तारीख ३१.१०.१९८४, **विक्रीदाराचे नाव :** भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **मालमत्तेचा तपशील :** मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ३६, प्लॉट नंबर तीन (३), **एकूण क्षेत्रफळ :** ५२०० चौरस फुट, **विक्रीची किम्मत :** रुपये बासष्ट हजार चारशे (रु. ६२४००) **नोंदणी :** दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ६३९८ वर सन १९८४ च्या ऑक्टोबर महिन्याच्या ३१ तारखेस नोंदला.

**( तीन )**

**(अ)** तारीख ८.१.१९७०, **खरेदीदाराचे नाव :** सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील :** मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर पस्तिस (३५), **एकूण क्षेत्रफळ :** ५००० चौरस फुट, **खरेदीची किम्मत :** रुपये पाच हजार (रु. ५०००) **नोंदणी :** दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १०१ वर सन १९७० च्या जानेवारी महिन्याच्या ८ तारखेस नोंदला.

**(ब)** तारीख २३.८.१९७१, **विक्रीदाराचे नाव :** सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील :** मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर पस्तीस (३५), **एकूण क्षेत्रफळ :** ५००० चौरस फुट त्यापैकी विहिर व विहिरीवरील बांधकामाशिवाय चा काही भाग, **विक्रीची किम्मत :** रुपये पाच हजार (रु. ५०००) **नोंदणी :** दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १७०१ वर सन १९७१ च्या ऑगस्ट महिन्याच्या २३ तारखेस नोंदला.

**(क)** तारीख १७.१.२००३, **विक्रीदाराचे नाव :** सौ. सुशीला भाऊराव देशमुख, **मालमत्तेचा तपशील :** मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर पस्तिस (३५), **एकूण क्षेत्रफळ :** ५००० चौरस फुट त्यापैकी विहिर व विहिरीवरील बांधकामासहचा काही भाग **विक्रीची किम्मत :** रुपये तीन लक्ष सोळा हजार सहाशे (रु. ३,१६,६००) **नोंदणी :** दुय्यम निबंधक, अमरावती यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक १९६ वर सन २००३ च्या जानेवारी महिन्याच्या १७ तारखेस नोंदला.

### टू इन वन

२६. निवासाच्या पुढील सोईसाठी दहा बारा हजार रुपये खर्चून ५-१० रुपये फूटाने गावात जागा घेण्यापेक्षा शहराच्या थोडे बाहेर आपण गेलो तर तेवढ्याच रकमेत १०-१५ हजार फूट जागा आपल्याला घेता येईल. ५-१० गुंठ्याच्या जागेत करता येण्यासारखा बियाणे प्रकल्प राबविता येईल. तेथेच पुढे घरसुद्धा बांधता येईल असा विचार करुन पहाणीला सुरुवात केली. विदर्भ महाविद्यालयाच्या पुढे नवसारी ग्रामपंचायत भागात प्रख्यात धन्वंतरी डॉ.मुदलीयार यांच्या शेतात नगरपालिकेतील काही मंडळींनी ले-आऊट कनर्व्हशन करुन प्लॉट्स पाडल्याचे कळले. आम्ही दोन चार लोकांनी पहाणी करुन हिंमत लावण्याचा विचार पक्का केला. परिशिष्ट १ मधील मालमत्ता क्रमांक १,२,३,४ जानेवारी १९७० मध्ये व क्रमांक ५ फेब्रुवारी १९७२ मध्ये संपादन करण्यात आली. माझ्या महाविद्यालयातील ४-५ प्राध्यापकांनी, इतर ४-५ मित्रांनी सुद्धा त्याठिकाणी प्लॉट घेतले. परिशिष्ट ३ मधील क्रमांक तीनवरील प्लॉट सुद्धा जानेवारी १९७० मध्ये संपादन करण्यात आला. त्यामध्ये विहीर प्रयत्नपूर्वक तयार करुन घेण्यात आली, बांधण्यात आली, खोल करुन घेण्यात आली. गृहनिर्माण संस्था करुन घर बांधण्याचा विचार सुरुवातीला समोर असला तरी तो पूर्णत्वाला गेला नाही. बियाणे प्रकल्पासाठी जागा मात्र चांगली उपलब्ध झाली.

### एच फोर बियाणे निर्मितीच्या प्रक्रियेला सुरुवात

२७. सन १९७२-७३ या वर्षामध्ये एच फोर बियाण्याच्या निर्मितीच्या या कार्यक्रमाला मौजे नवसारी येथील शेत सर्व्हे नंबर ४१/२ मधील जवळजवळ अर्धा एकर जागेवर (सध्याचे माझे रहाते निवासस्थान) आम्ही सुरुवात केली. मादीवाणाची लागवड, नरवाणाची लागवड, संकर पद्धतीची प्रक्रिया, पीकसंरक्षण योजना, बियाण्याचे प्रमाणीकरण, याबाबतीत अतिशय समृद्ध असा अनुभव या वर्षामध्ये घेता आला. उपरोक्त सर्व बाबीचे फॉर्म व प्रोफॉर्मे तयार करणे व त्याचे काटेकोर वेळापत्रक तयार करणे व हिशेब ठेवणे हा एक वेगळाच अनुभव होता. वर्षाच्या शेवटी भरघोस उत्पन्नामुळे पुढच्या म्हणजे १९७३-७४ वर्षापासून फारच काळजीपूर्वक हे काम पार पाडण्यात आले. त्यासाठी चांगली यंत्रणा उभी करण्यात आली. १९७३ पासून पुढे प्रत्येक कामाच्या बारकाईने नोंदी ठेवण्यात आल्या. **मुद्दाम नमुना म्हणून १९७३-७४ या एका वर्षातील या संदर्भात करण्यात आलेले काम तपशीलाने नमूद करण्याचे ठरविले आहे.**

### सन १९७३-७४ च्या प्रक्रियेचे तपशील

२८. सन १९७३-७४ या एका वर्षामध्ये करण्यात आलेल्या याबाबतच्या सर्व प्रक्रिया पुढील प्रमाणे :-

१. **मादीवाण व नरवाण** :- कापसाच्या एच फोर या संकरित बियाणे निर्मितीच्या कार्यक्रमामध्ये "गुजराथ ६७" ही कापसाची जात, मादीवाण म्हणून वापरण्यात आलेली होती व "अमेरिकन नेक्टरलेस" या जातीचा नरवाण म्हणून वापर करण्यात आला होता. वस्तुतः या दोनही प्रकारच्या झाडाला आपणहून (सेल्फींग) येणाऱ्या प्रत्येक फुलामध्ये पुंकेसर व स्त्रीकोष हे दोनही भाग असतात. संकरप्रक्रियेमध्ये गुजराथ ६७ च्या झाडाच्या प्रत्येक फुलातील पुंकेसर काढून टाकायचा व फक्त स्त्रीकोष वापरायचा म्हणून त्याला मादीवाण व अमेरिकन नेक्टरलेसच्या झाडाच्या प्रत्येक फुलातील पुंकेसर या प्रक्रियेत वापरावयाचा व त्यातील स्त्रीकोष काढून टाकायचा म्हणून त्याला नरवाण म्हणायचे.

२. **मादीवाणाची व नरवाणाची लागवड** :- गुजराथ ६७ या मादीवाणाच्या कापसाच्या झाडाला अंदाजे ९० दिवसांनी व अमेरिकन नेक्टरलेस या नरवाणाला अंदाजे ४० दिवसांनी फुले येणार. संकर कार्यक्रम यशस्वी व्हावयाचा असेल तर

*(परिशिष्ट : ४)*

**STATEMENT**

**of particulars regarding the amount received by Prof. B.T.Deshmukh on account of, Original Retirement Gratuity & Commutation of Pension, Revised Retirement Gratuity & Commutation of Pension, Final payment of G.P.F. and P.P.F. account**

| Sr. No. | Date of Payment | Particulars | Amount |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | 23.06.1998 : | P.P.F.Amount | 1,35,857.00 |
| 2. | 24.09.1999 : | Retirement Gratuity | 1,58,425.00 |
| 3. | 02.10.1999 : | Commutation of Pension | 1,07,361.00 |
| 4. | 29.10.1999 : | Final Payment of G.P.F. | 97,863.00 |
| 5. | 06.01.2001 : | Revised Gratuity | 91,575.00 |
| 6. | 17.11.2000 : | Revised Commutation | 2,17,076.00 |
| 7. | | Total | 8,08,157.00 |

**Notes :** (1) The amount mentioned at Sr.No.1 above is due to Closure (after extention) of the PPF Account On Maturity of Account No. P.P.F./ 7 (opend on 25th May 1978) under Public Provident Scheme 1968. Closed on 23rd June 1998. Total Amount Received on maturity is Rs. 1,35,857.

(2) The amount of Gratuity mentioned at Sr.No.2 above was sanctioned as a Retirement Gratuity Payment by Accountant General Maharashtra II Nagpur vide his order No. PR Cell/PRIV/ RIV/OC 249/99-2000 Dated 2.8.1999.

(3) The amount of Commutation of Pension mentioned at Sr.No.3 above was sanctioned as a Payment of Commutation of Pension by Accountant General Maharashtra II Nagpur vide his order No. PR Cell/PRIV/RIV/OC 249/99-2000/2297 Dated 2.8.1999.

(4) The amount mentioned at Sr.No.4 above is the Final Payment of G.P.F. amount after closure due to retirement by Principal S.S. College, Amravati vide Cheque No. 156735 dated 25.10.1999

(5) The amount mentioned at Sr.No.5 above was sanctioned as revised Retirement Gratuity Payment by Accountant General Maharashtra 2 Nagpur vide his order No. PR IV/RIV/OC 249/ 99-2000 Dated 27.07.2000.

(6) The amount mentioned at Sr.No.6 above was passed as a revised Payment of Commutation of Pension by Accountant General Maharashtra 2 Nagpur vide his order No. PR Cell/PRIV/ RIV/OC 299/99-2000/2298040 Dated 09.10.2000.

******

*(परिशिष्ट : ५)*

## उपलब्ध निधीचा विनियोग

सोबत परिशिष्ट ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध झालेला एकूण निधी रुपये ८,०८,१५७.०० असून त्याचा जो विनियोग करण्यात आला त्याची वेळोवेळीनंतरची अंतिम व आजची स्थिती पुढील प्रमाणे आहे.

### कर्जफेड व परतफेड

| | रुपये |
|---|---|
| (१) कर्जफेड परिच्छेद ४५ (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे | ८४,०२१ |
| (२) कर्जफेड परिच्छेद ४५ (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे | ५०,००० |
| (३) परतफेड परिच्छेद ४५ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे | ५०,००० |
| (४) इतर लहान मोठी देणी चुकती केली | १८,२९१ |
| **गुंतवणूक** | |
| (५) वरिष्ठ पेन्शन विमा योजना | २,५५,८४५ |
| (६) पोस्टाची ज्येष्ठ नागरिक बचत योजना | ३,५०,००० |
| एकूण | ८,०८,१५७ |

******

दोनही वाणांचा 'फ्लॉवरींग पिरीयड' हा एका वेळी येईल अशा बेताने तेवढ्या दिवसांचे अंतर ठेवून ही लागवड करावी लागत असे. १९७३-७४ च्या या हंगामात संकरित बियाणे निर्मितीच्या कामासाठी ३५८ झाडे मादीवाणाची, ६ फूट बाय ५ फूट अंतरावर व २०० झाडे नरवाणाची ३ फुट बाय २ फुट अंतरावर लावली होती.

३. **निर्बिजीकरण** :- मादीवाणाच्या प्रत्येक फुलातील (खरे म्हणजे अगोदरच्या दिवशी कळीतील) पुकोष (नरवाण) काढून टाकणे म्हणजे निर्बिजीकरणाची प्रक्रिया होय. उद्या सकाळी ज्या कळीचे फुल होणार ती पूर्ण वाढ झालेली प्रत्येक कळी पहिल्या दिवशी हुडकून काढणे, निर्बिजीकरण करतांना प्रथम पात्या, कच्च्या कळ्यांचे वेष्टण व पुकोषगुच्छ नखाच्या सहाय्याने कळीच्या इतर भागाला इजा न पोचविता काढून टाकणे, पुकोष गुच्छ काढल्यानंतर एकही पुकोष किंवा त्याचा तुकडा गर्भाशयास चिकटून राहणार नाही याची खात्री करुन घेणे, निर्बिजीकरण केलेल्या फुलावर इतर कुठूनही दुसरे पराग येवू नये म्हणून तांबड्या रंगाची पिशवी बसविणे, ह्या निर्बिजीकरणातील मुख्य प्रक्रिया होत. तांबडी कागदी पिशवी बसविण्याचा आणखी एक उपयोग असा की निर्बिजीकरण केलेले फूल नेमके कोठे आहे हे त्यामुळे दुसऱ्या दिवशी परागीकरणासाठी चटकन लक्षात येई. निर्बिजीकरणाची ही पूर्ण क्रिया दररोज दुपारी २ ते ६ या वेळात करावयाची.

४. **परागीकरण** :- जेवढ्या फुलांचे (पक्व कळ्यांचे) अगोदरच्या दिवशी २ ते ६ या वेळांत निर्बिजीकरण करावयाचे, तेवढ्यांचे दुसऱ्या दिवशी सकाळी ९ ते १२ च्या दरम्यान परागीकरण करावयाचे. दुसऱ्या दिवशी सूर्य किरणांच्या दर्शनाने उमललेली नरजातीची फुले आणायची किंवा कळ्या लवकर तोडून सूर्यप्रकाशात उमलल्यावर त्यातील पुंकेसर किंवा परागकण एक एक लाल पाकीट काढून मादी फुलावरील स्त्रीकेसराग्र ओलसर चिकट असतांना स्त्रीकेसरावर हळुवारपणे फिरवायाचे, जेणे करुन सर्व बाजूला बिजधारणा व्हावी यासाठी स्त्रीकेसराच्या चारही बाजूला नरपराग सिंचन करायचा. दुसरे कोणतेही पराग तेथे पोचू नयेत म्हणून परागीकरण झालेल्या फुलावर पांढरी पिशवी किंवा स्ट्रॉची पुंगळी ठेवून पुढच्या फुलाच्या परागीकरणाकडे वळायचे.

५. **निर्बिजीकरण व परागीकरणाचा कार्यक्रम** :- १९७३-७४ च्या या कार्यक्रमाला १ ऑक्टोबर १९७३ ला सुरुवात झाली व तो कार्यक्रम ३१.१२.१९७३ ला संपला. अगोदरच्या दिवशी जेवढ्या फुलांचे निर्बिजीकरण करायचे तेवढ्याच फुलांचे दुसऱ्या दिवशी परागीकरण करायचे. १ ऑक्टोबर १९७३ पासून तर ३१ डिसेंबर १९७३ पर्यंत हा कार्यक्रम (एक दिवसाचा अपवाद वगळता) दररोज सुरू होता. २६ ऑक्टोबर १९७३ रोजी दुपारी खूप पाऊस झाल्याने त्या एका दिवशी कार्यक्रम पूर्णपणे बंद ठेवावा लागला. दुसऱ्या दिवशी सकाळी मादी झाडांच्या अंगावर उमललेली सर्व फुले तोडून टाकावी लागली. पहिल्या दिवशी म्हणजे १.१०.१९७३ ला ५०० फुलांचे निर्बिजीकरण झाले. रोज वाढत जावून १५ दिवसांनी ते १५.१०.१९७३ रोजी १ हजार फुलापर्यंत गेले. पुढे वाढत ३० व ३१ ऑक्टोबर रोजी दरदिवशी २५०० फुलांवर गेले. पुढे नोव्हेंबरच्या पहिल्या १४ दिवसात ते २००० ते २४०० च्या दरम्यान राहीले. १४ व १५ नोव्हेंबर १९७३ या दोन दिवशी ते पुन्हा दरदिवशी २५०० पर्यंत पोचले व पुढे कमी होत गेले. १५ डिसेंबर नंतर ते ५०० ते ७०० च्या दरम्यान राहीले. सर्वात कमी २८ डिसेंबर १९७३ रोजी ३०० इतके खाली उतरले. अगोदरच्या दिवशी एखाद्या फुलाचे निर्बिजीकरण झालेले नसेल तर दुसऱ्या दिवशी त्या फुलाचे स्वपरागीकरण (सेल्फींग) होत असल्यामुळे ते फूल तोडून फेकावे लागत असे. हवामानातील बदल व झाडावरील फलधारणा लक्षात घेऊन ३१ डिसेंबर १९७३ रोजी कार्यक्रम थांबला.

६. **फुटलेल्या बोंडाची वेचणी** : बीजीकरणानंतर बोंडाची वाढ होण्यापासून तर परिपक्व होण्यास व बोंड फुटण्यास साधारणपणे ६० दिवसाचा अवधी लागतो. असे फुटलेले प्रत्येक बोंड वेचून आणणे व त्याचा कापूस गोळा करण्याचे काम अतिशय काळजीपूर्वक करावयाचे असते. संकरित न झालेले बोंड काळजीपूर्वक बाहेर काढावे लागते. प्रत्येक बोंडाच्या देठाशी दोरा बांधला असणे ही संकरित बोंड असल्याची कृत्रिम खूण होय. बोंडाच्या भोवतीच्या पात्या कापलेल्या नसणे ही असंकरित बोंड असल्याची नैसर्गिक खूण होय. थोड्याशा सरावाने मजुराला सुद्धा असंकरित बोंड चटकन ओळखता येते. दोरा नाही व पाती आहे असे बोंड हुडकणाऱ्या मजुराला प्रत्येक बोंडामागे मजुरीत उत्तेजना दिली तर ते काम आणखीनच मनापासून होते व भेसळीपासून बचाव होण्याची शंभर टक्के खात्री त्यातून निर्माण होते. फुटलेल्या बोंडांच्या वेचणीचा हा कार्यक्रम ४ डिसेंबर १९७३ रोजी सुरू झाला. पहिल्या दिवशी १८० बोंडाची वेचणी झाली. डिसेंबरभर दर दुसऱ्या दिवशी ही वेचणी सुरू होती. २८ डिसेंबर १९७३ ला जास्त म्हणजे १५०० बोंडाची वेचणी झाली. जानेवारी १ पासून तर ३१ पर्यंत हा कार्यक्रम दररोज चालला. दररोज १ हजार ते २००० च्या दरम्यान ही संख्या असायची. त्या महिन्यात २४ जानेवारीला ती सर्वात जास्त म्हणजे २२०० होती. १ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या काळात पहिल्या आठवड्यात दररोज व पुढे ३-४ दिवसात एकदा तोडणी झाली. २८ फेब्रुवारी १९७३ ला फुटलेल्या बोंडातील कापसाच्या वेचणीचा कार्यक्रम पूर्णपणे थांबला.

७. **झालेल्या एकूण खर्चाचे खातेवार तपशील** : प्रत्येक बाबीचे तपशीलवार फॉर्म, प्रोफॉर्मे, नमुने व विवरणपत्रे चक्रमुद्रित करुन ठेवलेली व त्यानंतर दरवर्षी, दरवेळी व दरबाबतीत भरलेली असल्याने प्रत्येक बाबींच्या काळजीपूर्वक नोंदी ठेवलेल्या आहेत. १९७३-७४ या वर्षातील या प्रकल्पावरील एकूण खर्च रुपये ४७४९.६० एवढा आला. या खर्चाच्या महिनावार नोंदी ठेवल्या आहेत तशाच त्या खातेवार ठेवल्या आहेत. खातेवार खर्च पुढील प्रमाणे :-

(१) **मजुरी खाते** रु. २७७५.९० : वर्षभर १ किंवा २ मजुरावर काम भागत असले तरी प्रत्यक्ष निर्बिजीकरणाच्या व परागीकरणाच्या कामी दररोज ६ पासून तर १३ पर्यंत मजुरांची गरज पडली या खात्यावर सर्वात जास्त खर्च झाला.

(२) **पीकसंरक्षण खाते** रु. ३६१.०० : पीक संरक्षणखात्यावर मुख्यत्वे कीटकनाशकावर होणारा खर्च येतो. थिमेट, सॉलव्हारॅक्स, नुव्हाक्रॉन, डेमॅक्रॉन, एंड्रीन, एकाड्रीन, सेविन, सिबा डीडीटी, प्लॅनोफिक्स, कॉपर ऑक्सीक्लोराईड, गंधक भुकटी ८० टक्के इत्यादी किटकनाशकांच्या वापरावरील हा खर्च.

*(परिशिष्ट : ६)*

## STATEMENT
### of Details of the Surrender Value of life Insurance Policies of Prof. B.T.Deshmukh

Date of Commencement of the policy is shown in Column No. 2 of the table, Policy No. in Column No. 3, Sum assuared is shown in Column No. 4, Normal Date of Maturity in Column No. 5, Surrender value on 13.11.1985 in Column No. 6, Loan and interest on the said policies in Column No. 7 and 8 respectively, Total thereof in Column No. 9, Net amount payble and Actually paid by LIC on 30.11.85 in Column No. 10 of Table.

TABLE

| S. | Date of Commencement | Policy No. | Sum Assured | Date of N. Maturity |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | 28.03.1971 | 19906912 | 15,000 | 28.03.1996 |
| 2. | 10.08.1973 | 19988089 | 10,000 | 10.08.1988 |
| 3. | 18.02.1977 | 20124593 | 20,000 | 18.02.1997 |

| S. N. | Surrender Value on 30.11.85 | Deduction Loan | Interest | Total | Net Amount payable |
|---|---|---|---|---|---|
| | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1. | 7389.70 | 4310 | 260.80 | 4570.80 | 2818.90 |
| 2. | 5359.90 | 1390 | 169.80 | 1559.80 | 3800.10 |
| 3. | 6375.30 | 2930 | 209.50 | 3139.50 | 3235.80 |
| | 19124.90 | 8630 | 640.10 | 9270.10 | 9854.80 |

**Note :-** (A Loan of Rs. Ten Thousand Five Hundred and Sixty Eight and paise Sixty (10568.60) only was granted by LIC of India Amravati Branch vide cheque No. AMV LIC 08429 dated 6.10.82)

*(परिशिष्ट : ७)*

## STATEMENT
### of Maturity value of National Savings Certificates (VIth issue) purchased during 1982 to 1986

The date of purchase is given in Column No. 3 and purchase amount is in Column No. 2, date of maturity is in Column No. 4 and amount received after maturity is shown in Column No. 5 of the Table.

TABLE

| S. N. | NSC VIth issue purchase Amount | Date | Sixth year completed on | Maturity Value |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | 2000 | 29.10.1982 | 29.10.1988 | 4,030 |
| 2. | 6000 | 10.05.1983 | 10.05.1989 | 12,090 |
| 3. | 2000 | 30.01.1984 | 30.01.1990 | 4,030 |
| 4. | 10000 | 09.06.1984 | 09.06.1990 | 20,150 |
| 5. | 10000 | 05.02.1985 | 05.02.1991 | 20,150 |
| 6. | 10000 | 29.03.1986 | 29.03.1992 | 20,150 |
| | **TOTAL** | | | **80,600** |
| Amount used (See para 45/6) | | | | 60,000 |

(३) **संकरण साहित्यावरील खर्च** रु. १९५.०० : यामध्ये मुख्यत्वे दोरा, लाल पाकीटे, स्ट्रॉ ट्युब्ज, हा प्रमुख खर्च.

(४) **खताकरिता लागलेला खर्च** रु. ३२६.०० : उत्तम कुजलेले शेणखत एक ट्रक, युरीया २ पोते, सुफला २ पोते, सुपर फॉस्पेट २ पोते, म्युरेट ऑफ पोट्याश २ पोते असा हा खर्च.

(५) **बीज प्रमाणिकरण प्रक्रिया खर्च** रु. ४०७.२५ : शासकीय यंत्रणेमार्फत बिजप्रमाणिकरण प्रक्रियेसाठी भरावे लागलेले शुल्क.

(६) **इतर खर्च रु. ६८४.४५ :** नांगरणे, वखरणे, बियाणे, ओलीतासाठीची जुळवाजुळव, शोल्डर स्प्रेपंप भाडे, नारळदोरी, सुतळी, लहान प्लॅस्टीक बॅग, व इतर खर्चाचा यात समावेश आहे.

(७) **एकूण खर्च रुपये** ४७४९.६०

**८. झालेल्या एकूण खर्चाचे महावार तपशील :** निरनिराळ्या खात्यावर झालेला रुपये ४७४९.६० हा खर्च दरमहा कशा रितीने झाला हे पाहिले असता सर्वात जास्त खर्च नोव्हेंबर १९७३ मध्ये झाला व तो एकूण ९२४.२० रुपये होता. सर्वात कमी खर्च मे १९७३ या महिन्यात झाला व तो रुपये १५३.०० होता. (एप्रिल मध्ये : निरंक) स्तंभ १ मध्ये अ.नं., स्तंभ २ मध्ये महिना, ३ मध्ये त्या महिन्यातील खर्च व ४ मध्ये त्या महिन्यापर्यंत झालेला एकूण खर्च दाखविला आहे. तो पुढील प्रमाणे :-

| अ.न. | महिना | महिन्यातील खर्च रुपये | एकूण क्रमवर्धी खर्च रुपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | मे १९७३ | १५३.०० | १५३.०० |
| २. | जून १९७३ | ९०६.९० | १०५९.९० |
| ३. | जुलै १९७३ | १९६.८५ | १२५६.७३ |
| ४. | ऑगस्ट १९७३ | १८५.०० | १४४१.७५ |
| ५. | सप्टेंबर १९७३ | २२१.९५ | १६६३.७० |
| ६. | ऑक्टोंबर १९७३ | ७७४.८५ | २४३८.५५ |
| ७. | नोव्हेंबर १९७३ | ९२४.२० | ३३६२.७५ |
| ८. | डिसेंबर १९७३ | ३८८.०० | ३७५०.७५ |
| ९. | जानेवारी १९७४ | ४२७.०५ | ४१७७.८० |
| १०. | फेब्रुवारी १९७४ | १८२.८० | ४३६०.६० |
| ११. | मार्च १९७४ | ३८९.०० | ४७४९.६० |
| १२. | एप्रिल १९७४ | ... | ४७४९.६० |
| | एकूण | | ४७४९.६० |

**९ बीजप्रमाणीकरण यंत्रणेकडे पोचविलेल्या कापसाचे तपशील :**

१९७३-७४ च्या या कार्यक्रमात हाती आलेला कापूस नीट वेचून दोन लॉटमध्ये शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे सोपविला. तेथे सरकी व रुई वेगळी काढणे, सरकीची स्वच्छता करणे, चाळणी करणे, त्यानंतर एक एक किलोची बॅग तयार करणे, त्या प्रत्येक बॅगेमधून काढलेले नमुना बी एकत्र करुन शासकीय प्रक्षेत्रावर पाठविणे, पुढच्या काही आठवड्यात उगवण शक्ती व शुद्धता या कसोट्यांवर बियाणे पास होवून आल्यावर प्रत्येकी १ किलोच्या त्या बॅगला प्रमाणपत्र लावून मोहरबंद करण्याचे काम शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून पार पाडले गेले. त्याचे तपशील पुढील प्रमाणे :-

**सन १९७३-७४ या वर्षातील संकरीत ४ कापूस बिजोत्पादन**

**मार्च-एप्रिल-मे १९७४**

शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे सोपविलेल्या कापसाचे तपशील

(वजनाचे आकडे क्विंटलमध्ये)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कापूस केंद्रावर नेल्याची तारीख | ११ जानेवारी १९७४ | ४ मार्च १९७४ |
| २ | एकूण कापूस | १.०७ | १.५७ |
| ३ | निघालेली सरकी | ०.७१ | १.०३ |
| ४ | निघालेली रुई | ०.३४ | ०.५३ |
| ५ | किडक सरकी | ०.०३ | ०.०७ |
| ६ | एकूण तयार बॅग्ज | ६७ | ९४ |
| | एकूण बॅग्ज (प्रत्येकी १ किलोची बॅग) | | १६१ |

**११. विक्रीची व्यवस्था व झालेले उत्पन्न :** सदरहू बिजोत्पादन कार्यक्रम घेतांना शासनाबरोबर जो करारनामा करावा लागत असे त्यामध्ये तयार झालेले प्रमाणीत बियाणे शासनाला विकणार? की स्वतः विकणार? ही बाब सुद्धा नमुद करावी लागत असे. १९७३-७४ च्या करारनाम्यामध्ये बियाणे शासनाला विकत देणार असे आम्ही लिहून दिले होते. त्याप्रमाणे ते शासनाला दिले. शासनाने प्रति किलो ७५ रुपये असा भाव त्यावर्षी दिला. (१) पहिला लॉट प्रमाणीत बियाणे प्रत्येकी १ किलोच्या ६७ मोहरबंद बॅग्ज. जिल्हा कृषी अधिकारी अमरावती यांनी अमरावती जिल्हा सहकारी बँकेच्या रेखांकित धनादेश क्रमांक B/No. 054069 अन्वये रुपये ५०२५.०० प्रदान केले (२) दुसरा लॉट प्रमाणीत बियाणे प्रत्येकी १ किलोच्या ९४ मोहोरबंद बॅग्ज. जिल्हा कृषी अधिकारी अमरावती यांनी अमरावती जिल्हा सहकारी बँकेच्या रेखांकित धनादेश क्रमांक B/No. 0065165 अन्वये रुपये ७०५०.०० प्रदान केले (३) एकूण ८७.०० किलो रुई स्वतंत्रपणे ९२२.०० रुपयाला विकली. अंती बियाणे उत्पादनाच्या या कार्यक्रमात एकूण रुपये १२,९९७.९५ चे सकल उत्पन्न झाले.

**११. उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद :** १९७३-७४ च्या संकरीत बियाणे निर्मितीच्या या प्रकल्पामध्ये आलेले सकल उत्पन्न १२,९९७.९५ रुपये होते, झालेला एकूण खर्च ४७४९.६० रुपये होता व आयकरमुक्त निव्वळ उत्पन्न ८२४८.३५ रुपये झाले. आज सन २००४ मध्ये वाचणाराला ही रक्कम लहानशी वाटेल पण पुढच्या करनिर्धारण वर्षात (A.Y.1974-75) सादर केलेल्या आयकर विवरणपत्रानुसार माझे १९७३-७४ या आर्थिक वर्षाचे 'करपात्र वेतन उत्पन्न' रुपये ७८६७.७८ होते हे लक्षात घेतले तर त्यावेळी रुपये ८२४८.३५ हे आयकरमुक्त निव्वळ उत्पन्न भरभक्कम व उत्साहवर्धक वाटले. उत्साह द्विगुणित करणारेसुद्धा ठरले.

**१९७४-७५ चा वरलक्ष्मी व एचफोर बिजोत्पादनाचा कार्यक्रम**

२९. **एच फोरचा वाढीव कार्यक्रम :** सन १९७३-७४ मध्ये आलेल्या अनुभवामुळे सन १९७४-७५ या वर्षात आणखी मोठ्या प्रमाणात हा कार्यक्रम घेण्यात आला. दप्तरी असलेल्या महाराष्ट्र राज्य कृषी खात्याच्या बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या क्षेत्रतपासणी अहवालावरुन असे दिसून येते की एच फोरच्या संकरित बियाणे उत्पादनाच्या या कार्यक्रमासाठी ५३३ मादीवाणाची झाडे व ३१५ नरवाणाच्या झाडांची लागवड करण्यात आली.

**वरलक्ष्मीचा नविन कार्यक्रम :** कर्नाटकातील कृषी विद्यापीठाने वरलक्ष्मी हे कापसाचे नविन संकरीत बियाणे समोर आणले होते. 'लक्ष्मी' या कापसाच्या जातीचा मादीवाण म्हणून व 'एस.बी.२८९' या जातीचा नरवाण म्हणून वापर करावयाचा, एवढा एक फरक सोडला तर बाकी संकर प्रक्रिया ही पूर्णपणे एच फोर बियाण्याप्रमाणेच होती. ४३० मादीवाणाची व २१० नरवाणाची लागवड करुन हा दुसरा वरलक्ष्मीच्या संकरित बिजोत्पादनाचा कार्यक्रम १९७४-७५ यावर्षी घेण्यात आला.

**उत्पादित बियाण्याचा अधिकृत तपशील :** एच फोर व वरलक्ष्मीचा शासकीय प्रक्रिया केंद्रावरुन परत आणतांनाचा उत्पादित बियाण्याविषयीचा शासकीय कागदपत्रातील अधिकृत तपशील पुढील प्रमाणे :-

**सन १९७४-७५ या वर्षातील कापसाचे संकरीत एच फोर व वरलक्ष्मी कापूस बियाण्याचे बिजोत्पादन**

मार्च-एप्रिल-मे १९७५

शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे दिलेल्या कापसाचे तपशील

(वजनाचे आकडे क्विंटलमध्ये)

| | एच फोर | | वरलक्ष्मी | |
|---|---|---|---|---|
| १. केंद्रावरून परत मिळाल्याची तारीख | २७ फेब्रु. १९७५ | ३१ मार्च १९७५ | ३ जाने. १९७५ | २९ मार्च १९७५ |
| २. एकूण कापूस | १.३४ | १.०८ | १.४९ | ०.५५ |
| ३. निघालेली सरकी | ०.९४ | ०.७८ | १.०३ | ०.३७ |
| ४. निघालेली रुई | ०.४२ | ०.३३ | ०.४५ | ०.१७ |
| ५. किडक सरकी | ०.०३ | ०.०३ | ०.०४ | ०.०३ |
| ६. एकूण तयार बॅग्ज | ८४ | ७२ | १०० | ३३ |
| ७. एकूण बॅग्ज | | १५६ | | १३३ |
| ८. दोन्ही जातीचे एकूण प्रमाणित बियाणे (प्रत्येकी १ किलोची बॅग).. २८९ | | | | |

**१९७४-७५ पासून विक्री व्यवस्थेमध्ये बदल**

३०. सन १९७३ मध्ये एकूण १६१ बॅग्ज (प्रत्येकी १ किलो) प्रमाणित संकरित बियाण्याची पैदास झाली होती. १९७४-७५ मध्ये दोनही जातीच्या मिळून २८९ बॅग्ज प्रमाणित बियाण्याची पैदास झाली. दोनही जातींना अतिशय चांगली मागणी होती. शिवाय विक्री व्यवस्थेमध्ये आम्ही बदल केला होता.

१९७३-७४ मध्ये सर्व बियाणे शासनाला दिले होते. ज्या भावाने शासन घेणार त्यापेक्षा प्रत्येक बॅगेला १५ ते २० रुपये जास्त भावाने ते बाजारात विकले जाणार, मात्र बिजोत्पादकांने स्वतः घरुन ते विकतो म्हटले तर बाजारातील भावापेक्षा खात्रीचे बियाणे म्हणून प्रत्येक बॅगेला बाजारभावापेक्षा ५ ते १० रुपये जास्त मिळणार. याबाबतचे 'नाव' एकदा मिळाले की केवळ बिजोत्पादकांवरील विश्वासाच्या पोटी १५ ते २० रुपये सुद्धा जास्त द्यायला उत्पादक मागेपुढे पहात नाहीत, असा अनुभव आला. १९७४-७५ पासून घरुनच बियाण्याची विक्री करण्याचा निर्णय आम्ही घेतला व त्यानंतर हा उपक्रम सुरु असेपर्यंत तो कायम ठेवला. प्रत्येक वर्षीच्या या विक्रीच्या उत्तम नोंदी (पावती स्वरुपात) विशिष्ट चक्रमुद्रीत नमुन्यात द्विप्रतीतील पुस्तकांच्या माध्यमातून स्थळप्रतीच्या स्वरुपात ठेवल्या आहेत (१) बिजोत्पादकांचे नाव (२) शासकीय लॉट नंबर (३) बियाणे खरेदीदाराचे नाव व पत्ता (४) प्रत्येक बॅगेचा प्रमाणपत्र नंबर (५) खरेदी केलेल्या एकूण बॅग्ज (६) एकूण किम्मत म्हणून मिळालेली रक्कम (७) वर नमूद केलेल्या लॉटमधील नमूद केलेल्या क्रमांकाच्या बॅग्ज मिळाल्याबद्दल खरेदीदाराची सही याबाबी काळजीपूर्वक स्थळप्रतीमध्ये नोंदलेल्या आहेत.

### ४ एकर ३० गुंठे शेताचे संपादन

३१. माझे आज जे निवासस्थान आहे ते त्यावेळी नवसारी ग्रामपंचायतीचा भाग होते. या ले-आऊटमध्ये माझ्याशिवाय माझ्या ४-५ मित्रांनी व माझ्या महाविद्यालयातील चार पाच प्राध्यापकांनी प्लॉट घेतलेले होते. तात्पुरती व्यवस्था म्हणून १९७३-७४ व १९७४-७५ च्या कार्यक्रमाच्या वेळी तात्पुरते कुंपण घालून तेथे बिजोत्पादन कार्यक्रम घेण्यामधील एक मोठी अडचण म्हणजे गुरांचा त्रास ही होती. शिवाय अशी व्यवस्था किती दिवस चालणार? या विचारातून व बिजोत्पादनातून मिळालेल्या यशातून स्वतंत्र शेत घेण्याची कल्पना समोर आली. बिजोत्पादनाचा कार्यक्रम मुख्यत्वे श्रीमती देशमुखांच्या नावे असल्याने शेतही त्यांच्याच नावे घ्यावे असाही निर्णय घेतला. सर्व तऱ्हेच्या पहाणीनंतर घरापासून ५ मिनीटाच्या स्कुटरच्या प्रवासांतरावर मुख्य रस्त्यावरील ४ एकर ३० गुंठे शेताचे संपादन रुपये २० हजाराला करण्यात आले. (परिशिष्ट एक मधील मालमत्ता क्रमांक सहा) व्यवहार पूर्ण करण्याकामी जवळ असलेल्या दोन मालमत्ता विकून टाकल्याने मदत झाली. परिशिष्ट ३ मधील मालमत्ता क्रमांक एक जून १९७३ मध्ये पूर्णपणे व तत्पुर्वी ऑगस्ट ७१ मध्ये त्याच परिशिष्टातील मालमत्ता क्रमांक तीन अंशतः विकल्याने काम सोपे झाले. शेती संपादनामुळे मोठ्या प्रमाणांत बिजोत्पादनाचा कार्यक्रम घेण्याचा मार्ग प्रशस्त झाला.

### १९७५-७६ मध्ये तीन प्रकारच्या संकरित बियाण्याचा कार्यक्रम

३२. सन १९७५-७६ या वर्षात कोईम्बतुरच्या तामिलनाडू कृषी विद्यापीठाने संशोधीत केलेली 'सी.बी.एस. १५६' ही एक कापसाची नविन संकरित जात (बियाणे निर्मितीसाठी) पुढे आलेली होती. एचफोर व वरलक्ष्मी या कपाशीपेक्षा तंतुच्या लांबीत व धाग्याच्या प्रतिमेत ही नवी जात श्रेष्ठ सांगितली गेली. तुलनात्मकदृष्ट्या एचफोर ५० काऊंट, वरलक्ष्मी ६० काऊंट, व सी.बी.एस. १५६ ही जात १२० काउंटच्यावर असल्याने त्याची गणना सुपरफाईन धाग्यात होते असे या संशोधकांचे म्हणणे होते. 'अकाला ग्लँडलेस' ही इजिप्शीयन कापसाची जात मादीवाण म्हणून व बारबॉडेन्स जातीत मोडणारी 'शॉर्ट ब्रँच १०८५-६' ही जात नरवाण म्हणून या प्रक्रियेत वापरण्यात आली होती. बाकी सर्व संकर प्रक्रिया एचफोर प्रमाणेच होती. त्यामुळे १९७५-७६ या वर्षात तीन प्रकारच्या या संकरीत बियाण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

**उत्पादित बियाण्याचा अधिकृत तपशील :** शासकीय प्रक्रिया केंद्रावरुन परत आणतांनाचा उत्पादित बियाण्याविषयीचा शासकीय कागदपत्रातील अधिकृत तपशील पुढील प्रमाणे :-

**सन १९७५-७६ या वर्षातील एच फोर, वरलक्ष्मी व सी.बी.एस. १५६**

संकरीत कापूस बिजोत्पादन कार्यक्रम : मार्च-एप्रिल-मे १९७६

शासकीय बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडून मिळालेल्या बियाण्याचे तपशील

(वजनाचे आकडे क्विंटलमध्ये)

(१) एच फोर संकरित बियाणे (प्रमाणित) शासकीय लॉट नंबर 7KS-20-59-828 (शासकीय बिजप्रमाणिकरण प्रक्रिया शुल्क रुपये ४१०.५०) कापूस २.३६, सरकी १.६१, रुई ०.७५, प्रत्येकी १ किलोची एक याप्रमाणे तयार झालेल्या प्रमाणित बियाण्याच्या बॅग्ज १४५

(२) एच फोर संकरित बियाणे (प्रमाणित) शासकीय लॉट नंबर 7KS-20-59-838 (शासकीय बिजप्रमाणिकरण प्रक्रिया शुल्क रुपये १५६.१०) कापूस ०.८२, सरकी ०.५४, रुई ०.२६, प्रत्येकी १ किलोची एक याप्रमाणे तयार झालेल्या प्रमाणित बियाण्याच्या बॅग्ज ४८

(३) वरलक्ष्मी संकरित बियाणे (प्रमाणित) शासकीय लॉट नंबर 7KS-20-59-27 (शासकीय बिजप्रमाणिकरण प्रक्रिया शुल्क रुपये २३०.९०) कापूस १.२३, सरकी ०.८५, रुई ०.३७, प्रत्येकी १ किलोची एक याप्रमाणे तयार झालेल्या प्रमाणित बियाण्याच्या बॅग्ज ७७

(४) वरलक्ष्मी संकरित बियाणे (प्रमाणित) शासकीय लॉट नंबर 7KS-20-59-33 (शासकीय बिजप्रमाणिकरण प्रक्रिया शुल्क रुपये ४२.९०) कापूस ०.१२, सरकी ०.०८, रुई ०.०४, प्रत्येकी १ किलोची एक याप्रमाणे तयार झालेल्या प्रमाणित बियाण्याच्या बॅग्ज ०६

(५) सी.बी.एस.१५६ संकरित बियाणे (प्रमाणित) शासकीय लॉट नंबर 7KS-20-59-1004 (शासकीय बिजप्रमाणिकरण प्रक्रिया शुल्क रुपये २३६.८९) कापूस १.३१, सरकी ०.८८, रुई ०.४१, प्रत्येकी १ किलोची एक याप्रमाणे तयार झालेल्या प्रमाणित बियाण्याच्या बॅग्ज ७९

(६) सी.बी.एस.१५६ संकरित बियाणे (प्रमाणित) शासकीय लॉट नंबर 7KS-20-59-1022 (शासकीय बिजप्रमाणिकरण प्रक्रिया शुल्क रुपये ७५.०५) कापूस ०.६२, सरकी ०.३९, रुई ०.२१, प्रत्येकी १ किलोची एक याप्रमाणे तयार झालेल्या प्रमाणित बियाण्याच्या बॅग्ज २४

(७) तीनही वाण मिळून एकूण बॅग्ज : ३७९ (प्रत्येकी १ किलोची बॅग)

### एकाच प्रकारच्या संकरित बियाण्याचा कार्यक्रम घेण्याचा निर्णय

३३. सन १९७४-७५ या उत्पादन वर्षात दोन व सन १९७५-७६ या वर्षात तीन जातीच्या कापसाच्या संकरित बियाण्याच्या पैदासीचा प्रकल्प राबविला हे खरे पण त्यातून आलेल्या अनुभवातून यापुढे एकाच प्रकारच्या (एच फोर) संकरित बियाण्याचा कार्यक्रम घ्यायचा असा आम्ही निर्णय घेतला व तो शेवटपर्यंत कायम ठेवण्यात आला. सी.बी.एस. १५६ व वरलक्ष्मी या लांब धाग्याच्या कापसाच्या कमर्शियल उत्पादनाला त्यावेळी एकाधिकार योजनेमध्ये एच फोर या कापसाचाच भाव दिला जात असे. आपल्या कडील हवामानात एच फोर च्या मानाने बाकीच्या दोन जाती तग धरत नसत. 'फॅन्सी' म्हणून सुरुवातीला या बियाण्याला एच फोर बियाण्यापेक्षा जास्त भाव देऊनसुद्धा खरेदी केल्या गेले पण माझ्याकडील बियाणे घरुन ताबडतोब विकले जाण्यामध्ये 'खात्री' व मिळविलेले 'नाव' हा भाग जास्त होता.

### इकडच्या नरवाणाची फुले तिकडच्या मादीवाणात

३४. एक दोन वर्षानंतर आपल्या भागात वरलक्ष्मी व सी.बी.एस.१५६ चे संकरित बियाणे उत्पादन बंद होईल असे लक्षात येत असतांना आम्ही मात्र यापुढे फक्त एच फोर या एकाच जातीच्या बियाण्याच्या पैदासीचा कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेतला तो १९७५-७६ मध्ये एकाच प्लॉटवर तीन जातीच्या उत्पादनात जो एक विचित्र अनुभव आला त्यामुळे. एकाच प्लॉटवर अमेरिकन नेक्टरलेस, एस.बी.२८९ व शॉर्ट ब्रँच १०८५-६ अशा तीन प्रकारचे नरवाण व गुजराथ ६७, लक्ष्मी व अकाला ग्लँडलेस अशा तीन प्रकारचे मादीवाण यावर लक्ष ठेवणे व नियंत्रण ठेवणे ही मोठीच गुंतागुंतीची व तणावाची बाब झाली होती. प्रत्येक प्रकारातील मादीवाणाचे झाड आपल्या जाग्यावर स्थीर असले तरी नरवाणाची फुले ही मजूरांच्या हातातून चालत जाणार, कितीही म्हटले तरी अकुशल मजुरांकडून अपेक्षा ती किती करणार? ३०-४० मजूर असलेल्या प्लॉटवर एक दिवस इकडची नरफुले तिकडे घुसण्याचा प्रकार झाला. जाणिवपूर्वक कुणी काही केले होते अशातला भाग नव्हता. केवळ भरपूर पराग आहे एवढ्याच एका कारणावरून इकडच्या नरवाणाचे फुल तिकडच्या मादीवाणामध्ये वापरण्याचा प्रकार घडला. दुसऱ्या त्यातल्या त्यात माहितगार कुशल मजूराच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर हे किती चुकीचे काम झाले आहे याची सर्व मजुरात 'व्यापक' चर्चा झाली व प्लॉटवर हलकल्लोळ माजला. मी प्लॉटवर गेलो तर मला पाहताच "कस्तुराबाई" जोरजोराने रडायला लागल्या. झालेला प्रकार मी शांततेने ऐकून घेतला व मलासुद्धा दरदरुन घाम सुटला. स्वस्थचित्ताने विचार करुन ५ मिनिटात निर्णय घेतला. ही भेसळ किती भितीदायक आहे हे सर्वांना समजावून सांगितले व त्या दिवशी संकरित झालेली मादीवाणाच्या अंगावरील सर्व फुले तोडून टाकण्याच्या कामाला सुरुवात केली. (वेगवेगळ्या रंगाच्या स्ट्रॉ ट्युबजच्या पुंगळ्याचे तुकडे परागीकरणानंतर वापरण्यामुळे या कामात मदत झाली.) सर्व मजूरांना त्याच कामी लावले. ५-६ हजार फुले तोडून टाकावी लागलीत यामुळे माझ्यापेक्षा त्यांनाच वाईट वाटले. दुसऱ्या दिवशी पासून खूपच काळजीपूर्वक ते काम सुरु झाले. पुढच्या वर्षीपासून प्लॉटवर एकच नर व एकच मादीवाण ठेवण्याचा निर्णय मी घेऊन टाकलेला होता. बियाण्याची शुद्धता व उगवण शक्ती याची काळजी घेण्याच्या या भावनेमुळेच एकाही वर्षी आमचा एकही प्लॉट 'फेल' झाला नाही. हे नमूद करतांना मनाला अतीव समाधान वाटते. बियाणे शुद्ध स्वरुपात असले तर संकरित एच फोर कापसाच्या झाडाला ४० व्या दिवशी फुले यायला सुरुवात होऊन भरघोस कापूस शेतकऱ्याच्या हाती पडतो. बियाण्यात भेसळ असेल किंवा मादीवाणाचे सेल्फींग झाले असेल तर मोठ्या प्रमाणात मादीची झाडे उगवणार. ९० दिवसानंतर फुले येणार, तोपर्यंत पावसाळा संपून व ओल तुटून जमिनीला भेगा पडायला सुरुवात होणार. शेतकरी बिजोत्पादकाला शिव्याशाप देणार.

### १९७६ -७७ ते १९८२-८३ या वर्षातील बिजोत्पादन

३५. संकरित बियाण्याच्या बिजोत्पादनाच्या कार्यक्रमात काय प्रक्रिया अंतर्भूत असते? मादीच्या किती झाडांच्या कार्यक्रमाला एकूण खर्च किती येतो? सकल उत्पन्न किती होते? निव्वळ उत्पन्न किती रहाते? याची तपशीलवार बारीक सारिक माहिती १९७३-७४ च्या कार्यक्रमामध्ये दिली आहे. त्यानंतरच्या प्रत्येक वर्षाची माहिती देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही कारण ते एक पुस्तकच तयार होईल. दोन वाणांच्या संकरित बियाणे पैदासी मुळे १९७४-७५ चे थोडेसे तपशील दिले आहेत. तीन वाण घेतल्यामुळे १९७५-७६ चे त्याबाबतचे अनुषंगिक तपशील दिले आहेत. १९७६-७७ ते १९८२-८३ या सात वर्षाच्या कार्यक्रमाबाबत पुढील प्रमाणे सांगता येईल :-

(१) याकाळात व त्यापुढे फक्त एच फोर या एकाच बियाण्याचा कार्यक्रम घेतला.

(२) फॉर्म, प्रोफॉर्मे, नमुने, वेळापत्रक व पीकसंरक्षण यामध्ये अनुभवाने बिनचुकता आलेली होती. त्याप्रमाणे खर्च काटेकोरपणे होत असे व नियंत्रणात रहात असे.

(३) अनुभवामुळे मादी झाडांची संख्या पुढे पुढे वाढली व संकरप्रक्रियेवर हूकमी नियंत्रणामुळे बिजोत्पादन सुद्धा वाढत गेले. कोणत्याही वर्षी कोणताही लॉट 'फेल' झाला नाही.

(४) बियाण्याची खात्री व या कामात मिळविलेले नाव यामुळे बॅग्ज प्रमाणित होऊन आल्या की ८ दिवसात बियाणे घरुन विकल्या जात असे.

(५) ठोक भावात विकावे लागले असते तर ते बाजार भावापेक्षा कमी भावाने द्यावे लागले असते. घरुन विकल्यामुळे बाजारभावापेक्षा जादा भाव मिळत राहिला.

(६) प्रत्येक वर्षीच्या या विक्रीच्या उत्तम नोंदी (पावती स्वरुपात) विशिष्ट चक्रमुद्रीत नमुन्यात द्विप्रतीतील पुस्तकांच्या माध्यमातून स्थळप्रतीच्या स्वरुपात ठेवल्या आहेत (१) बिजोत्पादकांचे नाव (२) शासकीय लॉट नंबर (३) बियाणे खरेदीदाराचे नाव व पत्ता (४) प्रत्येक बॅगेचा प्रमाणपत्र नंबर (५) खरेदी केलेल्या एकूण बॅग्ज (६) एकूण किम्मत म्हणून मिळालेली रक्कम (७) वर नमूद केलेल्या लॉटमधील नमूद केलेल्या क्रमांकाच्या बॅग्ज मिळाल्याबद्दल खरेदीदाराची सही याबाबी काळजीपूर्वक स्थळप्रतीमध्ये नोंदलेल्या आहेत.

### २ एकर १९ गुंठे शेताचे संपादन

३६. मौजे नवसारी येथील सर्व्हे नंबर ११ मधील ४ एकर ३० गुंठे शेती १९७४ मध्ये संपादित केली होती. बिजोत्पादनाचा प्रकल्प उत्तम रीतीने कार्यान्वित झालेला होता व याच सर्व्हे नंबर मधील उर्वरित २ एकर १९ गुंठे भाग विक्रीला निघाला होता तो १९७९ मध्ये १४,९८८ रुपयाला संपादित केला. (परिशिष्ट एक मधील मालमत्ता क्रमांक सात)

### १९८३ -८४ या वर्षातील बियाणे उत्पादन

३७. सन १९८३ - ८४ या वर्षातील एच फोर संकरित बियाण्याच्या कार्यक्रमाविषयी वेगळी माहिती देत आहे. याचे कारण सर्वात जास्त बियाणे उत्पादन झाल्याचे हे वर्ष होय. एकूण ६३६ बॅग प्रमाणित बियाण्याची त्यावर्षी पैदास झाली. त्या वर्षी बियाण्याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा पडलेला असल्याने लॉट प्रमाणित होऊन आला की २४ तासात घरुन तो विकल्या जात असे. कडाडलेल्या भावामुळे बाजारापेक्षा भावसुद्धा चांगला मिळाला. शासकीय कागदपत्रावर आधारित उत्पादनाचे तपशील पुढील प्रमाणे :-

### सन १९८३-८४ या वर्षातील संकरीत एच फोर कापूस बिजोत्पादन

**मार्च-एप्रिल-मे १९८४**

**शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे सोपविलेल्या कापसाचे तपशील**

(वजनाचे आकडे क्विंटलमध्ये)

| अ.न. | शासकीय | K-83-20-59-01 | | | |
|---|---|---|---|---|---|
| | लॉट नंबर | 3508 | 3509 | 3547 | 3549 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| १. | उत्पादकाचे नाव | श्री.बी.टी. देशमुख | सौ.सु.भा देशमुख | श्री.बी.टी देशमुख | सौ.सु.भा. देशमुख |
| २. | एकूण कापूस | ३.०४ | ३.४६ | २.६८ | ०.८९ |
| ३. | निघालेली सरकी | २.०४ | २.३९ | १.८७ | ०.६१ |
| ४. | निघालेली रुई | ०.९३ | १.०७ | ०.८० | ०.२७ |
| ५. | किडक सरकी | ०.१० | ०.११ | ०.०९ | ०.०३ |
| ६. | एकूण तयार झालेल्या बॅग्ज | १९१ | २१७ | १७३ | ५५ |
| | एकूण बॅग्ज (प्रत्येकी १ किलोची बॅग्ज) | | | ६३६ | |

### शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून प्रमाणित करुन परत मिळालेल्या मोहोरबंद बॅगांचे तपशील

**(अ)** (१) उत्पादक : श्री.भाऊराव तुळशिरामजी देशमुख (२) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेला लॉट नंबर K-83-20-59-01 -3508 (३) प्रत्येकी १ किलो प्रमाणे मोहोरबंद केलेल्या बॅगांची संख्या : १९१ (४) शासकीय बीज प्रमाणिकरण यंत्रणेने प्रत्येक बॅगेला दिलेल्या प्रमाणपत्राचा (टॅग) नंबर ७६३८४७ ते ७६४०३७ = १९१

**(ब)** (१) उत्पादक : सौ.सुशिला भाऊराव देशमुख (२) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेला लॉट नंबर K-83-20-59-01 -3509 (३) प्रत्येकी १ किलो प्रमाणे मोहोरबंद केलेल्या बॅगांची संख्या : २१७ (४) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रत्येक बॅगेला दिलेल्या प्रमाणपत्राचा (टॅग) नंबर ७६४०३८ ते ७६४२५४ = २१७

**(क)** (१) उत्पादक : श्री.भाऊराव तुळशिरामजी देशमुख (२) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेला लॉट नंबर K-83-20-59-01 -3547 (३) प्रत्येकी १ किलो प्रमाणे मोहोरबंद केलेल्या बॅगांची संख्या : १७३ (४) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रत्येक बॅगेला दिलेल्या प्रमाणपत्राचा (टॅग) नंबर ७६५८१६ ते ७६५९८८ = १७३

**(ड)** (१) उत्पादक : सौ.सुशिला भाऊराव देशमुख (२) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेला लॉट नंबर K-83-20-59-01 -3549 (३) प्रत्येकी १ किलो प्रमाणे मोहोरबंद केलेल्या बॅगांची संख्या : ५५ (४) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रत्येक बॅगेला दिलेल्या प्रमाणपत्राचा (टॅग) नंबर ८०९३५६ ते ८०९४१० = ५५

**(इ)** एकूण बॅग्ज (प्रत्येकी १ किलोची बॅग्ज)...... ६३६

### सन १९८४-८५ या वर्षातील एच फोर बियाणे उत्पादन

३८.१. सन १९८४-८५ हे वियाणे उत्पादनाच्या या कार्यक्रमातील शेवटचे वर्ष. यावर्षी एकूण ४९७ बॅग्ज (प्रत्येकी १ किलोची बॅग) प्रमाणीत बियाण्याचे उत्पादन झाले. त्याचे अधिकृत तपशील पुढील प्रमाणे.

### सन १९८४-८५ या वर्षातील संकरीत एच फोर कापूस बिजोत्पादन

**मार्च-एप्रिल-मे १९८५**

**शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे सोपविलेल्या कापसाचे तपशील**

(वजनाचे आकडे क्विंटलमध्ये)

### शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून प्रमाणीत करुन परत मिळालेल्या मोहोरबंद बॅगांचे तपशील

(१) उत्पादक : श्री.भाऊराव तुळशिरामजी देशमुख (२) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेला लॉट नंबर K-84-20-59-01 -4 (३) प्रत्येकी १ किलो प्रमाणे मोहोरबंद केलेल्या बॅगांची संख्या : १९९ (४) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रत्येक बॅगेला दिलेल्या प्रमाणपत्राचा (टॅग) नंबर ९७०२३४ ते ९७०४३२ = १९९

(२) उत्पादक : सौ.सुशिला भाऊराव देशमुख (२) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेला लॉट नंबर K-84-20-59-01 -3 (३) प्रत्येकी १ किलो प्रमाणे मोहोरबंद केलेल्या बॅगांची संख्या : ९७ (४) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रत्येक बॅगेला दिलेल्या प्रमाणपत्राचा (टॅग) नंबर ९७०५३७ ते ९७०६३३ = ९७

(३) उत्पादक : श्री.भाऊराव तुळशिरामजी देशमुख (२) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेला लॉट नंबर K-84-20-59-01 -105 (३) प्रत्येकी १ किलो प्रमाणे मोहोरबंद केलेल्या बॅगांची संख्या : २०१ (४) शासकीय बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रत्येक बॅगेला दिलेल्या प्रमाणपत्राचा (टॅग) नंबर ९७३४२४ ते ९७३६२४ = १७३

(४) एकूण तयार झालेल्या बॅग्ज १९९ + ९७ + २०१ = ४९७ एकूण बॅग्ज (प्रत्येकी १ किलोची बॅग) ४९७

### बिजोत्पादन कार्यक्रमाचा संक्षिप्त आढावा

३८.२. बिजोत्पादन कार्यक्रमाचा एकत्रित आढावा घ्यायचा झाला तर तो पुढील प्रमाणे सांगता येईल (अ) १९७३-१९७४ मध्ये प्रमाणित बियाण्याचे १६१ बॅग्ज उत्पादन झाले. १९७४-७५ मध्ये दोन जातींचे मिळून २८९ बॅग्ज, १९७५-७६ मध्ये तीन जातीचे मिळून ३७९ बॅग्ज, (ब) १९८३-८४ मध्ये सर्वात जास्त म्हणजे ६३६ बॅग्ज, १९८४-८५ मध्ये ४९७ बॅग्ज (क) १९७६-७७ ते १९८२-८३ या सात वर्षाच्या काळात अंदाजे १९७५-७६ च्या उत्पादनापेक्षा (३७९ बॅग्ज) कमी नाही व १९८३-८४ च्या उत्पादनापेक्षा (६३६ बॅग्ज) जास्त नाही इतक्या बॅग्ज उत्पादन झाल्याच्या नोंदी आहेत. (ड) १९७३-७४ मध्ये तसा

करारनामा केल्यामुळे दरबॅगेला ७५ रुपये या भावाने संपूर्ण बियाणे शासनाला विकावे लागले, तेच बियाणे बाजारांत त्यावर्षी ९० रुपये, १०० रुपये या दराने विकले गेले. १९७३-७४ नंतरच्या सर्व वर्षात बियाणे घरुनच विकल्यामुळे १०० रुपयाच्यावर भाव मिळत गेला व काही वर्षामध्ये १५० रुपयाच्या सुद्धा वर मिळाल्याच्या नोंदी आहेत.

**वेतनवितरणाची नवी व्यवस्था स्थिरस्थावर झाली.**

३९.१ १९७२-७३ या वर्षी बियाणे प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आला. पुढे १९७३-७४ पासून तर १९८४-८५ पर्यंत म्हणजे जवळ जवळ १२-१३ वर्षे हा प्रकल्प जोरात सुरु होता. पहिल्या एक दोन वर्षे बराच वेळ या कामी द्यावा लागला. एकदा साऱ्या यंत्रणा बरोबर बांधून झाल्यावर पुढे त्यामानाने वेळ कमी द्यावा लागत असे. इकडे १९७३-७४ च्या दरम्यान संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर आली होती. विलंबाने वेतन होण्याच्या प्रश्नाने विदर्भभर जोरदार थैमान घातले होते. १९७७ मध्ये त्याविरुद्ध जोरदार आंदोलन विदर्भात झाले. वेतनवितरणाची नवी व्यवस्था ७७ मध्ये उदयास आली. ती १९७९ च्या दरम्यान स्थिरस्थावर झाली. संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी आल्यानंतर "अर्धा सेकंद वर्गात उशिरा जायचे नाही, एक मिनिट वर्ग अगोदर सोडायचा नाही, रजेचा अर्ज दिल्याशिवाय गैरहजर रहायचे नाही, प्रसंगी जादा तास घेऊन कां होईना पण अभ्यासक्रम पूर्ण केल्याशिवाय सोडायचे नाही, आपल्या विषयाचा उत्तम गृहपाठ करुनच वर्गात प्रवेश करावयाचा" या मूळातच पालन करीत असलेल्या मंत्राचे मी फारच काटेकोरपणे अनुपालन सुरु केलेले होते.

**रहाण्यासाठी घराच्या प्रश्नाबाबत संघटनेची भूमिका**

३९.२. राहण्याच्या निवासस्थानाबाबत काय झाले? त्याची माहीती आता नमूद करीत आहे. सन १९६० ते ७० च्या दशकात महाविद्यालयीन शिक्षकांच्या निवासस्थान विषयक प्रश्नाची काय स्थिती होती? हे समजून घेणे फारसे कठीण नाही. नुटाच्या तत्कालीन सचिवांनी संघटनेच्या वतीने १ डीसेंबर १९६४ रोजी महाराष्ट्र शासनाला सादर केलेल्या निवेदनाच्या (मेमोरँडम) परिच्छेद ८ मध्ये याबाबतचे प्रतिपादन पुढील शब्दात करण्यात आले होते. :-

"With the growth of population, housing problem has become very acute in cities like Nagpur, Amravati, Akola etc. Although there is good deal of building activity the house rent for a moderately descent accommodation are appreciably high. It is therefore suggested that the Government should take up house construction activity for providing suitable accommodation to teachers at reasonable rents. Good housing is one of the pre-conditions for creating atmosphere conducive to academic pursuits and research. It is also suggested that the Government may sell houses to the teachers on hire-purchase basis."(NB 2001 P 534)

**शेगाव नाक्याजवळ घर बांधण्याचा प्रयत्न**

४०. मालटेकडीजवळच्या विदर्भ हौसिंग कॉलनीमधील भाड्याने घेतलेल्या ब्लॉक नंबर १४ मध्ये मी निवासाला होतो. निवासस्थान खाली करण्याच्या वारंवार होणाऱ्या विनंतीमुळे यातून काहीतरी मार्ग काढण्याचा तातडीचा विचार समोर आला. हाउसिंग बोर्डाच्या मार्फत किंवा हाऊसिंग सोसायटीच्या मार्फत गृहनिर्माण हा त्यातल्यात्यात बरा मार्ग होता. पण तो सर्वांनाच पाहिजे त्यावेळी उपलब्ध असतो असे होत नाही. बऱ्याच शोधानंतर तो त्यावेळी मलाही उपलब्ध झाला नाही. शेगाव नाक्याजवळील प्लॉटवर (परिशिष्ट ३ मधील क्रमांक एक) तो प्रयत्न अयशस्वी झाला. तेव्हा गृहनिर्माणासाठी वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थाकडून कर्ज घेऊन त्याच प्लॉटवर घर बांधावे असा निर्णय घेतला. हिंद फायनान्स इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड या कंपनीकडे त्या प्लॉटचे (परिशिष्ट ३ मधील क्रमांक एक) साधे गहाणपत्र (सब रजिस्ट्रार अमरावती यांचे कार्यालयात बुक नं. १ अ च्या अ.नं. ७२२ वर दिनांक १० मार्च १९७० रोजी नोंदले) करुन रुपये बारा हजाराचे कर्ज मंजूर करुन घेतले. या लेखाच्या परिच्छेद २३ ते २६ मध्ये नमूद केलेल्या कारणासाठी घर बांधण्याचा प्रकल्प मौजे शेगाव वरुन मौजे नवसारीमध्ये आणावा लागला. ऋणकोला पूर्ण कल्पना देऊन घेतलेल्या १२ हजार रुपये कर्जातून नवसारी प्लॉटवर (विद्यमान निवासस्थान) घर बांधण्याच्या कामाला सुरुवात केली.

**नवसारी येथील विद्यमान घराचे बांधकाम**

४१. पुढे घराचे काम जोरात आल्यावर कर्जाची रक्कम १२ हजार रुपयाऐवजी २१ हजार रुपये वाढवून घेण्यात आली. शेगावचा प्लॉट गहाणपत्रातुन मोकळा करुन घेण्यात आला. नवसारीच्या प्लॉटचे (विद्यमान निवासस्थान) साधे गहाणपत्र करुन देण्यात आले. त्याचे तपशील पुढील प्रमाणे :-

"तारीख २९.४.१९७४, **गहाणपत्र लिहून देणार :** भाऊराव तुळशिरामजी देशमुख, **गहाणपत्र लिहून घेणार** : हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रिज अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड. **गहाण मालमत्तेचा तपशील :** मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे नंबर ४१/२, प्लॉट नंबर तीन (३), **एकूण क्षेत्रफळ :** ३०१० चौरस फुट, **कर्जाऊ काढलेली रक्कम** : रुपये एकविस हजार (रु. २१०००) **नोंदणी :** सब रजिस्ट्रार अमरावती टाऊन यांचे कार्यालयात पुस्तक क्रमांक १ च्या अनुक्रमांक ३५ वर सन १९७४ च्या एप्रिल महिन्याच्या २९ तारखेस नोंदला."

**स्थावर मालमत्ता क्रमांक ८ चे तपशील**

४२. **परिशिष्ट एक** मधील स्थावर मालमत्ता क्रमांक एक वर बांधलेले स्थावर मालमत्ता क्रमांक आठ हे माझे राहते निवासस्थान आहे. मूळात १२ हजार रुपये कर्ज काढून बांधकाम सुरु केलेले असले तरी पुढे हे कर्ज बारा हजारावरुन २१ हजार रुपये करुन १९७४ च्या शेवटी पूर्ण केलेले हे बांधकाम आहे. मूळातील बांधकाम अंदाजे एक हजार फुटांचे असून साध्या पद्धतीने केलेले असले तरी त्याची तांत्रिक बाजू अत्यंत उत्तम आहे. त्या काळामध्ये मी स्वतः शासकीय इंजिनिअरिंग क्रॉलेजमध्ये 'सामाजिक शास्त्रे' या विषयावर प्राध्यापक म्हणून व्याख्याने देण्यासाठी जात असे. तंत्रनिकेतन मध्ये त्यावेळी सिव्हील इंजिनिअरींग साठी अधिव्याख्याता म्हणून काम करित असलेले माझे मित्र श्री. जे.डी.(जगदीश) देशमुख यांनी ही तांत्रिक बाजू माझ्यावरील स्नेहामुळे अतिशय उत्तम रितीने सांभाळली. बांधकाम सुरु केले तेव्हा १२ रुपये २० पैसे सिमेंट पोत्याचा भाव होता व स्टेशनवरुन थेट १२५ पोते म्हणजे १ ट्रक माल उचलला तर १२ रुपये भावाने सिमेंट मुबलक उपलब्ध होते. 'आऊटर प्लॅस्टर' सोडून बांधकाम २१ हजार रुपयात त्यावेळी पूर्ण झाले. त्यानंतर मी माझा मुक्काम या निवासस्थानी हलविला. पुढे आऊटर प्लॅस्टरचे काम पूर्ण केले. त्यासाठी जवळजवळ १० हजार रुपये खर्च आला असे मूळातील ३१,००० रुपये किंमतीचे हे बांधकाम. खरे म्हणजे माझ्या कौटूंबिक गरजांसाठी १ हजार फुटाचे हे बांधकाम पुरेसे होते व आहेही पण विधानपरिषद सदस्य या नात्याने कामाचा पसारा बराच वाढल्यानंतर, सर्व खोल्यातून पुस्तकांची व फाईलांची झालेली वाताहत थांबविण्यासाठी व त्यांचा जास्त चांगला उपयोग व्हावा यासाठी पहिल्या मजल्यावर १ हजार फुटाचे "पुस्तकालय कम फाईलालय"चे काम पूर्ण करण्यात आले. कामाचे स्वरुप लक्षात घेऊन अमरावतीचे नामांकित गृहसजावट तज्ज्ञ श्री. विनोद राजुरकर यांनी या कामी विनापरिश्रमिक मदत व मार्गदर्शन केले. परिशिष्ट एकमधील १ते १० क्रमांकाच्या एकूण १० स्थावर मालमत्तांपैकी (क्रमांक ८ वरील एक मालमत्ता सोडून) इतर ९ मालमत्तांची **परिशिष्ट २** च्या स्तंभ ३ मध्ये दाखविलेली मूळ खरेदी किम्मत किंवा बांधकामाची किम्मत बिनचूक, काटेकोर व तंतोतंत बरोबर असून मालमत्ता क्रमांक ८ च्या (अमरावती येथील निवासस्थान) बाबतीत मात्र मुळात १९७२-७४ या काळात बांधलेल्या या निवासस्थानामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार सुधारणा करण्यात आल्या. अतएव असे नमूद करण्यात येते की नंतर करण्यात आलेल्या सुधारणांवरील खर्च हा स्तंभ ३ मध्ये दाखविलेल्या मूळ किमतीचा भाग नसून या एका मालमत्तेच्या (क्रमांक ८) बाबतीत तो स्तंभ ४ मध्ये दाखविलेल्या विद्यमान मूल्यमध्ये समाविष्ट आहे.

**विधानमंडळ सदस्यांकरिता गृह निर्माण संस्था**

४३. गृहनिर्माण संस्थेमार्फत घराचे बांधकाम हा खरे म्हणजे त्यावेळी अतिशय सुलभ मार्ग उपलब्ध होता. प्राध्यापकांच्या/ शिक्षकांच्या सुंदर वसाहती अनेक शहरामध्ये त्या व त्यानंतरच्या काळात निर्माण झाल्या. यवतमाळ, वाशिम, खामगाव, वरोरा, मुर्तिजापूर, कारंजा, वर्धा, लोणार, दिग्रस, पांढरकवडा, देऊळगाव राजा, चिखली, पुसद, शेगाव, मोझरी, आर्वी, वणी, काटोल, सावनेर, धामणगाव, ब्रम्हपूरी, मंगरुळपीर, मेहकर ही देण्यासारखी उदाहरणे आहेत. यातील काही ठिकाणी युजीसीच्या मदतीने किंवा महाविद्यालयाच्या प्रशासनाने 'स्टाफ क्वॉर्टर' या स्वरुपात निवासाची ही व्यवस्था केली असली तरी बहुतेक ठिकाणी प्राध्यापकांनी गृहनिर्माण संस्थेमार्फत ही निर्मिती केलेली आहे. अकोला येथे प्राचार्य डॅडी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली रणपिसे नगरमध्ये अनेक प्राध्यापकांची निवासस्थाने उभी झाली. नंतरच्या काळात खुद्द माझ्या महाविद्यालयातील सहकाऱ्यांनी विद्यापीठ रस्त्यावर 'शिवनेरी' ही टुमदार घरांची शानदार कॉलनी उभी केली. १९७० ते ७५ च्या दरम्यान खूप प्रयत्न करुनही मला या मार्गावरुन जाता आले नाही. कर्ज काढण्यापासून तर बांधकामापर्यंत साऱ्या बाबी व्यक्तीशः कराव्या लागल्या व ती एक मोठ्याच दगदगीची बाब होती. खूप प्रयत्न करुनसुद्धा गृहनिर्माण संस्थेमार्फत अमरावती येथे घर बांधण्याच्या कामात मला यश आलेले नव्हते. गृहनिर्माणार्थ वित्तीय पुरवठा करणाऱ्या खाजगी वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन विदर्भ महाविद्यालयाजवळील मौजे नवसारी शेत सर्व्हे नंबर ४१/२ मधील प्लॉट नंबर ३ वर तयार झालेल्या विद्यमान निवासस्थानी मी स्थानापन्न होऊन ७-८ वर्षाचा काळ झालेला होता. अशा स्थितीत मी विधानमंडळाचा सदस्य झाल्यानंतर सहा महिन्याचा काळ सुद्धा झालेला नसतांना, "सर्व विधानमंडळ सदस्यांची गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचे ठरले असून त्यासाठी प्राथमिक सदस्यत्वाची फी आपण भरावी."

असे पत्र मला विधानभवनातच कार्यालय असलेल्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयातून मिळाले. तसा भरणा केल्यावर त्याबाबतची जी पावती मिळाली ती पुढील प्रमाणे :-

..........................................................................................

"**विधानभवन मुंबई-४०० ०३९ : दिनांक १६ मार्च १९८१**

**आमदारांची नियोजित गृहनिर्माण संस्था**

आमदारांच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्राथमिक सदस्यत्वाची रक्कम रुपये २५१ (रुपये दोनशे एक्कावन्न) फक्त आपणाकडून मिळाली,

आपला विनित

मुख्य प्रवर्तक,

प्रति, श्री.बी.टी.देशमुख, वि.प.स."

..........................................................................................

**सदनिका संपादनार्थ आलेला एकूण खर्च**

४४. विधानमंडळ सदस्यांसाठी या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये प्राथमिक सदस्यत्व जरी १६ मार्च १९८१ रोजी देण्यात आले तरी पुढची दोन वर्षे त्याबाबत फार काही प्रगती झाल्याचे दिसून येत नाही. सन १९८३ मध्ये व त्यानंतर मात्र याबाबतच्या कामाने बराच वेग घेतला. २५ ऑगस्ट १९८३ पासून तर प्रत्यक्ष सदनिका सदस्यांच्या सुपुर्त करण्याच्या तारखेपर्यंत (१५ ऑक्टोबर १९९०) ७-८ वर्षाच्या काळात २,७०,२५२ रुपयाचा भरणा गृहनिर्माण संस्थेमध्ये करावा लागला. त्याशिवाय १ लक्ष रुपयाचे कर्ज महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन या वित्तिय संस्थेकडून गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून तसा अर्ज करणाऱ्या प्रत्येक सदस्याला उपलब्ध करुन देण्यात आले. अशा रितीने परिशिष्ट १ मधील स्थावर मालमत्ता क्रमांक १० च्या संपादनाचा एकूण खर्च रुपये ३,७०,२५२ एवढा आला.

**सदनिका संपादनार्थ खर्च केलेल्या निधीचे स्त्रोत**

४५. स्थावर मालमत्ता क्रमांक १० च्या संपादनार्थ **एकूण ३,७०,२५२ रुपये एवढा खर्च आला. यासाठी कामी आलेल्या निधीचे स्त्रोत मी काटेकोरपणे नमूद करु इच्छितो. ते पुढील प्रमाणे :-**

**(अ) कर्जाद्वारे**

**(१) रुपये १,०००,०० (एक लक्ष रुपये)** : वरळी सागर गृहनिर्माण सहकारी संस्था या संस्थेने तसा अर्ज करणाऱ्या आपल्या प्रत्येक सभासदाला महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटीव्ह हौसिंग फायनान्स कार्पोरेशन कडून १ लक्ष रुपयाचे कर्ज उपलब्ध करुन दिले होते. व्याजाला प्रथम प्राधान्य देऊन दर तीमाही हप्त्यात १५,९७९ रुपयेच्या मुद्दलाची परतफेड पुढील काळात करण्यात आली होती. उर्वरित ८४,०२१ रुपये मुद्दलाची परतफेड एक रकमी रेखांकित धनादेशाद्वारे ऑगस्ट १९९९ नंतर करण्यात आली. (परिशिष्ट ५ क्रमांक १ पहा)

**(२) रुपये ५०,००० (रुपये पन्नास हजार)** : वस्तुतः शेतीचा प्रकल्प उत्तम रितीने कार्यरत झालेला होता. या गोष्टीला १० वर्षाचा काळ झालेला होता. बियाण्याचे उत्पादन उत्तम सुरु होते. असे असतांना ४ एकर ३० गुंठे शेत बँक ऑफ इंडीयाकडे गहाण ठेवून ५०,००० हजार रुपयाचे कर्ज काढले. शक्य होईल तेवढे व्याज वेळोवेळी भरत राहून मूळ मुद्दल ५० हजार रुपये ऑगस्ट १९९९ नंतर परत केले व गहाणाची कागदपत्रे परत आणली. सोडवून परत आणलेल्या या कागदपत्रांच्या नस्तीमध्ये बँक ऑफ इंडीयाच्या अमरावती शाखेच्या Assistant Manager (Credit) यांनी १४ फेब्रुवारी २००२ रोजी सही शिक्क्यानिशी दिलेले एक Certificate असून त्यात असे नमूद आहे की, "The Property mortgaged to us as security for Advances is hereby released, survey No. 11 Mauje Navasari pra. Nandgaon peth Tal. Distt. Amravati Area 4 Acres 30 Guntha. Loan facility was as under : Loan for well Rs. 25000 and crop loan Rs. 25000" (परिशिष्ट ५, क्रमांक २ पहा)

**(ब) सहकाऱ्यांकडून सहकार्य**

**(३) रुपये ५०,००० (रुपये पन्नास हजार)** : भरणा करण्याच्या त्या ७-८ वर्षाच्या काळात २५ हजार रुपयाचे एक असे एकूण दोन इन्स्टॉलमेंट भरतांना वेळ अशी आली की त्या विशिष्ट तारखेच्या आत पैसे भरणे मला जवळ जवळ शक्य नव्हते. कामाचे स्वरुप माहित असलेल्या संघटनेतील माझ्या ज्येष्ठ सहकाऱ्यांनी या कामी मदत केली. **हे ५० हजार रुपये मला ऑगस्ट १९९९ नंतरच परत करता आले.** खाजगी व व्यक्तिगत व्यवहार असल्याने व मुख्य म्हणजे मी परवानगी घेतलेली नसल्याने नावाचा उल्लेख करणे अनुचित आहे. पण एक गोष्ट मी ठामपणे नमूद करु इच्छितो की घेतांना हे पैसे रेखांकित धनादेशाव्दारेच घेतले असून परत देतांनासुद्धा ते रेखांकित धनादेशाव्दारेच परत केलेले आहेत. (परिशिष्ट ५, क्रमांक ३ पहा)

**(क) आमदार होण्यापूर्वी घेतलेली मालमत्ता विकून**

**(४) रुपये ६२,४०० (रुपये बासष्ट हजार चारशे)** खरेदी केलेल्या पण नंतर विकलेल्या मालमत्तांचे तपशील परिशिष्ट ३ मध्ये नमुद केलेले आहेत. त्यातील क्रमांक (दोन) वरील १९७८ मध्ये (बियाणे प्रकल्पातून चांगले निव्वळ उत्पन्न झाल्याने व होत असल्याने गुंतवणूक म्हणून) घेतलेली मालमत्ता ऑक्टोबर १९८४ मध्ये विकून ६२४०० रुपये प्राप्त झाले. संदर्भीय वर्षाच्या आयकर विवरणपत्राच्या स्थळप्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सेक्शन ४८ (१), ४९, ५०, ५१, ५४ इ (१) आणि ८० टी (बी) अन्वये मिळणाऱ्या 'एक्झम्प्शन' व 'डिडक्शन' नंतर 'लॉंग टर्म कॅपिटल गेन्स' या मथळ्याखाली हे रुपये १४९१९ एवढे करपात्र उत्पन्न निश्चित झाले त्यावर आवश्यक तो कर भरुन हा सर्व निधी रुपये ६२,४०० या कामी यथावकाश व योग्य वेळी वळता करण्यात आला.

**(ड) आयुर्विमा महामंडळाच्या पॉलीसीज अकाली मोडून**

**(५) रुपये २०,००० (रुपये वीस हजार) : आयुर्विमा महामंडळाच्या पॉलीसीज अकाली मोडून मिळालेला निधी** :- १९७० ते ८० च्या दरम्यान मी भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या एकूण तीन पॉलीसीज घेतल्या होत्या. प्राध्यापक म्हणून सेवारत असतांना त्या त्या पॉलीसीजचे हप्ते दरमहा वेतनातून कपात होऊन महाविद्यालयामार्फत महामंडळाकडे जमा होत असत. आयकर पात्र उत्पन्नातून वजावट मिळविण्यासाठी सुद्धा त्याचा उपयोग होत असे. १९८२-८३ च्या दरम्यान ह्या पॉलीसीज चालू ठेवणे बरेच दगदगीचे झाले होते. त्या मोडून टाकाव्या असा विचार माझ्या मनामध्ये आला. "मी ह्या पॉलीसीज मोडून टाकू नये. गरजच असल्यास त्यावर कर्ज मिळू शकते, ते घ्यावे व गरज भागवावी पण पॉलीसीज चालू ठेवाव्या." असा सल्ला मला देण्यात आला. त्याप्रमाणे ऑक्टोबर १९८२ मध्ये मी या पॉलीसीजवर १०५६८.६० रुपयाचे कर्ज काढले. (A Loan of Rs. Ten Thousand Five Hundred and Sixty Eight and paise Sixty (10568.60) only was granted by LIC of India Amravati Branch vide cheque No. AMV LIC 08429 dated 6.10.82) १९८५ च्या दरम्यान मला याबाबतीत अनुभव असा आला की मी पूर्णवेळ रजेवर असल्यामुळे महाविद्यालयातून हप्ते भरले जाण्याचा प्रश्नच संपुष्टात आला होता. मूळ पॉलीसीजचे हप्ते भरणे व शिवाय कर्ज व त्यावरील व्याज भरणे हे एक जास्तीचे काम होऊन बसले. शिवाय निधीची समोर दिसणारी गरज लक्षात घेऊन जी काय "सरेंडर व्हॅल्यु" असेल त्या किंमतीला या पॉलीसीज मोडण्याचा मी निर्णय घेतला व तो १९८५ मध्ये अमलात आणला. माझे मित्र प्रा.राम काकाणी यांची या कामी मदत झाल्याने हे काम लवकर होऊ शकले. विमा पॉलीसीज मोडल्यामुळे उपलब्ध झालेल्या निधीचे तपशील **परिशिष्ट ६** मध्ये नमुद केले आहेत. असा निधी म्हणजे एकतर अगोदर घेतलेले कर्ज रुपये १०५६८.६० व त्यानंतर ३०.११.१९८५ ला सरेंडर व्हॅल्युपैकी कपात करुन मिळालेले ९८५४.८० रुपये असा एकूण रुपये २०४२३.४० एवढा धरता येइल किंवा सरळ सरळ ३१ नोव्हेंबर १९८५ रोजीची 'सरंडेर व्हॅल्यु' रुपये १९१२४.९० एवढा धरता येईल. त्यामुळे ढोबळमानाने या उद्भवातून उपलब्ध झालेला निधी रुपये २०,००० धरलेला आहे.

**(इ) पक्व बचत प्रमाणपत्रातून**

**(६) रुपये ६०,००० (रुपये साठ हजार) : नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटमधून उपलब्ध निधी** : वर्षभराचे आयकर पात्र उत्पन्न निर्धारित झाले की अशा उत्पन्नातून थोडीफार रक्कम सहा वर्षीय राष्ट्रीय बचत प्रमाण पत्रात गुंतविल्यास निर्धारित झालेल्या आयकरामध्ये घसघशीत वजावट मिळत होती. सहा वर्षानंतर गुंतविलेली रक्कम जवळ जवळ दुप्पट होवून परत मिळत असे. पुढच्या सर्व वर्षात मिळणारे व्याज (Interest accruing in each year) हे काल्पनिक असले तरी त्या त्या वर्षात दाखविले तर एका मर्यादेपर्यंत ते पूर्णपणे करमुक्त उत्पन्न असायचे. परिणामी सहा वर्षानंतर मिळणारी ही दुप्पट रक्कम सुद्धा पूर्णपणे करमुक्त मिळत होती. एका विशिष्ट रेषेवरील करदात्याने या सुविधेचा उपयोग न केल्यास करदायित्वात बरेच नुकसान सहन करावे लागते व उपयोग करणाऱ्याला त्याचे सर्व तपशील आयकर विवरणपत्रासोबत जोडावे लागतात. त्यामुळे Specified savings या सुविधेचा मी अनेक वर्षे वापर केला आहे, करीत आहे. त्याचे सर्व तपशील येथे देण्याची गरज नाही व आवश्यकताही नाही. तथापि, सन १९८२ ते सन १९८६ या काळात बचत प्रमाणपत्रात केलेली गुंतवणूक व सहा वर्षानंतर १९८८ ते १९९२ या काळात त्यातून उपलब्ध झालेला निधी याचा तपशील **परिशिष्ट** ७ मध्ये दिलेला आहे व तो त्या त्या वर्षाच्या आयकर विवरणपत्राच्या स्थळप्रतीवरुन घेतलेला आहे. ज्या काळात गृहनिर्माण संस्थेकडे भरणा करावयाचा होता, त्याच्या बरीच बाहेर पडत असल्याने अनुक्रम नंबर ६ वरील रक्कम धरलेली नाही. अनुक्रम नंबर ५ वरील रक्कम त्या काळाच्या थोडीशीच पुढे असल्याने धरलेली आहे. रुपये ८०,६०० ही एकूण रक्कम असली तरी प्रत्यक्षात अ. नं. ६ सोडूनच उर्वरित

निधी रुपये ६० हजार या कामासाठी वळता करण्यासाठी धरला आहे.

**(फ) स्वनिधीतून**

(७) **रुपये २८००० (रुपये अठ्ठावीस हजार)** : या सात आठ वर्षाच्या काळात हा उर्वरित निधी दर वर्षाच्या शेतीच्या व वैयक्तीक उत्पन्नाच्या ताळमेळातून वळता करण्यात आला.

**सभागृहाचे काम व संघटनांचे काम**

४६. सन २००४ मध्ये होऊ घातलेल्या निवडणूकीचा आर्थिक भार पार पाडण्यासाठी नुटाच्या कार्यकारी मंडळाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.:-

"१९८०, १९८६, १९९२ व १९९८ या चारही निवडणुकीमध्ये निवडणूक निधी समितीमार्फत सर्व केंद्रीय व्यवस्था आपली आपण सांभाळली होती व शिवाय आपल्या शहरात, आपल्या गावात आपल्या मतदान केंद्रावरील व्यवस्थासुद्धा आपली आपणच केली होती, तशीच ती आपण याही वेळेला पार पाडू. काळ बराच बदललेला आहे. बाहेर इतर कोणाला हे सांगितले तरी खरे वाटत नाही, असा आजचा काळ. या काळातही हे आपले "वैभव" आपण पूर्ण शक्तीनिशी कायम ठेवू......यापूर्वी चारही निवडणूकांच्या वेळी आपण आपल्या प्रतिनिधीला निवडणुकीत आर्थिक अडचण भासू दिली नाही. आर्थिक परावलंबनाने चालतांना वाटचालीत शिथिलता येऊ शकते, नको त्या काही मर्यादाही येऊ पाहतात म्हणून निवडणूक खर्चाची संपूर्ण तरतूद आपण यापूर्वी जशी केली तशीच ती यावेळीही करू. यात आपण सारेच कुठेही कमी पडणार नाही, असा निर्धार व आपल्या उज्ज्वल स्वावलंबनाच्या परंपरेला याही वेळी आपण कायम ठेवू असा आत्मविश्वास आपल्या ठिकाणी आहे. आपला प्रतिनिधी, आपल्या शक्तीवरच आपल्याला पाठवावयाचा आहे."

याबाबतच्या निर्णयाच्या अम्मलबजावणीला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळालेला आहे, मिळत आहे. सन २००४ च्या निवडणूकीसाठी सेवानिवृत्ती लाभातून पदरी पडलेली एखाद दुसरी गुंतवणूक मोकळी करुन थोडाफार खर्च करणे आज मला सहज शक्य आहे हे जेवढे खरे, तेवढेच हेही खरे की एकदा का एखादी निवडणूक धनशक्तीच्या आहारी गेली की मग "दोन चार शिक्षकांच्या रिटायरल बेनिफिटस्ची टोटल रक्कम" अशा निवडणूक खर्चाची वाढलेली भूक भागवितांना अल्पोपहाराला सुद्धा कमी पडते. यापूर्वीच्या चारही निवडणूकीमध्ये मला असा खर्च करण्याचा विचारसुद्धा करणे अशक्य होते. संघटनेने, शिक्षकांनी, मतदारांनी, पदवीधरांनी व हितचिंतकांनी जे आर्थिक पाठबळ त्या चारही वेळी उभे केले त्यामुळेच ते यश पदरी पडले हे निःसंशय होय. शिवाय या दुर्मिळ वैभवाचे आपण प्रतिनिधी आहोत याचा ठसा प्रतिनिधीच्या कामकाजावर व मनोधैर्यावर हमखासपणे उमटत असतो. सन १९८० मध्ये मी जो सभागृहात निवडून गेलो तो "शिक्षक- कर्मचारी- पदवीधर" यांचा प्रतिनिधी म्हणून. सहा वर्षाच्या या पहिल्या कार्यकालाच्या उत्तरार्धात "अमरावती पाणी पुरवठा योजना" व "अप्पर वर्धा धरणाचे बांधकाम" या प्रश्नाबाबत सभागृहामध्ये मोठ्या उठावाची सुरुवात करावी लागली. त्याच काळात दांडेकर समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्याने आमचे डोळे खाडकन उघडले. १९८० ते १९८६ च्या पहिल्या कार्यकाळात बियाणे प्रकल्प चालूच होता. चांगला जोरात होता. सन १९८३-८४ या वर्षात महत्तम म्हणजे ६३६ बॅग्ज बियाणे उत्पादन झाले होते. उत्तम भाव मिळत होते. पण मनामध्ये असमाधान होते. आपला किती वेळ या कामामध्ये जात आहे? या नुसत्या विचाराने सुद्धा अपराधीपणाची भावना मनात येत होती. जनाची नसली तरी माणसाला मनाची टोचणी असतेच. लोकप्रतिनिधीचा दिवस सुद्धा २४ तासाचाच असतो आणि त्याचा तासमुद्धा ६० मिनिटाचाच असतो. लोकप्रतिनिधीने स्वतःच्या खाजगी प्रकल्पाकडे जास्त वेळ देतो म्हटले की त्याचा प्रतिनिधी म्हणून करावयाच्या कामासाठीचा तेवढा वेळ कमी होतो. १९८६ मध्ये आपण पुन्हा निवडून गेलो तर १९८०-८४ चा अनुशेष भरून काढायचाच असा मनोमन निर्धार केला होता. १९९२ व १९९८ या तर पुढच्या निवडणूका आहेत. सन १९८६ मध्ये मी दुसऱ्यांदा सभागृहामध्ये ज्या वैभवी पाठबळावर पुन्हा निवडून गेलो त्या पाठबळाने काही ठाम निर्णय घेण्याचे बळ मला दिले. १९८६ च्या दुसऱ्या निवडणूकीनंतर मी काही धोरणात्मक निर्णय घेतले ते पुढील प्रमाणे :-

**(१) सभागृहाच्या व संघटनांच्या कामामध्ये संपूर्ण वेळ द्यायचा.**

**(२) सभागृहाच्या कामामध्ये प्रश्नांची मांडणी करण्यासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या संघटना व अशा प्रश्नांची मांडणी करण्यात रस घेणाऱ्या सर्वच संघटनांच्या कामासाठी प्राथम्याने वेळ द्यायचा.**

**(३) मानवी विकासामध्ये सर्वात महत्वपूर्ण असलेल्या शिक्षणाच्या संधीची उपासना करणाऱ्या क्षेत्राचे आपण प्रतिनिधी आहोत याचे सतत स्मरण ठेवणे हे आपले काम आहे.**

**(४) सर्वच आघाड्यांवर व सर्वच क्षेत्रात सर्वात जास्त अनुशेष असलेल्या विभागाचे आपण प्रतिनिधी आहोत, याचे कधीही विस्मरण होऊ देता कामा नये.**

**(५) व्यवसायातून मी पूर्णवेळ सुटी काढलेलीच होती. १९८६ नंतर भरपूर पैसा देणारा पण खूप वेळ खाणारा बियाणे प्रकल्प सुद्धा थांबविण्याचा निर्णय घेतला. परिणामी पूर्ण सात आठ एकरावर वार्षिक पीक न घेता १०-१२ वर्षे पुरणारी निलगिरीची लागवड करण्याचा निर्णय घेतला व तो अमलात आणला.**

**(६) नविन कोणतीही स्थावर मालमत्ता घेण्याचा आता यापुढे विचार सुद्धा करु नये असा निर्णय घेतला व १९८६ मध्ये घेतलेला हा निर्णय पुढची १८ वर्षे काटेकोरपणे पाळला.**

**अध्ययन, मनन, चिंतन, अभ्यासाधारित विश्लेषण, उपाययोजनांचे निदान व निदानोत्तर निष्कर्षाची अम्मलबजावणी, या साधनांच्या वापरासह कोणत्या कामी वेळ द्यावा व कोणत्या कामी तो देऊ नये याविषयी स्पष्टपणे धोरणात्मक मार्गदर्शन करणारे हे निर्णय होते. ते मी आपल्यापुरते घेतले व काटेकोरपणे पाळले.** मी कोणत्या मार्गावरुन वाटचाल करीत आहे याची जाणीव असलेल्या आमच्या संघटनेने व संघटनेतील सहकाऱ्यांनी माझ्या या वाटचालीला मदतीच्या व सहकार्याच्या कवचकुंडलांनी समृद्ध केले. १९९२ चा नुटा बुलेटीनचा "जलसिंचन अनुशेष विशेषांक" किंवा १९९६ चा "अनुशेष विशेषांक" किंवा १९९८ मध्ये संघटनेने प्रसिद्ध केलेले "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष क्ष किरण परीक्षा" हे पुस्तक ही याची जिवंत उदाहरणे आहेत. एका व्यवसायातील व्यावसायिकांसाठी काम करणाऱ्या एखाद्या व्यावसायिक संघटनेने विभागाच्या सर्वांगाला चाटुन जाणाऱ्या व त्रस्त करणाऱ्या अनुशेष निर्मूलनाच्या कामामध्ये, त्यांत अंतर्भूत असलेल्या आर्थिक भारासह जबाबदारी स्वीकारुन, एवढे काम केल्याचे महाराष्ट्रात दुसऱ्या एखाद्या संघटनेचे उदाहरण असेल काय? अर्ध्या डझनाच्या जवळपास गावांसाठी पाणीपुरवठ्याचे विशेषांक काढण्यासाठी केलेल्या धावपळीतून समोर येणारा संघटनेचा सहभाग निश्चितच लक्षात घेण्यासारखा नाही काय?

ही गोष्ट खरी आहे की, माझ्या या निर्णयामुळे १९८६ ते १९९८-९९ पर्यंतची १०-१२ वर्षे मला आर्थिकदृष्ट्या दगदगीची गेली. प्रसंगी तशीच वेळ आली तर एखादी दुसरी स्थावर मालमत्ता मोडून टाकू पण वाटचाल याच मार्गावरुन करु हे मी ठामपणे ठरविले होते. माझ्या या वाटचालीत तशी वेळ माझ्यावर आली नाही याचे कारण संघटनेतील माझे सहकारी माझ्या या वाटचालीवर संरक्षणात्मक सूक्ष्म लक्ष ठेवून होते याला आहे. या लेखाच्या परिच्छेद ४५ (३) मध्ये किंवा परिशिष्ट ८ मधील क्रमांक ८ मध्ये याची काही उदाहरणे आपल्याला सापडतील.

**स्थावर मालमत्तांची संख्या व मूळ खरेदी किम्मतीचे तपशील**

४७. **सन १९६४ ते आजपावेतोच्या काळात संपादित केलेल्या स्थावर मालमत्तांची एकूण संख्या १० असून त्यांची मूळ खरेदी किंमत चार लक्ष सहासष्ट हजार दोनशे तीस (रु. ४,६६,२३०) रुपये आहे. त्यांचे तपशीलवार विवरण परिशिष्ट १ व २ मध्ये दिलेले आहे. परिशिष्ट १** मध्ये सुरुवातीला अनुक्रम नंबर व मालमत्ता संपादनाची (खरेदीची) तारीख दिली आहे. त्यानंतर खरेदीकर्त्याचे नाव, मालमत्तेचा तपशील,एकूण क्षेत्रफळ, खरेदीची किम्मत व नोंदणी दस्तऐवजाचे अधिकृत तपशील नमुद केलेले आहेत. प्रत्येक स्थावर मालमत्तेची खरेदीची मूळ किम्मत व विद्यमान मूल्य नमूद असलेले विवरणपत्र **परिशिष्ट २** मध्ये दिलेले आहे. त्या परिशिष्टाच्या स्तंभ दोनमध्ये खरेदीची किंवा बांधकामाची तारीख दिली असून स्तंभ ३ मध्ये खरेदीची मूळ किम्मत नमूद केलेली आहे. १ते १० क्रमांकांच्या एकूण १० स्थावर मालमत्तांपैकी (क्रमांक ८ वरील एक मालमत्ता सोडून) इतर ९ मालमत्तांची स्तंभ ३ मध्ये दाखविलेली मूळ खरेदी किम्मत किंवा बांधकामाची किम्मत बिनचूक, काटेकोर व तंतोतंत बरोबर असून मालमत्ता क्रमांक ८ च्या (अमरावती येथील निवासस्थान) बाबतीत मात्र मूळात १९७२-७४ या काळात बांधलेल्या या निवासस्थानामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार सुधारणा करण्यात आल्या. मूळ किम्मत ही १९७२-७४ मध्ये करण्यात आलेला रुपये २१ हजाराचा खर्च व त्यानंतर १० हजार रुपये बाहेरच्या प्लॅस्टरचा खर्च अशी एकूण ३१,००० रुपये धरण्यात आली आहे. अतएव असे नमूद करण्यात येते की नंतर करण्यात आलेल्या सुधारणावरील खर्च हा स्तंभ ३ मध्ये दाखविलेल्या मूळ किमतीचा भाग नसून या एका मालमत्तेच्या (क्रमांक ८) बाबतीत तो स्तंभ ४ मध्ये दाखविलेल्या विद्यमान मूल्यमध्ये समाविष्ट आहे.

**स्थावर मालमत्तांचे विद्यमान मूल्य**

४८. **परिशिष्ट २** चे काळजीपूर्वक अवलोकन केले तर असे दिसून येईल की या १० पैकी विधान परिषद सदस्य होण्यापूर्वी १ ते ८ क्रमांकाच्या स्थावर मालमत्ता संपादन करण्यात आल्या असून दोन मालमत्ता नंतर खरेदी केलेल्या आहेत. त्यांची एकूण मूळ खरेदी किम्मत रुपये ४,६६,२३० आहे. स्तंभ ४ मध्ये विद्यमान मूल्य नमूद केलेले असून ते रुपये ३४,६६,७९२ (रुपये चौतीस लक्ष सहासष्ट हजार सातशे ब्याण्णव) इतके आहे.

**जंगम मालमत्तांचे तपशील परिशिष्ट ८ मध्ये दिलेले आहेत. त्यांची एकूण संख्या ८ आहे. त्यापैकी बहुतांशी गुंतवणूक ही सेवानिवृत्ती लाभांशी संबंधित आहे.**

*(परिच्छेद ५६ पहा)*

**स्थावर मालमत्तांच्या विद्यमान मूल्यांच्या निर्धारणाचे मापदंड**

४९. निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये जो नमुना ठरवून दिला आहे, त्या नमुन्यामध्ये प्रत्येक स्थावर मालमत्तेच्या बाबतीत त्या मालमत्तेचा ठावठिकाणा (Location) व मोजमाप नमूद केले पाहिजे. त्याच बरोबर त्या मालमत्तेचे विद्यमान मूल्य नमूद केले पाहिजे असेही म्हटले आहे. विद्यमान मूल्य कसे काढावे? याबाबतचे कोणतेही मापदंड आयोगाने विहित केलेले नाहीत. मूळ खरेदी किम्मत आणि विद्यमान मूल्य यातील फरक हा "रुपयाचे घसरलेले मूल्य व त्यापोटी मालमत्तांच्या किंमतींच्या महागाईवृद्धीदराचा वाढता निर्देशांक" यांचे प्रतिनिधित्व करीत असतो. त्यामध्ये मालमत्ताधारकाच्या कर्तृत्वाचा भाग किती असतो? ही गोष्ट प्रत्येकालाच ठाऊक आहे. अशा स्थितीत मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन बडेजाव मिरविण्यासाठी किम्मती खूप फुगवून नमूद करणे व 'वैभव' लपविण्याच्या हेतूने मालमत्तांच्या संकोच केलेल्या किंमती दाखविणे, हे दोनही मार्ग उमेदवारांना खुले राहतात. विद्यमान मूल्य शास्त्रीय आधारावर काढण्यासाठी काही अधिकृत मापदंड उपलब्ध नाहीत काय? याची बरीच चौकशी या क्षेत्रातील तज्ज्ञांकडे केली असता "मालमत्तांच्या किंमतीच्या महागाईवृद्धीदराचा निर्देशांक" नमूद असलेले अधिकृत नोटीफीकेशन दरवर्षी जुन-जुलै मध्ये किंवा त्यानंतर भारत सरकारतर्फे प्रकाशित करण्यात येते अशी माहिती मिळाली. याबाबतचे लेटेस्ट नोटीफीकेशन २९ जुन २००४ रोजी निघालेले आहे. (Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207) मूळ मालमत्ता ही कोणत्या वर्षी संपादित करण्यात आली? ती काय किंमतीला संपादित करण्यात आली? त्यात काही सुधारणा करण्यात आल्या काय? आल्या असल्यास कोणत्या वर्षी? व त्यासाठी किती खर्च करण्यात आला? इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन मालमत्तांच्या किमतीच्या महागाईवृद्धीदराच्या निर्देशांकाप्रमाणे वाढीव किम्मत किती धरावी याचे काटेकोर मापदंड या परिपत्रकान्वये ठरवून दिले असून मालमत्तांचे विद्यमान मूल्य त्या आधारे निश्चित केलेले आहे. Current market value is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207)

**स्थावर मालमत्तांची खरी संख्या तीन**

५०. कायदेशीररीत्या स्थावर मालमत्तांची एकूण संख्या १० असून ती तशी स्वतंत्रपणे **परिशिष्ट १** मध्ये दाखविलेली आहे. व्यावहारिक अर्थाने विचार करु जाता ह्या एकूण मालमत्तांची संख्या तीन आहे हे मी नमूद करु इच्छितो : (१) अमरावती येथील विदर्भ महाविद्यालयाजवळील राहते निवासस्थान व त्याला लागून असलेली मोकळी जागा. अर्थात आयकर कायद्याच्या परिभाषेत Self Occupied House Property असे तीचे वर्णन करता येईल. यामध्ये **परिशिष्ट १** मधील क्रमांक १ ते ५ व ८ अशा १० पैकी ६ मालमत्ता समाविष्ट आहेत. (२) विधानमंडळ सदस्यांच्या गृहनिर्माण संस्थेतील सदनिका ही दुसरी मालमत्ता असून तीचे वर्णन **परिशिष्ट १** च्या क्रमांक १० वर दिलेले आहे. आयकर कायद्याच्या परिभाषेत याला Another Self Occupied House Property असे म्हणता येईल. (३) शेतजमीन ही तिसरी स्थावर मालमत्ता आहे. **परिशिष्ट १** च्या क्रमांक ६ व ७ वर त्याचे तपशील दिले आहेत. व्यावहारिकरित्या स्थावर मालमत्तांची ही संख्या तीन असून त्यामध्ये १० पैकी (क्रमांक ९ वरील मालमत्ता सोडून) इतर ९ मालमत्ता समाविष्ट आहेत. क्रमांक ९ ची मालमत्ता ही एक लहानशी गुंतवणूक आहे. सन १९७० मध्ये अगदी गावाबाहेर सध्याच्या निवासस्थानी ज्यावेळेला हे प्लॉट आम्ही घेतले त्यावेळी माझ्या श्वशुरांनी त्यात काही प्लॉट घेतले होते. अगदी काटेकोरपणे विचार करु जाता परिशिष्ट एक मधील स्थावर मालमत्ता क्रमांक ३ व ४ तसेच परिशिष्ट आठ मधील जंगम मालमत्ता क्रमांक ७ ह्या श्रीमती देशमुखांकडील वडिलोपार्जित मालमत्ता म्हणता येतील.

**उत्पन्नाची इतर विधिमय माध्यमे**

५१. केवळ विधानपरिषद सदस्य झाल्यानंतरच्याच काळात नव्हे तर १९६४ पासून तर २००४ पर्यंतच्या काळात संपादन केलेल्या स्थावर मालमत्तांचे तपशील **परिशिष्ट एक** मध्ये नमूद केलेले असून त्यांच्या संपादनासाठी वापरलेल्या निधीचे स्त्रोत पूर्वपरिच्छेदातून तपशिलाने नमूद केलेले आहेत. याशिवाय या ४० वर्षांच्या काळातील विविध विधिमय माध्यमांच्याद्वारे संपादन केलेल्या उत्पन्नाचे सारे तपशील नमूद करण्याची आवश्यकता नसली तरी अशा माध्यमांची एक लहानशी यादी नमूद करणे मला आवश्यक वाटते.

५१.१ अधिव्याख्याता या नात्याने मिळणारे वेतन त्याकाळी आजच्या इतके आकर्षक नव्हते हे खरे असले तरी ते निश्चितच समाधानकारक होते. पहिल्या पूर्ण वर्षापासूनच करमुक्त उत्पन्नापेक्षा ते जास्त असल्याने आयकरदाता हा दर्जा अधिव्याख्यात्यांला प्राप्त होत असे. त्यावेळी वेतनधारकांना वाहन, पुस्तके यासाठी 'स्टँडर्ड डिडक्शन' असे काही नव्हते. पुस्तकाच्या पावत्या लावल्यास ती रक्कम करवजावटीसाठी पात्र असायची. सायकल वापरणारास दरमहा ५० रुपये, स्कुटरवाल्यास ७५ रुपये, मोटारवाल्यास १०० रुपये महिन्याला एवढी किंवा यासारखी रक्कम वजावटीस पात्र असे. सेवेच्या पहिल्या २-४ वर्षातील ही गोष्ट आहे. मी त्यावेळी स्कुटर वापरत असे. मला ती वजावट मिळाली नाही मग निदान सायकलची वजावट तरी द्यावी, म्हणून मी आयकर अधिकाऱ्यांशी भांडायला गेलो. के.एस. सक्सेना या नावाचे एक आयकर अधिकारी त्यावेळी अमरावतीला होते. माझे म्हणणे त्यांनी ऐकून घेतले व शांतपणे उद्‌गार काढले "मि. देशमुख! स्कुटरची वजावट तुम्हाला मिळणार नाही कारण तुमच्या विवरण पत्रातील माहितीवरुन असे दिसून येते की स्कुटर तुमच्या मालकीची नाही व सायकलची वजावट तुम्हाला मिळणार नाही कारण तुम्ही ती क्लेम केलेली नाही". एक तरुण अधिव्याख्याता असेसमेंट ऑर्डर मधील दोषाबद्दल आयकर अधिकाऱ्यांशी भांडायला येतो याचे त्यांना मोठे आश्चर्य वाटले होते. त्यांनी मला वजावट वगैरे काही दिली नाही. त्यांचा आदेश बदलला नाही. पण वेतनधारकांनी आपल्या कामापुरते हे नियम निट समजून घेतले पाहिजे असे सांगून उत्पन्नाच्या नोंदी कशा ठेवाव्यात आयकर विवरणपत्र कसे भरावे याबाबत मार्गदर्शन केले. "मनाची शांतता ही एक मोठी संपत्ती असते. या सम्पत्तीवर मनाचे स्वास्थ्य व मनाच्या स्वास्थ्यावर शरीराचे स्वास्थ्य अवलंबून असते" असा किंवा या टाईपचा काही सल्लाही त्यांनी अस्खलीत इंग्रजीतून मला त्यावेळी दिल्याचे आठवते. अगदी सुरुवातीच्या काळात मिळालेल्या या मार्गदर्शनाचा व बेफजुल झटक्याचा मला पुढे खुपच फायदा झाला. आपल्या करदायित्वाची बारीक सारीक माहीती करुन घेणे, वर्षभरातील आपल्या करपात्र उत्पन्नाच्या बिनचूक नोंदी ठेवणे, कायद्याने मिळू शकणाऱ्या करवजावटीसाठी ताण सहन करुनसुद्धा बचतीचे वा गुंतवणूकीचे नियोजन करणे व याउपरान्त पडेल तो कर वेळच्या वेळी भरणे हा माझ्याकरीता अतिशय समाधान व आत्मविश्वास प्रदान करणारा एक नियमित वार्षिक विधी ठरला.

५१.२. सेवेच्या अगदी सुरुवातीच्या ५-७ वर्षाच्या काळात सहकेंद्राधिकारी, उन्हाळ्यामध्ये नागपूर येथे मुक्कामी टॅब्युलेटर म्हणून मी उदंड काम केल्याचे दिसून येते. १९७० नंतर मात्र मी या कामातून पूर्णपणे बाहेर पडलो. १९७५-७६ पर्यंत उत्तर पत्रिकांच्या मूल्यांकनाचे भरपूर काम केल्याचे दिसून येते. नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळामध्ये गेल्यावर मी ते पूर्णपणे बंद केले. विशेष ठराव करुनसुद्धा कार्यकारी मंडळाच्या सदस्यांने उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे परिश्रमिक व काम घेऊ नये असा मी स्वतः ठरावच मांडला होता व तो मंजूर होऊन अमलातही आला. पुढे तर तशी तरतुद कायद्यातच आणण्यामध्ये माझा मोठा सहभाग होता. ज्याच्या एका हाती देण्याचा अधिकार आहे त्याने दुसऱ्या हाताने घेण्याचे काम करु नये अशी आमच्या संघटनेची त्यावेळी भूमिका होती. इतर अनेक विद्यापीठामध्ये मी तत्पूर्वी परीक्षक म्हणून त्यावेळी काम केले. काही वर्षे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यशास्त्र या विषयाच्या उत्तरपत्रिका नियमित पणे माझ्याकडे येत असत. या सर्व कामातून मिळणारे उत्पन्नाचे आकडे आयकर विवरणपत्राच्या स्थळप्रतीवरुन आज पुन्हा पाहिले तर किरकोळ वाटतात हे खरे पण त्यावेळी ते भरपूर आकर्षक वाटत असत.

**५१.३. पूर्ण वेळ सुटीवर गेल्यानंतर अधिव्याख्याता म्हणून वेतन बंद झाले पण विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळणारे वेतन उत्पन्न करपात्र होते. शिवाय विधानमंडळ सदस्याला अधिवेशन प्रसंगी किंवा समिती बैठकीच्या निमित्त 'दैनिक भत्ता' या मथळ्याखाली मिळणारे उत्पन्न आयकर कायद्याच्या कलम १० (१७) अन्वये करमुक्त असते. (उल्लेख टाळला असे होऊ नये म्हणून नमूद करण्यात येते की अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून (१९८३) तर आजपर्यंतच्या काळात कोणताही प्रवास भत्ता किंवा दैनिक भत्ता अमरावती विद्यापाठाकडून मी घेतलेला नाही. याच काळात संघटनेकडून सुद्धा कोणताही दैनिक भत्ता व**

**प्रवास भत्ता घेतलेला नाही.)**

५१.४. सन १९७० ते १९८० च्या दशकात अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये "सामाजिक शास्त्रे" हा विषय शिकविण्यासाठी मी मानधन तत्वावर काही वर्षे काम केले. १९७१-७२ या आर्थिक वर्षाच्या ७२७९.७० रुपयाचे एकूण करपात्र उत्पन्न असलेल्या आयकर विवरणपत्रामध्ये त्या उत्पन्नाचा भाग असलेले ९९० रुपयाचे हे मानधन ही त्यावेळी मोठी रक्कम वाटत असे.

५१.५ "भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन" या सेवेच्या पहिल्या एका वर्षानंतर प्रकाशित केलेल्या पुस्तकामुळे मला पुढे वर्षवार रॉयल्टी मिळत राहिली. या पुस्तकाची १९६५ मध्ये (पहिली आवृत्ती) सहा रुपये तर २००० मध्ये (सहावी आवृत्ती) १५० रुपये किंमत होती. सुरुवातीला साधारणपणे ५०० ते १००० रुपये वर्षाकाठी मिळत असत. महत्तम एका आर्थिक वर्षात या खात्यावर मिळालेले उत्पन्न रुपये १६८७५ आहे. दरवर्षी या प्रकाशनातून कमी जास्त उत्पन्न मिळत राहिले. विधानमंडळ सदस्य या नात्याने वाढलेल्या कामामुळे सुधारणा करण्यास वेळ न मिळाल्याने काही वर्षे हे पुस्तक अनुपलब्ध होते. सर्वश्री य.दि.फडके, ना.य.डोळे, बी.टी.देशमुख व सुधाकर प्रभू असे आमचे ४ लोकांचे एक लेखक मंडळ महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने सत्तरीच्या दशकात १० व्या वर्गाच्या "नागरिकशास्त्र आणि प्रशासन" या विषयाच्या पाठ्यपुस्तकांच्या लेखनासाठी नेमले होते, ते काम आम्ही त्यावेळी यशस्वीपणे पार पाडले. पुढे मी सहलेखक असलेले एक पुस्तक १२ व्या वर्गासाठी क्रमिक पुस्तक म्हणून नेमले गेले होते. या दोनही लेखन सहभागातून त्यावेळी आकर्षक उत्पन्न मिळाल्याच्या नोंदी आहेत.

५१.६ उद्योगधद्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यावेळी केंद्र सरकारने कंपन्याच्या समभागातील गुंतवणूकीच्या रकमेला एका विशिष्ट मर्यादेपर्यंत कर वजावट देण्याचे धोरण स्वीकारले होते. केंद्र शासनाच्या वित्त खात्याच्या आर्थिक कार्य विभागातर्फे आयकर कायद्याच्या कलम ८० सीसी अंतर्गत अशा समभागांना पात्रता प्रमाणपत्र (Eligible issue of capital) दिले जात असे व त्या आधारावर एका बाजूला करपात्र उत्पन्नातून वजावट मिळत असे, कायद्याने ठरवून दिलेल्या मुदतीपर्यंत असे समभाग विकता येत नसत, त्यानंतर विकल्यास त्या विक्रीवर दुसऱ्या बाजूने दिर्घमुदती गुंतवणूकीची विक्री (LTCG) या मथळ्याखाली मिळालेल्या उत्पन्नावर 54 E (1) व 80 T या कलमान्वये चांगल्या वजावटी मिळत असत. आपल्याकडे कोणी याबाबत फारसे लक्ष घालत नाहीत किंवा कोणी घालत असल्यास मला त्याची माहिती नाही. मुंबईमध्ये शिक्षक व इतर नोकरदार अभ्यासपूर्वक या गुंतवणूकीचा व वजावटीचा लाभ घेतात. परिपत्रके काढतात, एकमेकाला प्रोत्साहन देतात. काही काळ मी सुद्धा त्याचा लाभधारक होतो, असे त्यावेळच्या आयकर विवरण पत्राच्या स्थळप्रतीवरून दिसून येते. पुढे केंद्र शासनाने आयकर कायद्यात बदल करुन उपरोक्तपैकी काही सवलती पूर्णपणे बंद केल्या. काहीमध्ये मोठी कपात केली.

५१.७ सन १९७४ मध्ये ४ एकर ३० गुंठे व सन १९७९ मध्ये २ एकर १९ गुंठे शेतजमिन संपादित केल्यामुळे (परिशिष्ट १ मालमत्ता क्रमांक ६ व ७) उत्पन्नाचे एक अतिरिक्त विधिमय माध्यम उपलब्ध झाले. घरीच तयार केलेले संकरित बियाणे हाताशी असलेल्यामुळे ४ एकर ३० गुंठे शेतात पहिल्याच वर्षी म्हणजे सन १९७४-७५ मध्ये एच फोर कापसाचे कमर्शियल पीक घेतले. १६ जानेवारी १९७५, ३० जानेवारी १९७५ व २० मार्च १९७५ रोजी अनुक्रमे १४.७५ क्विंटल, ४.३३ क्विंटल आणि १.४७ क्विंटल असा एकूण २०.५५ क्विंटल सुपर ग्रेडचा एच फोर कमर्शियल कापूस, एकाधिकार योजनेत महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशनला विकल्याचे/घातल्याचे अधिकृत कागदपत्रावरुन दिसून येते. एकाधिकार कापूस खरेदी योजनेत "वजन, प्रत व पावती यांचा संयुक्त नमुना" या अंतर्गत फेडरेशनने पास केलेल्या अधिकृत पेमेंट ऑर्डरचे अवलोकन करता असे दिसून येते की त्यावर्षी फेडरेशनने सुपर ग्रेडला ४०० रुपये प्रति क्विंटल भाव दिला होता. त्याशिवाय जमा झालेल्या १.०६ क्विंटल कापसाला झोडा (एक्स) प्रत देण्यात आली होती व रुपये १९०

*(परिशिष्ट : ८)*

# जंगम मालमत्तांचे विवरणपत्र

या परिशिष्टामध्ये जंगम (Movable properties) मालमत्तांचे विवरणपत्र दिले आहे. प्रत्येक मालमत्तेचे तपशील दिले असून त्या मालमत्तेच्या संपादनासाठी वापरलेल्या निधीचे स्त्रोतसुद्धा नमुद केलेले आहेत.

(१) **वरिष्ठ पेन्शन विमा योजना** : नामे, श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख. या योजनेमध्ये गुंतविलेली रक्कम रुपये २,५५,८४५ एवढी आहे. या रकमेचे स्त्रोत परिशिष्ट ५ च्या क्रमांक ५ वर नमुद केलेले आहेत.

(२) **पोस्टाची ज्येष्ठ नागरिक बचत योजना** : नामे, श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख. या योजनेमध्ये गुंतविलेली रक्कम रुपये ३,५०,००० एवढी आहे. या रकमेचे स्त्रोत परिशिष्ट ५ च्या क्रमांक ६ वर नमुद केलेले आहेत.

(३) **बँकातील मुदती ठेव** : परिशिष्ट ४ मध्ये नमूद केलेल्या रकमेतून कर्जफेड व परतफेड केल्यानंतर उपलब्ध झालेली मोठी रक्कम गुंतविण्यासाठी वरिष्ठ पेन्शन विमा योजना किंवा पोस्टाची ज्येष्ठ नागरिक बचत योजना या सारख्या त्यातल्या त्यात किफायतशीर योजना उशिरा उपलब्ध झाल्या. मधल्या काळात या रकमा कमी किफायतशीर गुंतवणूकीमध्ये ठेवाव्या लागल्या. (उदा. बँक डिपॉझिट, वगैरे) ३१ मार्च २००१, २००२, २००३ व २००४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या आयकर विवरणपत्रानुसार या गुंतवणूकीवरील करपात्र व्याज उत्पन्न अनुक्रमे रुपये १९०७२, ५४०२४, ५०१३८, २४५०२ असे एकूण रुपये १,४७,७३६ एवढे प्राप्त झाले. **(अ)** यामध्ये जवळचे २-३ हजार रुपये टाकून स्टेट बँकेतील मुदती ठेवीत ठेवलेः- रुपये १,५०,००० नामे, श्री.भाऊराव तुळशीरामजी देशमुख. **(ब)** १९९९ नंतर कर्जफेडीचा भार मोठ्या प्रमाणावर कमी झाल्यामुळे व पुढे तर तो पूर्णपणे संपुष्टात आल्यामुळे शेतीच्या उत्पन्नावर मुद्दल व व्याजाच्या परतफेडीचे वेगवेगळ्या कर्ज खात्याकडून येणारे दडपण सुद्धा पूर्णपणे संपुष्टात आले. विहिरीवरील पाण्यातून सिंचनाची उत्तम सुविधा असलेल्या ७-८ एकरातून वर्षाकाठी मिळणाऱ्या लहान मोठ्या उत्पन्नावर, येणारे 'प्रपंच' या नावाच्या खर्चाचे लहान मोठे दडपण ऑगस्ट १९९९ पासून पूर्णपणे थांबले. त्यानंतरच्या काळात शेती उत्पन्नातून शिल्लक रकमेतील काही भाग स्टेट बँकेच्या मुदती ठेवीमध्ये ठेवला. :- रुपये ५०,००० नामे, सौ. सुशीला भाऊराव देशमुख.

(४) **पोस्टाची मासिक प्राप्ती योजना** : आजच्या राहत्या निवासस्थानी १९७० मध्ये सुरुवातीस आम्ही जेव्हा प्लॉट घेतला तेव्हा हाऊसिंग सोसायटी निर्माण करावी अशी योजना होती. त्यावेळी माझ्या निवासस्थानासमोरील प्लॉट नंबर ३५ हा सामायिक विहिर व गृहनिर्माण संस्थेच्या उपयोगासाठी घ्यावा अशीही योजना होती. त्याची इसारचिठ्ठी जवळच्या पैशातून श्रीमती देशमुखांच्या नावे करण्यात आली. पुढे गृहनिर्माण संस्थेची कल्पना पूर्णपणे बारगळल्याने त्याची खरेदीसुद्धा व्यक्तीशः करावी लागली. अशा व्यवहारातून मागे हटता येत नाही कारण ते बरेच नुकसानदायक असते. पुढेच सरकावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी दुसरी काही व्यवस्था नसल्याने व बियाणे प्रकल्पासाठी आवश्यकता असल्याने विहिर तयार करणे (जवळ जवळ ८० फुट खोल) विहिरीचे बांधकाम व अनुषंगिक बांधकामावर व कामावर (जसे विजेचा मोटारपंप, पंपहाऊस इत्यादी) बराच खर्च तेंव्हा करावा लागला. हा खर्च त्यावेळी झेपण्यासारखा नसल्यामुळे "विहिर व विहिरीवरील बांधकामाशिवायचा या प्लॉटचा काही भाग" पुढच्या एक वर्षातच विकावा लागला. (परिशिष्ट ३ क्रमांक तीन ब) त्यातून काही खर्च भागला. बियाणे प्रकल्प पुढे शेतावर हलविण्यात आला व नवसारी ग्रामपंचायत हा भाग पुढे महापालिकेत समाविष्ट झाल्याने पिण्याच्या पाण्यासाठी विहिरीच्या पाण्यापेक्षा गोड्या पाण्याची सार्वजनिक व्यवस्था कालांतराने उपलब्ध झाल्याने "विहिर व त्यावरील बांधकामासहचा प्लॉटचा उर्वरित भाग" विकल्याच्या सर्व व्यवहाराचे अधिकृत तपशील परिशिष्ट ३ च्या क्रमांक तीन (क) मध्ये नमूद केले आहेत. या विक्रीतून उपलब्ध झालेल्या निधीपैकी रुपये ३,००,००० एवढा निधी पोस्टाच्या या मासिक प्राप्ती योजनेमध्ये (नामे, सौ. सुशीला भाऊराव देशमुख.) गुंतविण्यात आला असून या खात्याशी संलग्न पोस्टाच्या बचत खात्यात व्याजाचे रुपये २८,१०० जमा झालेले आहेत.

(५) **सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी १९६८** (Public Provident Fund Scheme 1968) : उत्पन्नावरील निर्धारित करामध्ये मोठी वजावट या गुंतवणूकीमुळे मिळते. शिवाय गुंतविलेल्या रकमेवर मिळणारे व्याज संपूर्णपणे करमुक्त असते. पत्नीच्या नावे असलेल्या खात्यामध्ये भरलेल्या रकमासुद्धा करसवलतीस पात्र असतात. मात्र दोन अटी महत्वाच्या असतात. एक म्हणजे वर्षाकाठी ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम या खात्यामध्ये गुंतविता येत नाही व दुसरे म्हणजे गुंतविलेली रक्कम ही त्या वर्षाच्या तुमच्या करपात्र उत्पन्नातूनच गुंतविलेली असली पाहिजे. १५ वर्षाच्या आत खाते बंद करता येत नाही. गेली अनेक वर्षे मी या खात्याचा लाभधारक आहे व त्यातून मोठी करवजावट दरवर्षी मला मिळत राहिलेली आहे. व्याजरुपाने मिळालेले करमुक्त उत्पन्नसुद्धा एकदम मिळत असल्याने मोठ्या कामास येते. खाते बंद झाल्यावर मूळ गुंतवणूक व त्यावरील व्याज धरुन मिळणारी समग्र रक्कम ही सुद्धा करमुक्त असते. २५ मे १९७८ ला सुरु केलेले याबाबतचे माझे पहिले खाते मुदतीनंतर ५ वर्षाची एक मुदतवाढ घेऊन २३ जुन १९९८ रोजी बंद करण्यात आले. त्यातून उपलब्ध झालेल्या रकमेचे तपशिल परिशिष्ट ४ च्या क्रमांक १ वर नमुद केलेले

चा भाव देण्यात आला होता. पहिल्याच वर्षामध्ये (१९७४-७५) झालेले हे ८-९ हजार रुपयाचे सकल उत्पन्न करमुक्त होते याची नोंद करणे मला आवश्यक वाटते. शिवाय अतिशय महागडे बियाणे घरचेच असल्यामुळे व हिशेबाच्या सोईसाठी फवारणी (पीकसंरक्षण) तसेच मशागतीचा खर्च बियाणे उत्पादन खात्यावर गेल्याने हे सकल उत्पन्न जवळ जवळ निव्वळ उत्पन्न होते. (१९७४-७५ या वर्षात प्रमाणीत संकरीत बियाण्याचे एकूण २८९ बॅग्ज उत्पादन झाले होते.) पहिल्या वर्षीचे कृषी उत्पन्नाचे तपशील नमुद केल्यावर आता एकदम नजिकच्या वर्षाच्या रब्बी पिकाचे (सन २००३ चे रब्बी पीक) तपशील मी येथे नमुद करु इच्छितो. सन २००३ च्या रब्बी हंगामात २२.२८ क्विंटल करडीचे (बियाणे) पीक झाले. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने १९५२ रुपये प्रति क्विंटल या दराने ते विकत घेतले. दिनांक १२ एप्रिल २००४ रोजीच्या रेखांकित धनादेश क्रमांक ८९०६६४ अन्वये रुपये ३४,००२ व ११ ऑगस्ट २००४ च्या रेखांकित धनादेश क्रमांक १६२९४६ द्वारे रुपये ९८३८ चे शोधन महामंडळाने केले. असे एकूण ४३८४० रुपयाचे या खाती सकल उत्पन्न झाले. आलेला खर्च वजा जाता या पीकातून निव्वळ करमुक्त उत्पन्न अंदाजे ३० हजार रुपये पडले. शेती घेतल्याच्या पहिल्या वर्षातील पीकाचे व हा अहवाल सादर करतांनाच्या नजिकच्या वर्षातील एका पीकाचे (२००३ चे रब्बी पीक) बिनचूक हिशेब वर दिले आहेत. मधातील सर्व वर्षांचे तपशील देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. विहीरीच्या पाण्यावर उत्तम सिंचन सुविधा उपलब्ध असलेली ही ७-८ एकरची शेती आहे. शिवाय असे की अगदी सुरुवातीच्या ८-१० वर्षाच्या काळात व ऑगस्ट १९९९ नंतरच्या आजपर्यंतच्या काळात आमची उपजिविका किंवा प्रपंच या शेतीवर अवलंबून नव्हता. ऑगस्ट १९९९ पूर्वीच्या १०-१२ वर्षात या शेतीचा उपजिविकेला व प्रपंचाला सुद्धा हातभार लागला ही वस्तुस्थिती आहे.

**खर्चाच्या इतर बाबींचे तपशील**

५२. जंगम मालमत्तांमधील गुंतवणूक ही प्रामुख्याने ऑगस्ट १९९९ नंतरची गोष्ट आहे. स्थावर मालमत्तांमध्ये करण्यात आलेल्या गुंतवणूकीचे परिशिष्ट एकमध्ये नमुद केलेले तपशील पाहिल्यास या १० मालमत्तांवरील एकूण गुंतवणूक रुपये ४,६६,२३० एवढी आहे. मग हे १९९८ पर्यंतचे एवढे मोठे करपात्र व बरोबरीने करमुक्त उत्पन्न गेले कोठे? याचा ज्यावेळी मी या निमित्ताने आता आढावा घेतला तेव्हा माझ्या असे लक्षात आले की पायाभूत सोईसुविधांच्या गराड्यांमध्ये ज्यांनी जन्म घेतलेला असतो त्यांना आपल्या जीवनभराच्या कर्तृत्वाने जन्मतः उपलब्ध झालेल्या पायाभूत सोईसुविधांच्या इमारतीला नुसती रंगसफेदी व अशा इमारतीच्या कळसाला चकाकी आणण्याचाच तेवढा खर्च करावा लागतो. अशा सोईसुविधांच्या अभावामध्ये ज्यांना आपल्या जीवनाची सुरुवात करावी लागते त्यांना किमान मुलभूत सोईसुविधांची इमारत बांधतांना अशा इमारतीच्या पायामध्ये दगड विटांच्या भरावासाठी काढलेल्या कर्जाच्या मुद्दल व व्याजाचे हप्ते फेडण्यातच त्यांच्या जीवनाचा अर्ध्यापेक्षा जास्त प्रवास खर्ची पडलेला पहावा लागतो.

**जीवनावश्यक अशा किमान सोईसुविधा उपलब्ध करुन देणारी स्थावर मालमत्तांची मालकी जीवन जगण्याचा एक आत्मविश्वास मनुष्याला प्रदान करीत असते व त्याचा त्याच्या कामावर निश्चितपणे परिणाम होत असतो. दर दोन चार महिन्यांनी किरायाने असलेले घर खाली करण्याच्या येणाऱ्या सूचना व गावाबाहेर जंगलात आपले एकटे घर असले तरी ते आपले आहे व ते खाली करण्याची लेखी किंवा तोंडी सूचना अजिबात येण्याची शक्यता नाही, या दोनही प्रकारातून मनात येणाऱ्या परस्परविरोधी भावभावनांचा मी नजिकचा लाभधारक असल्यामुळे तद्जन्य आत्मविश्वास किंवा त्याचा अभाव कसा असतो याच्याशी मी जवळून परिचित आहे.** (१) प्रत्येक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी घेतलेल्या कर्जापोटी मुद्दल व व्याजाचे हप्ते फेडणे हा एक खर्चाचा मोठा भाग होता. १९६४ ते १९७० या काळात मला कोणत्याही कर्जफेडीला तोंड द्यावे लागले नाही. १९७० ते ऑगस्ट १९९९ पर्यंतच्या काळात विविध प्रकारच्या कर्जाचे मुद्दल व व्याजाचे हप्ते हा बराच मोठा खर्चाचा भाग होता. ऑगस्ट

आहेत. आम्हा उभयतांची आज अशी दोन वेगवेगळी खाती चालु आहेत. ती पुढील प्रमाणे :- **(अ)** सौ.सुशीला भाऊराव देशमुख यांचे पीपीएफ खाते क्रमांक 01P 00900320. या खात्यातील विद्यमान रक्कम रुपये **३,६३,७६७** आहे. हे खाते १५ वर्षाची मुदत पूर्ण करुन नियमानुसार मिळणाऱ्या ५ वर्षाच्या एका मुदतवाढीवर आहे. **(ब)** भाऊराव तुळशीरामजी देशमुख यांचे पीपीएफ खाते क्रमांक 01P 00901698. या खात्यातील विद्यमान रक्कम रुपये **८१,२४६** असून उभय खात्यातील विद्यमान रकमा त्या त्या खात्यामध्ये अनेक वर्षात वेळोवेळी वर्षवार करण्यात आलेली गुंतवणूक व त्यावर जमा झालेल्या व्याजाचे प्रतिनिधीत्व करतात.

(६) **समभागात दीर्घ मुदती गुंतवणूक :** (अ) 'इंडियन हॉटेल्स कंपनी' (IHL) या टाटाच्या कंपनीने साडेतेरा टक्के व्याजदराचे 'कनव्हर्टीबल डिबेंचर्स' (पब्लीक इश्यु) मे १९८२ मध्ये खुल्या बाजारात विक्रीला काढले होते. त्यातून ५० डीबेंचर्स खरेदी केले होते. या डीबेंचरमधील परीवर्तनीय भागापोटी १० रुपये मूळ दर्शनी किंमतीचा कंपनीचा एक समभाग २५ रुपये किंमतीला रोखे धारकाला देण्यात आला. पुढे १९८९ मध्ये (१६ डिसेंबर १९८९ च्या पत्रान्वये) दोन समभागास एक याप्रमाणे व १९९४ मध्ये (२५ नोव्हेंबर १९९४ च्या पत्रान्वये) एकास एक समभाग बोनस समभाग म्हणून देण्यात आले. यापैकी १२७ समभाग आमचेकडे आहेत. १९८२ मधील मूळातील ही गुंतवणूक १२५० रुपयाची असून त्याची आजच्या बाजारभावाने किम्मत ५०,८०० रुपये आहे. (ब) दुसरी दिर्घमुदती गुंतवणूक म्हणजे रिलायन्स पेट्रोलियम या कंपनीने 'तिहेरी विकल्पाचे परिवर्तनीय रोखे' खुल्या बाजारात (पब्लिक इश्यु) विक्रीला काढले होते. त्यातून पुढे परिवर्तनोत्तर त्या कंपनीचे समभाग दर्शनी किमतीला म्हणजे प्रत्येकी १० रुपयाला एक याप्रमाणे ६०० समभाग व २० रुपयाला प्रत्येकी एक या प्रमाणे ६०० समभाग असे एकूण १२०० समभाग रोखेधारकाला उपलब्ध झाले. पुढे ती कंपनी 'रिलायन्स इंडस्ट्रीज' (RIL) मध्ये विलीन झाली. विलिनीकरणानंतर रिलायन्स पेट्रोलीयमचे समभाग रद्द होऊन त्याऐवजी दहास एक या प्रमाणात 'रिलायन्स इंडस्ट्रीज'चे समभाग भागधारकांना देण्यात आले. बोनसनंतर झालेल्या वाढीसह त्या कंपनीचे १५६ + २१० = ३६६ समभाग आज आहेत. त्यावेळी केलेली ही १८ हजार रुपयाची मूळ गुंतवणूक असून बाजारभावाने त्याचे आजचे मूल्य रुपये १,८६,६६० आहे

(७) **दागदागिने :-** प्रतिज्ञापत्रामध्ये 'ज्युवेलरी'चे तपशील द्यायला सांगितले आहेत. 'ज्युवेल' या शब्दाचा 'रत्न' व 'ज्युवेलरी' या शब्दाचा 'जडजवाहीर' असा अर्थ शासन व्यवहार कोषामध्ये नमूद आहे. हे दोनही शब्द जरा जड वाटल्याने मी दागदागिने हा जरा कमी वजनदार शब्द वापरला आहे. याबाबतीत माझे खाते Nil असून श्रीमती देशमुखांच्या खात्यावर विवाह प्रसंगी मिळालेले सुवर्णालंकार एकूण ३६० ग्रॅम वजनाचे असून त्याची आजची किम्मत रुपये २,३०,२०० आहे.

**(८) वाहने :-** ३० सप्टेंबर १९८८ ला त्यावेळी रुपये ११,८५० ला घेतलेली एक बजाज चेतक स्कुटर माझ्याकडे आहे. तीची आजची किम्मत रुपये ७ हजार धरलेली आहे. टाटा सुमो या गाडीची आजची किम्मत तीन लक्ष एक रुपये धरलेली आहे. मूळात १९९८ मध्ये ४ लक्ष रुपयापेक्षा जास्त किंमतीला घेतलेली ही गाडी संघटनेतर्फे मला उपलब्ध करुन देण्यात आली. रविवार, दिनांक १९ ऑक्टोबर १९९७ रोजी जे एम. पटेल कॉलेज, भंडारा येथे झालेल्या आमसभेच्या बैठकीच्या कामकाजपत्रिकेवर विषय क्रमांक २१७ अंतर्गत कार्यकारी मंडळाच्या वतीने सचिव प्रा.डॉ. एकनाथ कठाळे यांनी मांडलेला प्रस्ताव एकमताने **सम्मत करण्यात आला.** तो पुढील प्रमाणेः-

"सातत्याने गेले पाव शतक ज्या चिकाटीने, जिद्दीने, निरलसपणे, निस्पृहपणे, धडाडीने व मनःपूर्वक नुटाच्या व महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या पातळीवर प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्राध्यापक चळवळीचे नेतृत्व केले त्याबद्दल या सभागृहाला अतिव अभिमान वाटतो. संघटनेच्या या माध्यमातून प्राप्त झालेल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा बुद्धीमत्तापूर्ण रीतीने वापर करुन विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनाच्या कामासाठी त्याचा जो उपयोग त्यांनी करुन घेतला तो अत्यंत स्पृहणीय असून त्यांच्या विधानपरिषदेतील कार्याला "उत्कृष्ट संसदपटू" हा पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांच्या या गौरवाबरोबरच ते ज्या संघटनेचे नेतृत्व करतात त्या संघटनेचाही गौरव झाला आहे, अशी या सभागृहाची भावना आहे. प्रा.बी.टी.देशमुख यांच्या या गौरव प्रसंगाच्या निमित्ताने त्यांना आणखी प्रभावीपणे कार्य करता यावे म्हणून एक डिझेल वाहन भेट देण्याच्या कार्यकारी मंडळाच्या प्रस्तावास हे सभागृह सहर्ष मान्यता देत आहे. संघटनेच्या सदस्यांनी व बीटींच्या चाहत्यांनी या प्रसंगानिमित्त उभारलेल्या स्वेच्छाधिन सहभागातून ही भेट दिली जात आहे. याचा या सभागृहाला विशेष अभिमान वाटतो."

दिनांक १७ मे १९९८ रोजीच्या आमसभेत याबाबतच्या कार्यपूर्तीचा सचिव प्रा.डॉ.एकनाथ कठाळे यांनी सादर केलेला जो अहवाल सम्मत करण्यात आला त्यातील शेवटचा परिच्छेद पुढील प्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या स्थापनेपासून या संघटनेच्या नेतृत्वमंडळात सहभागी असलेले एक नेते, १९७४ पासून सतत अखंडपणे कार्यरत असलेले नुटाचे अध्यक्ष, जलसिंचन, रस्ते, पाणीपुरवठा या महत्त्वाच्या विकास क्षेत्रासह एकूणच विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनासाठी जिवापाड मेहनत करणारे विधानपरिषद सदस्य, या संघटनेच्या वतीने सतत लागोपाठ तीन वेळा विधानपरिषदेवर निवडून जावून १९८० ते १९९८ अशी गेली १८ वर्षे विधानपरिषदेत सतत संघर्षरत असलेले पदवीधरांचे प्रतिनिधी, प्रा.बी.टी.देशमुख हे राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने विधानपरिषदेतील "उत्कृष्ट संसदपटू" या पुरस्काराचे प्रथम मानकरी झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठीचे प्रतीक म्हणून हे वाहन आपणा सर्वांच्या वतीने आमसभेच्या ठरावानुसार मी त्यांच्या सुपूर्त करीत आहे."

जवळील नगदी पैसे व व्यवहाराच्या दैनंदिन बँकखात्यातील निधी याचे तपशील प्रतिज्ञापत्रातच नमूद आहेत. जंगम मालमत्तांबाबतचे समग्र निवेदन संपलेले आहे.

*****

१९९९ नंतर मात्र त्यातून पूर्णपणे मुक्तता झाली असे म्हणता येईल. (२) उपजिविका व प्रपंच या मथळ्याखाली येणारे खर्च जसे सर्वांना असतात तसे ते मलाही होते हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. (३) माझ्या एकंदर नियोजनामध्ये पुढचा क्रमांक आयकराच्या महत्तम विधिमय वजावटी मिळविण्यासाठी, जी गुंतवणुक किंवा बचत करावी लागते, ती प्रसंगी ताण सहन करुनसुद्धा केल्याचे दिसून येते. अंतिमतः विचार केला तर शास्त्रीयदृष्ट्या याला खर्च असे म्हणता येईल काय? हा प्रश्नच आहे पण प्रत्यक्ष करतांना तो एक प्रकारे खर्चच असतो. फार झाले तर याला खर्च वाचविणारा खर्च असे म्हणता येईल किंवा कायमस्वरुपीचा खरा खर्च वाचविण्यासाठी केलेला तात्पुरता खर्च असेही म्हणता येईल. (४) पुस्तके व प्रकाशनावर होणारा खर्च : प्रकाशनांच्या व पुस्तकांच्या खात्यावर बराच खर्च झाल्याचे दिसून येते. सुरुवातीच्या काळात आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथालय व त्यानंतरच्या काळात विधानमंडळाचे ग्रंथालय या समृद्ध ग्रंथालयांचा मला खूपच उपयोग झाला, हे खरे असले तरी आपल्या कामाची उत्तम वाटचाल व्हावी असे वाटत असेल तर त्या कामाशी संबंधित किमान आधारभूत पुस्तके कायम सोबतीला असल्याने ते काम करण्यातील आत्मविश्वास दुणावतो असा माझा अनुभव आहे. प्रथम शिक्षक या नात्याने, नंतर संघटनेचा अध्यक्ष व त्यानंतर विधानमंडळ सदस्य या नात्याने काम करतांना ती एक अपरिहार्य गरज होती. लोकसभा सचिवालयामार्फत अनेक नियतकालिके, प्रकाशने व पुस्तके मोठ्या संख्येने प्रकाशित केली जातात. कुठून तरी आपल्याला कळेल, आपण पत्र पाठवू, मग मनिऑर्डर पाठवू, मग ती प्रकाशने आपल्याकडे येतील यात जाणारा वेळ टाळण्यासाठी लोकसभा सचिवालयाने अनेक वर्षापूर्वीपासून एक व्यवस्था अमलात आणली आहे. तुम्ही त्यांच्याकडे एक खाते उघडा, ते तुम्हाला प्रकाशनाची यादी नियमित पाठवितात, साधे पोस्ट कार्ड टाकले तर ती प्रकाशने रजिस्टर्ड पोस्टाने घरपोच पाठविली जातात. पैसे कापून घेतात, नीट हिशेब ठेवतात व आपल्याला पाठवितात. दोन अटी आहेत (१) किमान काही रक्कम खात्यात नेहमी शिल्लक असली पाहिजे. १९७८ मध्ये ही रक्कम १०० रुपये होती, पुढे ती रक्कम ५०० रुपये झाली. (२) दुसरी अट म्हणजे वर्षाकाठी किमान विशिष्ट रकमेची पुस्तके घेतली पाहिजे. यातील एकाही अटीचा भंग केल्यास खाते बंद होते. मी विधानमंडळ सदस्य होण्याच्या पूर्वीपासून (१९७८ पासून) आजतागायत लोकसभा सचिवालयाच्या या खात्याचा खातेदार असून माझा तेथील Deposit Account No 222 हा आहे व ते खाते आजही चालू आहे. मला त्याचा खूपच फायदा झाला. (२) अशाच प्रकारची व्यवस्था भारत सरकारच्या प्रकाशन विभागातसुद्धा उपलब्ध आहे. केंद्र शासनाच्या 'कंट्रोलर ऑफ पब्लीकेशन्स' यांचेकडेसुद्धा मी गेले अनेक वर्षे खातेदार आहे. तेथील माझा Deposit Account No 3036 आहे. या खात्यामार्फत मिळणारी सेवा मात्र लोकसभा सचिवालयाप्रमाणे चोख नसून अत्यंत गलथानपणाची आहे. (३) महाराष्ट्र शासन राजपत्र व भारत शासन राजपत्र यांच्या काही महत्वपूर्ण भागांचा मी १९७३ पासून वर्गणीदार आहे. आता १९८० पासून महाराष्ट्र शासन राजपत्राचे भाग विनामुल्य मिळतात. पण त्यांना लावून ठेवणे व मुख्य म्हणजे 'ठेवणे' हे मुल्यवान काम आहे. संघटनेचा अध्यक्ष या नात्याने व विधानमंडळ सदस्य या नात्याने काम करतांना नियमितपणे येणाऱ्या प्रकाशनांचा व संबंधित पुस्तकांचा खूपच उपयोग होतो.

***(परिशिष्ट : ९)***

Affidavit to be furnished by the candidate alongwith nomination paper
Before the Returning Officer for election to
**Maharashtra Legislative Council**
from Amravati Division Graduates constituency

I, Bhaurao Tulshiramji Deshmukh son of Tulshiram Daduji Deshmukh aged 65 years, resident of No.3, Subodh Colony, Amravati - 444 604 candidate at the above election, do hereby solemnly affirm and state on oath as under :-

(1) The following **case(s)** is/are **pending** against me in which cognizance has been taken by the court :- NIL

(2) That I give hereinbelow the **details of the assets** (immovable, movable, bank balance, etc.) of myself, my spouse and dependents :-

<u>(A) DETAILS OF MOVABLE ASSETS.</u>

S.No. **Description** (A) SELF (Prof.B.T.Deshmukh) (B) SPOUSE (Sau.Sushila Deshmukh)

**(i) Cash :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : Rs. 20,000 (B) (Sau.Sushila Deshmukh) : Rs. 12,000

**(ii) Deposits in Banks,Financial Institutions and Non-Banking Financial Companies :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : Savings Accounts Rs. 96,250.00 State Bank FDR Rs. 1,50,000 (B) (Sau.Sushila Deshmukh) : Savings Accounts Rs. 62,133.56 State Bank FDR Rs. 50,000

(iii) **Shares in companies :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : RIL - 156 Rs. 79,560 IHL - 127 Rs. 50,800 (B) (Sau.Sushila Deshmukh) : RIL - 210 Rs. 1,07,100

**(iv) Other Financial instruments NSS, Postal Savings, LIC Policies, etc.:-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : P.P.F. A/c :- Rs. 81,246 Varishtha Pension Bima Yojana - Rs. 2,55,845 Senior Citizen Saving P.O. Scheme :- Rs. 3,50,000 (B) (Sau.Sushila Deshmukh) : P.P.F. A/c :- Rs. 3,63,767 Post Off. Monthly income Scheme : Rs. 3,00,000 Interest Rs. 28,100

**(v) Motor Vehicles (details of Make. etc.) :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : TATA SUMO DX Rs. 3,00,001 Bajaj Chetak Scooter Rs. 7000 (B) (Sau.Sushila Deshmukh) : Nil

**(vi) Jewellery (give details of weight and value) :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : Nil (B) (Sau.Sushila Deshmukh) Gold Ornaments 360 Gram Rs. 2,30,200

**(vii) Other assets, such as values of claims/interests :-** (A) (Prof.B.T.Deshmukh) : Nil (B) (Sau.Sushila Deshmukh) : Nil

<u>B. DETAILS OF IMMOVABLE ASSETS</u>

S. No. **Description** (A) SELF (Prof.B.T.Deshmukh) (B) SPOUSE (Sau.Sushila Deshmukh)

**(i) Agricultural Land** - Location(s) - Survey number(s) - Extent (Total measurement) - Current market value :-(A) (Prof.B.T.Deshmukh) : NIL (B) (Sau.Sushila Deshmukh) : Mauje - Navsari Pra. Nandgaon Peth S.No. 11 (1) 4 Acre 30 Gunthe Rs. 1,20,000 @ (2) 2 Acre 19 Gunthe Rs. 77,938 @ +

**(ii) Non-Agricultural Land** - Location(s) - Survey number(s) - Extent (Total measurement) - Current market value :-(A) (Prof.B.T.Deshmukh) : Mauje Navasari S.No. 41/2 Plot No. 1, 2, 3 (5000, 3000, 3000 Sq.Ft.) Rs. 51,000, 20,400, 20,400, @ Mauje Navasari S.No. 121/3-4 Plot No 1, Sq.Ft.3331 Rs. 36054 @ & (B) (Sau.Sushila Deshmukh) : Mauje Navasari S.No. 41/2 Plot No 4, 5 3000, 3000 Sq.Ft. Rs. 20,400, 20,400 @ &

**(iii) Buildings** (commercial and residential) - Location(s) - Survey/ door number(s) - Extent (Total measurement) - Current market value :- (A) (Prof.B.T.Deshmukh) : Residential House on Plot No. 3, Subodh Colony, Navasari 2000 Sq.Ft. Rs. 7,00,000 @ # (B) (Sau.Sushila Deshmukh) : NIL

**(iv) Houses/Apartments, etc.** - Location(s) - Survey/ door number(s) - Extent (Total measurement) - Current market value :- (A) (Prof.B.T.Deshmukh) : Worli Sagar Co-Operative Housing Society, Mumbai Apartment No. 1003, Vaitarana , 950 Sq. Ft. : Rs. 24,00,000 @ $ (B) (Sau.Sushila Deshmukh) : NIL

**(v) Others** (such as interest in property) :- (A) (Prof.B.T.Deshmukh) : NIL (B) (Sau.Sushila Deshmukh) : NIL

SEE (+ & # $ @) NOTES 1 to 5

लोकसभा सचिवालयामार्फत प्रकाशित होणारे "**Journal of Parliamentary Information**" किंवा सी.पी.ए.चे "PARLIAMENTARIAN" वेळच्या वेळी आले नाही तर आपण काहीतरी गमावल्याची भावना निर्माण होते. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या "TEACHERS' MOVEMENT" या मासिक मुखपत्राच्या संपादक मंडळात मी गेली काही वर्षे काम करीत आहे पण त्याच्यापूर्वी गेल्या अनेक वर्षापासून मी त्या मासिकाचा कायम वर्गणीदार आहे. "FIFTH CPC" चे २१४३ पृष्ठांचे व एकूण रुपये ५०० किंमतीचे तीन खंड किंवा महाराष्ट्र जलसिंचन आयोगाचे एकूण ६७ नकाशे व १८४५ पृष्ठांचे ५ हजार रुपयाच्या वर किंमत असलेले पाचही खंड योग्य वेळी आपल्या लिहिण्याच्या टेबलाच्या बाजूच्या कपाटात असण्याचे फार मोठे मोल असते. शिवाय त्यावेळी आपल्यावर असणारी जबाबदारी पार पाडतांना आपल्या स्वतःच्या पुस्तकालयात आगमन होणाऱ्या या पुस्तकांच्या किंमतीचे मोजमाप करता येते व ती किंमत ठरलेली असते. **त्यांच्याअभावी होणाऱ्या संभाव्य नुकसानाचे नुसते अंदाजच करावे लागतात, त्याचे काटेकोर मोजमाप करण्याचे कोणतेही मापदंड उपलब्ध नसतात.** विनियोजन विधेयकाला विधानपरिषदेने एकमताने एखादी शिफारस करावी, फक्त तेवढ्यासाठी विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन व्हावे, विधानसभेनेसुद्धा ती शिफारस एकमताने मान्य करावी अशी घटना भारतीय संविधानाच्या इतिहासात प्रथमच घडली, हे घडल्यावर आपल्या लक्षात येते की असे घडले म्हणून. पण 'शिफारस' म्हणजे काय? 'सुधारणा' म्हणजे काय? सुधारणा करता येत नाही व शिफारस करता येते हे समजून शिफारसीची बिनचूक वाक्‌संहिता तयार करण्याचे जे बळ आपल्यात येते त्याचा फार मोठा भाग तत्संबंधीच्या संदर्भ ग्रंथांशी असलेल्या आपल्या सततच्या समिप सान्निध्यातून व संपर्कातून आलेला असतो. असा खर्च हा एक आनंदाचा भाग असतो. १९६४ ते १९८६ व ऑगस्ट १९९९ नंतरच्या काळांत अशा पुस्तकाच्या विपुल आगमनाच्या नोंदी आहेत. ऑगस्ट १९९९ पूर्वीच्या १०-१२ वर्षात या खात्याच्या खर्चाला थोडाफार 'कट' लागला होता असे दिसून येते.

### खरेदी केलेल्या पण नंतर विकलेल्या मालमत्तांचे तपशील

५३. खरेदी केलेल्या पण नंतर विकलेल्या मालमत्तांचे तपशील **परिशिष्ट ३** मध्ये दिलेले आहेत. मध्यभागी अनुक्रम नंबर व सुरुवातीला (अ) अंतर्गत मालमत्ता संपादनाची (खरेदीची) तारीख दिली आहे. त्यानंतर खरेदीकर्त्याचे नाव, तसेच (ब) आणि (क) अंतर्गत विक्रीची तारीख व विक्रीदाराचे नाव, त्यानंतर मालमत्तेचा तपशील, एकूण क्षेत्रफळ, खरेदीची अथवा विक्रीची किम्मत व नोंदणी दस्तऐवजाचे अधिकृत तपशील नमूद केलेले आहेत. अशा विक्रीतून मिळणारे उत्पन्न हे "कॅपिटल गेन" या मथळ्याखाली करपात्र उत्पन्न असते व हे उत्पन्न इतरत्र खरेदीच्या वेळी कामी आल्याने त्याचे तपशील त्या ठिकाणी नमुद केले आहेत.

### शिक्षक या नात्याने निवृत्ती वेतनाचा विकल्प

५४. मी "शिक्षक या नात्याने निवृत्ती वेतनाचा विकल्प" दिलेला असल्याने त्या नात्याने नियत वयोमानानुसार (ऑगस्ट १९९९ नंतर) मिळालेल्या सेवानिवृत्ती लाभांचे तपशील **परिशिष्ट ४** मध्ये दिलेले आहेत. अगदीच काटेकोरपणे

*उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेले प्रतिज्ञापत्र येथे जसेच्या तसे शब्दशः उद्धृत केलेले आहे. फरक एवढाच आहे की तेथे सादर करतांना तक्ता पद्धतीने ठरवून दिलेल्या नमुन्यात सादर केलेले आहे व येथे ते धावत्या मजकुराच्या स्वरुपात मुद्रीत केलेले आहे. - **बी.टी.देशमुख***

3) I give herein below the details of my **liabilities/ overdue** to public financial institution and government dues :-

Sr. No., Description, Name and address of Bank/ Financial Institution(s) department(s), Amount outstanding as on 04.11.2004

(a)

(i) Loans from banks :- Nil

(ii) Loans from financial institutions :- Nil

(iii) Government dues

(a) Dues to departments dealing with government accommodation :- Nil

(b) Dues to departments dealing with supply of water :- Nil

(c) Dues to departments dealing with supply of electricity :- Nil

(d) Dues to departments dealing with telephones :- Nil

(e) Dues to departments dealing with government transport (including aircrafts and helicopters) :- Nil

(f) Other dues if any :- Nil

(b)

(i) Income Tax including surcharge (Also indicate the assessment year up to which Income Tax Return filed. Give also permanent Account Number (PAN):-

For Assement Year - 2003-2004, Return Filed on 20.06.2003. ACK No. 8045. D & O R No. 1367/2003-2004 Refund order passed on 12.12.2003. For Assement Year - 2004-2005, Return filed on 12.07.2004. Ack No. 012536. Tax paid Rs. 881.00 PAN NO.: AASPD 9512 C

(ii) Wealth Tax (Also indicate the assessment year up to which wealth Tax return filed) :- N.A.

(iii) Sales Tax (Only in case of proprietary business) :- N.A.

(iv) Property Tax :- Paid

(4) My educational **qualifications** are as under :-

(A) SSC of Vidarbha Board of Secondary Education in 1958 from Shri. Shivaji High School, Main Branch, Amravati.

(B) B.A. of Nagpur University in 1962 from Vidarbha Mahavidyalaya, Amravati.

(C) M.A. in Political Science of Nagpur University in 1964 from Vidarbha Mahavidyalaya, Amravati.

(B.T.Deshmukh)
DEPONENT

VERIFICATION

I, the deponent above named, do hereby verify and declare that the contents of this affidavit are true and correct to the best of my knowledge and belief; no part of it is false and nothing material has been concealed therefrom.

**VERIFIED** at AMRAVATI this the 4th day of November 2004.

(B.T.Deshmukh)
DEPONENT

.........................................................................................

\+ Note 1 : No. (1) was purchased on 17.5.1974 at Rs. 20,000 and No. (2) on 23.4.1979 at Rs. 14988

& Note 2 : Plot No. 1 was purchased on 1.2.1972 at Rs. 8000 and Plot No. 2,3,4,5 were purchased on 7.1.1970 at Rs. 3000 each. (Originaly Plot 4 was Purchased by her Father and 5 by her c.Brother. Plot No. 1 of S.No. 121(3-4) was purchased on 27.5.1985 at Rs. 9990.

# Note 3 : This Residential House was constructed during 1972-74 at the cost of Rs. 31,000 and further improvements were carried out from time to time subsequently in different phases

$ Note 4 : During 1983 to 1990 Rs. 2,70,252 were paid to the society in instalments, over and above that, a Loan of Rs.1,00,000 was made available by the society.

@ Note 5 : Current market value is calculated on the basis of "Cost Inflation Index" provided by the latest Government of India Notification No. 742 (E) dated 29.6.2004 (268 ITR (st) 207)

Note 6 : Affidavit Under ""FORM 26'' : (See rule 4A) is not printed since it is : NIL

विचार करु जाता त्यातील क्रमांक १ वरील PPF चे खाते ही वेगळी व स्वतंत्र बाब आहे. पण ती त्याच काळात आल्याने त्यात दाखविलेली आहे. उपलब्ध निधीचा विनियोग कसा करण्यात आला याचे तपशील **परिशिष्ट ५** मध्ये नमुद केलेले आहेत.

### विमा पॉलीसी व एन्.एस्.सी.

५५. अकाली मोडलेल्या विमा पॉलीसीजचे तपशील **परिशिष्ट ६** मध्ये दिलेले असून त्यातून उपलब्ध झालेल्या निधीचा वापर कोण्याकामी करण्यात आला याचे तपशील परिच्छेद ४५ (५) मध्ये दिलेले आहेत. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रातून उपलब्ध झालेल्या निधीचे तपशील **परिशिष्ट ७** मध्ये दिले असून त्यातून उपलब्ध निधीच्या आवश्यक तेवढ्या वापराचे तपशील परिच्छेद ४५ (६) मध्ये दिलेले आहेत.

### जंगम मालमत्तांचे तपशील

५६. आम्हा उभयतांच्या नावे असलेल्या जंगम मालमत्तांचे तपशील **परिशिष्ट ८** मध्ये दिलेले आहेत. त्यांची एकूण संख्या ८ आहे. त्यापैकी बहुतांशी गुंतवणूक ही सेवानिवृत्ती लाभांशी संबंधित आहे. यापैकी पहिल्या चार मालमत्ता या ऑगस्ट १९९९ नंतरची गुंतवणूक या स्वरुपात आहेत व त्यासाठी उपलब्ध निधीचे स्त्रोत तपशीलाने नमूद केलेले आहेत. क्रमांक ५ वरील जंगम मालमत्ता आयकराच्या विधिवत वजावटीसाठीच्या बचतीशी संबंधित आहे तर क्रमांक ६ वरील जंगम मालमत्ता दीर्घकालीन गुंतवणूकीतून मिळणाऱ्या (LTCG) आयकर वजावटीशी संबधित आहे. ७ व्या व ८ व्या क्रमांकावर दागदागिने व वाहनाची नोंद असून त्याचे तपशील त्या परिशिष्टात दिलेले आहेत. जवळील नगदी पैसे व व्यवहाराच्या दैनंदिन बँकखात्यातील निधी याचे तपशील प्रतिज्ञापत्रातच नमूद आहेत.

### उमेदवारी अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्र

५७. उमेदवारी अर्जासोबत सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र (Affidavit to be furnished by candidate alongwith nomination paper Before the Returning Officer for election to Maharashtra Legislative Council from Amravati Division Graduates Constituency) सोबत **परिशिष्ट ९** मध्ये दिलेले आहे. उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेले प्रतिज्ञापत्र येथे जसेच्या तसे शब्दशः उद्धृत केलेले आहे. फरक एवढाच आहे की तेथे सादर करतांना तक्ता पद्धतीने ठरवून दिलेल्या नमुन्यात सादर केलेले आहे व येथे ते धावत्या मजकुराच्या स्वरुपात मुद्रीत केलेले आहे.

### जनाधार व धनाधार

५८. निवडणूकीसाठी थोडे फार धन खर्च होतेच ही गोष्ट खरी आहे. पण उमेदवाराने व त्यांच्या पाठीराख्यांनी याची काळजी घेतल्यास तो खर्च किमान मर्यादेपर्यंत ठेवता येणे कठीण नसते. शिवाय पाठीराख्यांनी आपल्या 'उत्तम व्यवहारातून' जिव्हाळ्याने या कामी दिलेले १० रुपये सुद्धा १० हजार रुपयाचे काम करुन जातात. याठिकाणी कामी आलेला किंवा येणारा अल्पसा धनाधार हा सुद्धा त्या व्यापक जनाधाराचा अविभाज्य भाग असतो. याच्या उलट उमेदवाराने किंवा त्यांच्या पाठीराख्यांनी 'उद्दाम व्यवहारातून' मिळविलेले व या कामी ओतलेले १० हजार रुपये हे १० रुपयाचेसुद्धा काम करू शकत नाहीत. पदवीधर मतदार संघामध्ये नोंदणीसाठीचे फॉर्म भरून आणण्याचेसुद्धा दरपत्रक उमेदवाराने ठरवून दिले असेल तर त्या दरानुसार कार्यरत असलेले मोजके लोक हा जनसमुहच असतो हे खरे असले तरी यातून समोर येणारा हा जनाधार बेमालूमपणे धनाधाराचाच अपरिहार्य भाग झालेला असतो. अशा या धनाधाराच्या आधारे निवडून गेलेल्या प्रतिनिधीला स्वाभाविकपणे त्या आधाराचीच पुजा बांधावी लागते व अशा त्या पुजाव्यवहारातून प्रतिनिधीने वापरावयाच्या सांसदीय आयुधांची धार कमालीची बोथट होते. ज्यांच्या आयुधांची धार कोणत्याही कारणाने बोथट झालेली आहे त्या लोकप्रतिनिधींनी शासनाला धारेवर धरण्याची कल्पना मग नुसत्या कल्पना विलासाचा भाग होऊन बसते. अशावेळी 'लोकांची भलाई हीच आपली कमाई' हा लोकशाहीला प्राणभूत असलेला मंत्र उलटा करुन वापरायला केंव्हा पासून सुरुवात झाली हे लक्षातसुद्धा येत नाही.शासनाला धारेवर धरण्याचा उपचार उघडपणे व जाहीररीत्या सभागृहात पार पाडावयाचा विधिमय व्यवहार असतो. अशा व्यवहाराचे अधिष्ठान हे वापरावयाच्या सांसदीय आयुधांच्या धारदारपणावर बांधलेले असते. अल्पसा धनाधार ज्याचा अविभाज्य भाग आहे असा व्यापक जनाधार ही या धारदारपणाची जननी असते, त्या जनाधाराचे मोजमाप करण्याची निवडणूक ही अधिकृत संधी असते.वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास अशा जनाधाराच्या मोजमापात आपल्याला किती गुण मिळतात? या गुणदान मोजमापाची निवडणूक ही एक परीक्षा असते.

### प्रतिज्ञापत्राचे प्रकाशन

५९. मी हे प्रतिज्ञापत्र कां प्रकाशित करीत आहे, याचाही संक्षिप्त खुलासा मी करु इच्छितो. १३ मार्च २००३ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने व त्यावर आधारित निवडणूक आयोगाच्या २७ मार्च २००३ च्या आदेशान्वये यासंदर्भातील उमेदवाराचे दायित्व आता आरपार बदलून गेले आहे, असे या शास्त्राचा विद्यार्थी या नात्याने माझे मत आहे. निवडणूक आयोगाच्या या आदेशानंतर २००४ ची लोकसभेची व महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक ही पहिली सार्वत्रिक निवडणूक आहे. **आपल्या स्थावर व जंगम मालमत्तांची यादी नमूद करणे एवढ्यापुरतेच हे दायित्व मर्यादित आहे असे मानण्याइतकी ही साधी गोष्ट आहे असे समजणे बरोबर नाही.** ते तर सक्तीचेच आहे. पण अशा या मालमत्तांची यादी उमेदवारी अर्जासोबत जोडण्याच्या या वर्तमान-कालीन दायित्वाच्या पोटात अंगभूत असे एक भविष्यकालीन उत्तरदायित्व उमेदवाराने स्वीकारले आहे. या मालमत्तांच्या संपादनार्थ किती निधी खर्च करण्यात आला व हा निधी उमेदवाराच्या उत्पन्नाच्या विधिमय व ज्ञात स्त्रोतांच्या प्रमाणात आहे किंवा नाही (Proportionate to the known Legitimate Sources of Income) याचा जाब देण्याचे हे उत्तरदायित्व होय. "हे तुम्ही आणलं कुठून?" असे विचारण्याचा निर्धार एका नागरिकाने जरी केला तरी त्याचा जबाब देण्याचे उत्तरदायित्व उमेदवाराला भविष्यकाळात पार पाडावेच लागेल असाच या व्यवस्थेचा अर्थ आहे. असे निष्कर्ष माझ्या अभ्यासातून बाहेर पडत असतांना ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णासाहेब हजारे ठिकठिकाणी बैठका घेऊन हा अर्थ लोकांना समजावून सांगत होते. "मतदारांनी प्रत्येक उमेदवाराला प्रतिज्ञापत्राची प्रत मागावी. ते देत नसतील तर माहितीच्या अधिकाराचा वापर करुन आपण ती मागून घ्या. ही मालमत्ता आली कुठून? त्यात वाढ झाली कशी? याचा जाब उमेदवाराला विचारा. तो उमेदवार याचा जाब देत नसेल तर ते प्रतिज्ञापत्र माझ्याकडे पाठवा. मी त्याला कोर्टात खेचेन" त्यांनी मांडलेल्या या जाहीर भूमिकेमुळे वर्तमानकालीन दायित्वाच्या पोटात दडलेल्या भविष्यकालीन उत्तरदायित्वाचा आपला निष्कर्ष बिनचूक आहे याबाबत माझी खात्री पटली. स्थावर व जंगम मालमत्तांची केवळ यादी महत्त्वाची नाही तर या मालमत्ता संपादनाच्या कामी आलेल्या निधीचे स्त्रोत काय आहेत हे जाणून घेण्याचा लोकांना अधिकार प्राप्त झाला आहे. हे आता निश्चित झाले आहे.

"विधीमंडळ हे लोकशाहीचे महामंदीर आहे. जनता जनार्दन हीच त्याची स्वयंभू सार्वभौम देवता! प्रतिनिधी हे त्या देवतेचे उपासक आहेत" ज्येष्ठ विचारवंत श्री. बाळासाहेब भारदे यांनी मांडलेला हा विचार लोकशाहीचा पायाभूत विचार आहे. जन हेच जनार्दन आहेत, या श्रद्धेने लोकशाही पंढरीच्या वारिला निघालेले लोकप्रतिनिधी (उमेदवार) हे वारकरी आहेत, असे मानले तर श्री. अण्णासाहेब हजारे म्हणतात त्याप्रमाणे लोकांनी मागण्याची वाट न पाहता **"मालमत्ता संपादनाच्या निधीच्या स्त्रोतांसह मालमत्तांची यादी समाविष्ट असलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत आपणहून वाटणारा पहिला वारकरी" होण्याचा मान नाही मिळाला तर निदान अशा उपासकांच्या आघाडीवर असलेल्या ५-१० वारकऱ्यांत आपले स्थान असावे या भावनेने मन ओतून ही मेहनत या अंकाच्या माध्यमातून सादर करतांना मला मनापासून आनंद होत आहे.**

दिनांक ०७.११.२००४

**- बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/ 2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO. NR/ATI/78/2002** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **08.11.2004**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---

To,.......................................................................
.........................................................................
.........................................................................
.........................................................................
.........................................................................